

# माणूस

30 पैसे

१५ डिसेंबर १९६५



## मुखपृष्ठ

दि. २४ नोव्हें. ६५ रोजी 'राष्ट्रपतिभवन', दिल्ली, येथे भारत–पाक युद्धातील वीरांचा गौरव करण्यात आला. या गौरव–समारंभाचे छायाचित्रदर्शन.

### पहिली ओळ

मेजर जन. जोगिंदरसिंग, ग्रुप कॅप्टन जे. के. के. जॉन, ग्रुप कॅप्टन डब्ल्यू. व्ही. ए. लॉईड, मेजर जनरल राजिंदरसिंग.

### दुसरी ओळ [ महावीर चक्र ]

ब्रिगे. आर. डी. हिरा, कॅ. बलवंतसिंग, कॅ. चंदर नारायणसिंग यांचे वडील [मरणोत्तर], लेफ्ट. क. गुरुबन्ससिंग सागा, विंग कमांडर डब्ल्यू. एम. गुडमन.

### तिसरी ओळ [ महावीर चक्र ]

मेजर भास्कर रॉय, मेजर जनरल हरक्रिश्न सिबाल, मेजर जनरल गुरुबक्ष-सिंग, ब्रिगे. खेमकरणसिंग.

### चवथी ओळ

लेफ्ट. क. देसमाँड हाईड, श्रीमती सावित्री खन्ना – लेफ्ट. क. एन्. एन्. खन्ना यांच्या पत्नी [ मरणोत्तर ], विंग कमांडर पी. पी. सिंग [ जी. डी. पायलट ], स्क्वाड्रन लीडर पद्मनाथ गौतम [ जी. डी. पायलट ].

### पाचवी ओळ

श्रीमती इंदिरा मेहता – लेफ्ट. क. हरबन्सलाल मेहता यांच्या पत्नी [ मरणोत्तर ], लेफ्ट. क. सलीम कालेब, श्रीमती सोहिंदर कौर – मेजर भूपिंदरसिंग यांच्या पत्नी [ मरणोत्तर ], श्रीमती कविता त्यागी, मेजर आसाराम यांच्या पत्नी [ मरणोत्तर ].




वर्ष पाचवे : अंक चौदावा : १५ डिसेंबर १९६५
किंमत तीस पैसे : वार्षिक वर्गणी आठ रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

---

## प्रसंग ताजा, शब्द जुना

दि. २४ नोव्हेंबर. संरक्षणमंत्री मा. यशवंतराव चव्हाण राष्ट्रपतिभवनातील वीरगौरव समारंभाचा कार्यक्रम आटोपून नुकतेच निवासस्थानी परतले होते.

इतिहास संशोधक श्री. ब. मो. पुरंदरे यांचाही मुक्काम व्याख्यानांनिमित्त या वेळी दिल्लीत होता व मा. यशवंतराव यांच्या नियोजित भेटीसाठी ते यावेळी त्यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. बरोबर सौ. निर्मलाबाई पुरंदरे व दिल्लीच्या ' महाराष्ट्र परिचय केंद्रा 'चे संचालक श्री. भा. कृ. केळकर हेही होते.

गप्पा सुरू झाल्या. राष्ट्रपतिभवनातील कार्यक्रम कसा काय झाला अशी सौ. निर्मलाबाईंनी सहज पृच्छा केली.

" फारच छान. कोणीही हळवे व्हावे असा हा प्रसंग. पण वातावरण अगदी गंभीर होते. विशेषतः अधिकाऱ्यांच्या पत्नी तर फारच dignity ने वागत होत्या. सगळ्यांनाच मनापासून वाईट वाटत होते. पण काय करणार ! अशाही प्रसंगातून जावेच लागते ! " यशवंतराव सांगत होते.

पुरंदऱ्यांमधला इतिहास–लेखक जागा झाला. त्यांनी ठेवणीतील माहिती काढली. शिवाजीमहाराजांच्या काळातही असे दरबार भरत असत. मोहीम संपली की असा दरबार भरवून महाराज कामगिरीप्रमाणे प्रत्येकाचा यथायोग्य गौरव करीत. याला त्या काळी ' जखमनाम्याचा दरबार ' असे म्हणत.

यशवंतरावांनी चटकन् हा शेवटचा शब्द झेलला आणि ते म्हणाले, " वा ! वा ! काय छान शब्द आहे हो हा ! ' जखमनाम्याचा दरबार ' ! वा ! फारच सुरेख ! "...

आणि विषयदुसरीकडे वळला. अर्धा तास उलटला तसे डोंगऱ्यांचे (P. A.) आतबाहेर सुरू झाले. चाळीस मिनिटांनंतर मोठ्या नाइलाजाने ही रंगलेली मैफल संपवावी लागली. कारण पुढचा कार्यक्रम संरक्षणमंत्र्यांची वाट पाहत होता.

— संपादक.

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यांतील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# भारत-पाक संघर्षाची

पंतप्रधान शास्त्रींची ताश्कंदवारीची तयारी सुरू आहे आणि भारत–पाक युद्धाचे पहिले पर्व समाप्त होत आहे.

या सरत्या वर्षातील भारत-पाक युद्ध ही सर्वात महत्त्वाची घटना. रोमांचकारी आणि स्फूर्तिदायकही. शत्रूच्या प्रदेशावर आपण थोडी का होईना, चाल करून गेलो आणि आमच्या विशीतिशीतल्या तरुण-तरुण अधिकाऱ्यांनी आणि सर्वसामान्य जवानांनी काही नेत्रदीपक पराक्रम गाजवून आमची मान उंच केली. सेबर जेट्स आणि पॅटन टँक्स धुळीस मिळविणे ही काही सामान्य मर्दुमकी नव्हे. शत्रूच्या प्रदेशावर चाल करण्याचा आक्रमक पवित्रा आणि आमच्या जवानांची ही मर्दुमकी यामुळे देशात काही काळ एका वेगळ्याच तेजाचा संचार झाला, बाहूबाहुंना एक वेगळेच स्फुरण चढले. राष्ट्रीय चैतन्याच्या या स्वयंस्फूर्त आणि विराट दर्शनाने स्वकीय आणि परकीय–सारेच स्तिमित झाले, भारताचा सन्मान झाला, ' आनंदवनभुवना 'चा किंचित्सा, किंचित्काल साक्षात्कार झाला.

' किंचित्साच, किंचित्कालच. ' कारण १८।१९ दिवस चालू असणाऱ्या (दि. १ ते १९ सप्टेंबर) या संघर्षात आपण मिळविले काय आणि गमावले काय याचा आढावा आपल्या दृष्टीने फारसा समाधानकारक नाही. प्रश्न अर्थातच सेनादलाच्या पराक्रमाचा नसून राजकीय ध्येयधोरणांचा आहे. ही धोरणे नीट तपासून ठरवले पाहिजे, की या संघर्षाचे फलित काय ? या संघर्षातून काय साधायचे ठरले होते, ते कितपत साध्य झाले, जे ठरले होते तेच मुळात चूक की बरोबर !

' पाकिस्तानची तसूभरही भूमी आम्हाला नको आहे; पाकिस्तानी आक्रमणाचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी पाकिस्तानचे सैनिकी बळ (Military power) खच्ची करणे ' एवढाच मर्यादित उद्देश डोळ्यासमोर ठेवून भारतीय फौजांनी पाकिस्तानी प्रदेशात आगेकूच केले', असे आपल्याला सांगण्यात आले. ठीक आहे. हा हेतू साध्य झाला का, एवढाच प्रश्न प्रथम विचारात घेऊ.

# फलनिष्पत्ति काय ?

## □ साधनसामग्री आणि मनुष्यबळ

सैनिकी बळ दोन प्रकारचे. साधनसामग्री आणि मनुष्यशक्ती. साधनसामग्रीबाबत एवढे जरूर म्हणता येईल, की पॅटन टँक्स आणि सेबर जेट्समुळे पाकिस्तानला जी एकप्रकारची अभेद्यता वाटत होती तिला आपण तडाखा देऊ शकलो. पण यामुळे पाकिस्तान नरमले, याला पुरावा काय ? पाकिस्तान शस्त्रास्त्रांच्या बाबतीत संपूर्णतया परकीय मदतीवर अवलंबून आहे. पाकिस्तानात शस्त्रास्त्रांचे कारखाने चालू असते आणि ते आपण उध्वस्त करून पुरवठा बंद पाडला असता, तर पाकिस्तानला तडाखा जाणवला असता. कारखाने सुरू होऊन पुन्हा शस्त्रास्त्रांचा साठा जमा व्हायला दहा-पंधरा वर्षांचा कालावधी लागतो आणि अशा परिस्थितीत व एवढ्या कालापुरतेच पाकिस्तानचे लष्करी बळ खच्ची झाले आहे, असे समजून चालणे रास्त ठरले असते. पण परकीय मदतीचा ओघ पाकिस्तानकडे कोणत्याही क्षणी सुरू होऊ शकतो. सेबर जेट्स आणि पॅटन टँक्स निरुपयोगी ठरतात असे आढळून आल्यास आणखी काही प्रकार येतील एवढाच फरक. मदतरूपाने, कर्ज म्हणून किंवा खरेदी करून पाकिस्तान आपले शस्त्रास्त्रांचे कोठार अल्पावधीत भरून काढील यात शंका घेण्याचे कारण नाही. अगदी भारत-पाक युद्ध चालू असतानाही तुर्कस्थानची लष्करी मदत पाकिस्तानकडे सुरूच होती. पाकिस्तानचा उघड उघड पराभव होऊ देणे इंग्लंड-अमेरिका किंवा रशिया–चीन यांपैकी कोणालाच मानवणारे नसल्याने एक नाही दुसरा, हा नाही तो कोणीतरी पाकिस्तानला मदतीचा हात नेहमीच पुढे करीत राहणार हेही आपण विसरून उपयोगी नाही. अशा परिस्थितीत आपण पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्याचा कणा मोडला हे समाधान बरेचसे काल्पनिकच ठरण्याचा संभव अधिक.

दुसरा मुद्दा मनुष्यहानीचा. याबाबत आपल्या बाजूची हानी कमी लेखून चालणार नाही. अद्याप मृतांच्या आणि बेपत्ता सैनिकांच्या याद्या प्रसिद्ध होतच आहेत. आपला अधिकारीवर्ग प्रमाणाबाहेर गारद झाला ही बाब तर

विशेष चिंता करण्यासारखी आहे. एवढे तर नक्की, की पुन्हा डोके वर काढता येणार नाही एवढी मोठी पाकिस्तानची मनुष्यहानी तर आम्ही करू शकलेलो नाही.

## ☐ 'हे कशाचे पुरावे ?

मग पाकिस्तानचे सैनिकी बळ खच्ची करण्याचे आपले उदिष्ट साध्य झाले या म्हणण्याला आधार काय ? साधनसामग्रीची हानी पुन्हा लगेच भरून काढता येईल, मनुष्यहानी दहशत बसावी एवढी मोठी नाही आणि पाकिस्तानची युद्धाची खुमखुमी जिरली म्हणावी तर तेही नाही (भुत्तो–आयुब अजूनही ताठ आहेत !)–मग हे आपले समाधान काल्पनिकच नाही का ? बळ खच्ची झाले असते तर पाकिस्तानने युद्धबंदी स्वीकारल्यावरही एक हजारांपेक्षा अधिक वेळा युद्धबंदीभंग केला असता ? बळ खच्ची झाले असते तर युद्धबंदी अंमलात असतानाच राजस्थान भागातील आपली ठाणी परत हिसकावून घेतली असती ? भारताच्या ताब्यात पाकिस्तानचा सातशे मैलांचा प्रदेश आहे, तर पाकिस्तानने भारताचा सोळाशे मैलांचा मुलूख काबीज केला आहे, असे दर्शविणारे नकाशे दिल्लीतील पाकिस्तान हायकमिशनतर्फे सर्रास वाटले जात आहेत अशी वार्ता आहे. ही खरी असेल तर, हे काय पाकिस्तानची खोड मोडल्याचे लक्षण आहे ?

'आक्रमणाचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी लष्करी बळ खच्ची करणे' हे साध्यच फसवे, अर्धवट व चुकीचे आहे हा याचा निष्कर्ष आहे. साध्य मर्यादित असायला हरकत नाही, पण ते सुस्पष्ट हवे, नेमके हवे. जे नकाशावर स्वच्छपणे दाखविता येईल असे हवे. 'कुठल्यातरी एका क्षेत्रात शत्रूचा निर्णायक पराभव' हेच उदिष्ट हवे होते. आक्रमणाचा कायमचा बंदोबस्त सवाई आक्रमणानेच होऊ शकतो, मर्यादित प्रतिकाराने नव्हे. लाहोर आज भारतीय सेनेच्या हाती हवे होते किंवा पूर्व पाकिस्तानवर दिल्लीची हुकमत प्रस्थापित व्हायला हवी होती. निदान पाकव्याप्त काश्मीर तरी मुक्त करायचा ? यापैकी एखादीतरी गोष्ट घडून यायला हवी होती आणि मग शास्त्रीजींनी वाटाघाटींसाठी कुठेही जाण्यात मौज होती, शोभा होती, दिमाख होता. आज ताश्कंदला निघाली आहे ती केवळ अगतिकता आहे, निव्वळ असहाय्यता आहे, भीड आहे, दडपण आहे, दुर्बलता आहे.

## ☐ केवळ सीमोल्लंघन झाले

आणि एखादे विजयाचे हुकमी पान हाती ठेवणे, पाकिस्तानचा एखाद्या ठिकाणी, एखाद्या क्षेत्रात निर्णायक पराभव करून युद्धविरामाच्या वाटाघाटींना

बसणे अशक्य होते का ? मुळीच नाही. आपण सर्वदृष्टया पाकिस्तानच्या चौपट मोठे आहोत. हे जमले नसते तरच नवल. पण घाई झाली, नेतृत्व कुठेतरी कमी पडले, हेच खरे. दोष लष्कराकडे जात नाही. राजकीय नेतृत्वाकडेच जातो. लष्करातील काही अनुभवी व्यक्ती तर सांगतही आहेत, की युद्ध अचानक थांबविण्यात आपली चूक झाली. मेजर जनरल थोरात यांपैकी एक आहेत. परवाच पुण्याचे कॅप्टन जठार म्हणाले, की युद्ध अद्याप दहा दिवस तरी अधिक चालायला हवे होते. कॅप्टन चाफेकर यांनी तर युद्धविराम झाल्यावर लगेचच लेख लिहून आपल्या शंका प्रदर्शित करून ठेवल्या आहेत. 'माणूस' ने ही '१ ऑक्टोबर दसरा अंका' च्या मुखपृष्ठावरच त्या वेळी आपली प्रतिक्रिया नोंदवून ठेवली– "सीमोल्लंघन झाले. विजयादशमी ! !" लाहोर घेतले असते तरच विजयादशमी. नाहीतर नुसतेच सीमोल्लंघन.

असे का घडले ! एक कारण तर उघडच आहे. अमेरिका व रशिया यांचे दडपण. अमरिकेने मदत बंद करण्याचा धाक घातला, रशियाची काश्मीरबाबत भूमिका डळमळीत झाली. आम्हांला या बड्यांचे दडपण झुगारून देणे जमले नाही.

## ☐ अंतस्थ कारण

पण एक अंतस्थ कारणही संभवते. शत्रूवर निर्णायक चढाई करण्याचा व्यूह आखण्यास आपल्याला सवडच मिळाली नसावी. कशावरून ? थोडी पार्श्वभूमी पाहिली तर हे चटकन् ध्यानात येईल. 'माणूस' १५ सप्टेंबर अंकातील 'दिल्ली दरबार' या सदरात ही पार्श्वभूमी 'दरबारीं' नी वाचकांना यापूर्वी कळविलेलीच आहे. त्यातील महत्त्वाचा भाग असा –(पृष्ठ ६)


"दिल्ली दरबारात गेल्या दोन सप्ताहात (दि. ७ ऑगस्टपासूनच) जम्मू-काश्मीरचे महाराज श्री. करणसिंग यांनी बरीच व वेळीच जागृती निर्माण केल्यानेच भारत सरकारतर्फे काही भरीव उपाययोजना होत असून पाकिस्तानी आक्रमणाला पायबंद घातला जात आहे. अन्यथा ही कटकट हवी कशाला याच थाटात वा अंतर्गत घुसफुशीतच सारी शक्ती खर्च होऊन गेली असती. गेल्या दोन सप्ताहात काश्मीरमधील गंभीर परिस्थितीच्या वार्ता येथे येऊन थडकू लागल्यानंतरही येथे थंड डोक्याने चर्चा चालूच राहिली, की जम्मू-काश्मीरमध्ये एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही भारत सरकार दि. ८ ऑगस्टपर्यंत झोपलेलेच का राहिले होते? हे सर्व

जवळून पाहिले, की प्रसंगविशेषी वाटू लागते, की या देशाचा जणु राष्ट्रीय गुण (?) असल्यागतच दिल्ली दरबारात चर्चा चालू होते, की याला जबाबदार कोण ? सर्व गंभीर परिस्थितीचा साकल्याने विचार करून त्या परिस्थितीवर काबू मिळविण्यासाठी तातडीचा महान प्रयत्न राहतो घटकाभर दूर व चर्चाच चालू होते, की गृहमंत्रालयाचे गुप्तचर (इंटेलिजन्स) याला जबाबदार, की संरक्षण मंत्रालयाचे गुप्तचर अकार्यक्षम ठरले......! ... दिल्ली दरबारच्या आसमंतात अशा गंभीर प्रसंगी वैचारिक गोंधळ व बुद्धिभेद घडवून आणण्याचे पवित्र (?) कार्य करणारी जो 'कॉमरेड' मंडळी आहेत, त्यांनी सूर लावलेला आहेच, की यावेळी शास्त्रीसरकार सेनेला काश्मीरमध्ये धाडण्यास काही विशेष उत्सुक नव्हते. श्री. सादिकसाहेब होते म्हणून बरे झाले. त्यांनी आग्रहच धरला म्हणून मग शास्त्रीसरकारला भराभर पुढे पावले टाकावी लागली. अन्यथा काश्मीरचा कारभार आटोपलाच होता."

## □ काश्मीर वाचले हेच यश

आता शास्त्रीजींना महाराजा करणसिंगांनी जागे केले का सादिकसाहेबांनी केले हा वादाचा मुद्दा सोडला तरी एक गोष्ट यावरून सरळ ध्यानात येते, की काश्मीरचा कारभार आटोपण्याच्या पंथाला लागण्याइतका पाकिस्तानी आक्रमणाचा डाव मोठा होता व या डावाची आम्हांला शेवटपर्यंत कल्पना नव्हती. पाकिस्तानी हल्लेखोर काश्मीरात सर्वत्र घुसलेले होते—थेट श्रीनगर-विमानतळापर्यंत त्यांचा प्रवेश होता. त्यांची संख्या दहा हजारांच्या आसपास असावी. त्यांचेजवळ पाकिस्तानी शस्त्रास्त्रे होती. आत घुसविलेल्या या सशस्त्र हल्लेखोरांनी उठावणी सुरू करताच बाहेरून छांबकडून प्रचंड सैन्यानिशी चाल करून काश्मीर एका सपाट्यात मुक्त करण्याचा पाकिस्तानचा साहसी डाव होता. हा डाव आम्ही वेळीच सावध झाल्याने उधळला गेला हे जरी खरे असले तरी त्यामुळेच आमच्या उपाययोजनेला तात्कालिक संकटनिवारणाचे स्वरूप येणेही अपरिहार्य होते. लाहोर आघाडी आपण उघडली नसती तर छांबवरची पाकिस्तानी मगरमिठी सुटत नव्हती. काही जाणकारांचे तर असे मत आहे, की फक्त ४८ तासच आम्ही उशीर केला असता तर काश्मीरचा मामला खतम होता आणि पंजाबही काही सुरक्षित राहिला नसता. तेव्हा 'तात्कालिक संकट निवारण' हेच आमच्या चढाईचे मुख्य उद्दिष्ट असावे, व ते साध्य झाल्यावर आम्ही युद्धविराम पत्करून स्वस्थ बसलो. 'पाकिस्तानचे सैनिकीबळ खच्ची करणे,' 'आक्रमणाचा कायमचा बंदोबस्त करणे'—वगैरे कारणे

## कर्णावतारी भारत.....




मागाहून लोकांच्या समाधानासाठी पुढे केली गेली असावीत. काश्मीर वाचवणे अगदी निकडीचेच होते, ते साधले, एवढेच या पहिल्या युद्धपर्वाचे फलित. बाकी पाकिस्तान आहे तिथेच आहे, आणि आपणही होतो तिथेच आहोत. किंचित्सा बदल–किंचित्शी जागृती–बस्स.

**श्री. ग. मा.**

• • •

# विचार धारे

समीर

## • पुढारलेला कोण ? मागासलेला कोण ?

" आज येशू ख्रिस्त जर बोस्टनच्या रस्त्यावर चालताना दिसला तर त्याला बहुतेक जगातला अत्यंत मागासलेला माणूस ठरविण्यात येईल. इतर प्रेषितांची अवस्थाही याहून वेगळी होणार नाही. " एक प्रमुख अरब लेखक व तत्त्ववेत्ते श्री. मिखेल नैमी यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीत बोलताना या एका वाक्यात आपल्या तत्त्वज्ञानाचा गाभा विशद केला. आजकालच्या जगात प्रगत राष्ट्रे आणि अप्रगत राष्ट्रे असे जे विभाजन आहे, ते अर्थहीन आणि बिनबुडाचे आहे, हा नैमीच्या तत्त्वज्ञानातला मध्यवर्ती विचार आहे.

फक्त भौतिक संपत्ती जवळ आहे, म्हणून एखादे राष्ट्र पुढारलेले ठरत नाही. त्याचप्रमाणे भौतिक संपत्ती नाही, एवढ्या सबबीवर ते मागासलेलेही ठरत नाही. जी राष्ट्रे शांतता आणि मैत्रीचा पुरस्कार करतात, ती युद्ध आणि विध्वंस करणाऱ्या राष्ट्रांपेक्षा खूपच पुढारलेली आहेत. भारताने मानवजातीच्या भौतिक व आधिभौतिक विकासात खूपच भर टाकली आहे, तेव्हा त्याची गणना जगातल्या खूप पुढारलेल्या राष्ट्रांत केली पाहिजे.

जी जीवन–मूल्ये वास्तविक महत्त्वाची आहेत, ती हल्ली क्षुल्लक ठरली आहेत व जी क्षुल्लक आहेत, त्यांना महत्त्व आले आहे. " हा चुकलेला तोल शक्य तितक्या लवकर सावरला गेला पाहिजे. "

काव्य आणि नाटकापासून आत्मचरित्रापर्यंत निरनिराळ्या विषयांवर जर पुस्तके लिहिणाऱ्या या सव्यसाची लेखकाच्या साहित्यात मानवी जीवनाची मूलभूत एकात्मता हे मुख्य सूत्र आहे. ते म्हणतात, मुळात माणूस हा सर्वत्र सारखाच आहे. लहान मूल रंगाने गोरे असले काय किंवा काळे असले काय, त्याच्यातले सुप्त कर्तृत्व सारखेच असते. " पण ज्या क्षणी वेगळेपणाची जाणीव जागी होते, त्या क्षणापासून कृत्रिम अडसर उभारले जातात. राष्ट्रा–राष्ट्रांतले अन् माणसा–माणसांतले अडसर हेच आजच्या जगातल्या सर्व दुःखाला कारण आहेत. "

या भिंती एक दिवस नक्कीच मोडून पडतील, पण ' जागतिक सरकार ' स्थापन होण्याचा दिवस अजून आलेला नाही. " खरे म्हणजे सबंध मानवजातीला एकाच प्रकारचे जीवन घालविणे शक्य आहे, असे मला वाटत नाही. इतिहासात कुठल्याच काळी सबंध मानवजातीवर एकाच विचाराची किंवा शासनपद्धतीची हुकमत नव्हती.

मतांची विविधता आवश्यक आहे– मग ती मते राजकीय असोत, कलाविषयक असोत, नाहीतर इतर असोत. "

मानवी प्रगती शास्त्रीय शोधांनी मोजणे मात्र अजीबात चूक आहे. विज्ञान ही एक अजब चीज आहे, पण तिचा योग्य उपयोग करण्याची पात्रता अजून माणसांत आलेली नाही. रेडिओच घ्या. जगात ऐक्य घडवून आणायला रेडिओपेक्षा अधिक प्रभावी साधन कोठले मिळू शकेल ? रेडिओमुळे "आवाज सर्व जगभर प्रवास करू शकतो. वातावरण आवाजांनी आणि विचारांनी भरून जाते, पण सामान्य माणूस रेडिओचा उपयोग कशासाठी करतो ? तर केवळ मनोरंजनासाठी. रेडिओमुळे त्याच्या मनात विश्वबंधुत्वाची भावना जागी होत नाही. "

माणसाला अणुशक्तीदेखील अशीच अवेळी मिळाली आहे काय ? नाही. कुठलीही गोष्ट तिची वेळ आली म्हणजेच घडत असते. अणुशक्तीचा योग्य उपयोग करायला आपण अजून पात्र नसलो तरी तिचा शोध लागण्याची वेळ आली होती. आपण तिच्या विनाशासाठी उपयोग केला तर ती गोष्ट वेगळी — होय, अणुयुद्ध अटळ आहे ! ते केव्हा व कसे पेटेल, हे सांगता येत नाही. या युद्धात संस्कृतीने निर्माण केलेल्या बऱ्याच गोष्टींची आहुती पडेल, पण मानवीवंशाचा शेवट होणार नाही. मात्र मानवी जीवनातले एक संस्कृतिचक्र संपून दुसरे सुरू होईल.

## ● कस्तुरीमृगाइतके दुर्मिळ गाढव

औद्योगीकरणाचे कायदे सगळ्यांना माहीत आहेत, पण तोटे आहेत ते सगळे चट्कन लक्षात येण्याजोगे नाहीत. असा एक सहज लक्षात न येणारा तोटा म्हणजे नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास. परवा 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर अँड नॅचरल् रिसोर्सिस्' या संस्थेचे काही तज्ज्ञ दिल्लीमार्गे बँकाकला रवाना झाले. तेव्हा या संस्थेचे अध्यक्ष प्रा. बौलियर यांनी म्हटले, की आधुनिक जगात औद्योगीकरण, जंगलतोड व अविवेकी शिकार यांच्यामुळे पशुपक्षी व वृक्षवेली या नैसर्गिक संपत्तीचा दिवसेदिवस ऱ्हास होत चालला आहे. हल्ली सुमारे ३१६ पक्ष्यांच्या व २५४ जनावरांच्या जाती नाहीशा होऊ लागल्या असून, त्यांत १८ प्रकारचे पक्षी व ११ प्रकारचे प्राणी हिंदुस्थानातले आहेत. भारतात विशेषत: सिंह, बर्फमय प्रदेशातला चित्ता, एका शिंगाचा गेंडा, रानटी गाढव, काश्मिरी सांभर, कस्तुरी–मृग, रानटी म्हैस, गुलाबी डोक्याचे बदक इत्यादि पशुपक्ष्यांची जात नष्ट होऊ नये म्हणून तातडतोब उपाययोजना करायला हवी.

हिंदुस्थानात हे संरक्षणकार्य फार मागे का पडले आहे ? उत्तर नेहमीचेच– तज्ज्ञांची वाण ! पण अमेरिकेतल्या पुढारलेल्या देशात सुतार (वुडमेकर) पक्ष्याच्या आता फक्त ६ जाती राहिल्या आहेत, याचे कारण काय ? उत्तर–बदलत्या परिस्थितीशी जुळते न घेण्याचा या पक्ष्यांचा स्वभाव.

●


# प्रा. वा. ल. कुलकर्णी

## सौ. सुहासिनी इर्लेकर

### प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षा-लेखनामागील भूमिकेविषयी दोन शब्द

प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्यासारख्या मान्यवर समीक्षकासंबंधी लिहिताना मन एका वेगळ्याच आवर्तात सापडते. कारण अशा प्रतिष्ठित समीक्षकासंबंधी लिहिताना त्या व्यक्तीशी एखादे सरधोपट नाते प्रस्थापित होऊन चालण्यासारखे नसते. तसेच त्या नात्याचे स्वरूप निखळ भावनिक राहूनही चालण्यासारखे नसते. त्यास वैचारिकतेचा तीक्ष्ण तास असावाच लागतो. विशेष म्हणजे ही अपेक्षा सामान्य वाचकांचीच नव्हे, सुबुद्ध टीकाकारांचीही नव्हे, तर परिचयविषय झालेल्या त्या समीक्षकाचीही असू शकते; नव्हे असतेच. त्यामुळे माझ्यासारख्या सामान्य विद्यार्थिनीला गुरूसंबंधीच्या त्या भावनिक नात्याचा आधारही घेणे अशक्य होऊन बसलेले असते.

ललित-साहित्याचा निर्माता व त्याचा रसिक–वाचक यांत जे अनेक पदरी भावनिक नाते निर्माण होणे शक्य असते, तेही प्रा. कुलकर्णीसारखा समीक्षक व त्याचा विद्यार्थी यांत प्रस्थापित होणे कठीण. एखाद्या साहित्यकृतीने भारावून जाणाऱ्याला तिच्या निर्मात्याशी जी जवळीक निर्माण करता येणे शक्य, ती प्रा. वा. लं. सारख्या समीक्षकाने आपल्या परिचय-लेखकाला संपूर्णपणे नाकारलेली असते. हा समीक्षक स्वतः एका उंच पातळीवर जाऊन इतरांना तेथपर्यंत येण्याचे आवाहन करीत असला, तरी आपल्या गडाचे चोरदरवाजे त्याने कधीच बंद करून टाकलेले असतात. त्यामुळे त्यांच्यापर्यंत जाऊ इच्छिणाऱ्याला बौद्धिक मेहनतीची कसरत



अध्यक्ष–
मराठी साहित्य
संमेलन,
हैद्राबाद

करूनच ती पातळी गाठावी लागणार असते आणि प्रा. वा. लं. ना. हवे असते ते नेमके हेच.

## अलिप्त कुतूहल

प्रा. कुलकर्णी हे मराठी साहित्यसमीक्षा-क्षेत्रातील एक आघाडीचे टीकाकार असले तरी त्या नेतेपदाचा सवंग अभिनिवेष त्यांच्या विद्यार्थ्यांनाही पाहावयास मिळणार नाही. अनुयायांचा मार्ग सुकर करणारे मार्गदर्शक आपण नेहमीच पाहतो. प्रा. कुलकर्णी यांचे वैशिष्ट्यच हे, की ते अनुयायांचा मार्ग दुष्कर करणारे मार्गदर्शक आहेत. समीक्षाक्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्यांच्या मार्गातील खाचखळग्यांवर प्रकाश टाकण्याचे कार्य ते आवर्जून करतील, पण त्याचबरोबर ते खळगे बुजवून अनुयायांची सुखसोय करण्याचे फाजील लाड ते मुळीच करणार नाहीत.

प्रा. वा. लं. च्या ठिकाणी असणारे साहित्यासंबंधीचे कुतूहल व 'स्व'संबंधीची अलिप्तता त्यामुळेच त्यांच्या साहित्यविषयक दृष्टिकोनास अशा प्रकारची शिस्त लागली असणे शक्य आहे. त्यांच्याच आवडत्या कल्पनेचा आश्रय घ्यायचा तर प्रा. वा. लं. ची भूमिका ही जीवनातून उगम पावणाऱ्या, परंतु प्रत्यक्ष जीवनाने लिप्त न होणाऱ्या कमलपत्राप्रमाणे आहे. त्या विशिष्ट प्रकारच्या अलिप्त कुतूहलामुळेच,

मला वाटते, त्यांना निकटच्या साहित्यिकांच्या लेखनकृतींचा काटेकोरपणे विचार करणे, त्यांचा रास्त कारणांसाठी पुरस्कार करणे व तेवढ्याच रास्त कारणांसाठी त्यावर चौफेर टीका करणेही शक्य झाले असावे.

प्रा. कुलकर्णी यांची समीक्षकाची भूमिका व त्यांची अनाग्रही वृत्ती यात दुरून पाहणाऱ्याला थोडा विरोध जाणवतो. जेथे निर्णय घेण्यावाचून एखादे पाऊल उचलता येणे अशक्य, अशा प्रत्येक पदक्षेपास जेथे भक्कम आधाराची व अविचलित भूमिकेची अत्यावश्यकता व त्यामुळेच त्या भूमिकेमागे खंबीर, अभेद्य, आग्रही दृष्टिकोनाची जेथे अपेक्षा, तेथेच प्रा. वा. लं. ची अनाग्रही वृत्ती प्रकट होताना, एवढेच नव्हे तर निर्धास्तपणे वावरताना पाहून मन स्तिमित होते. त्यांच्या वर्गव्याख्यानांतून नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक लेखनकृतीतून हीच अनाग्रही वृत्ती साक्षेपाने प्रत्ययास येत राहते. वास्तविक या अनाग्रही वृत्तीचे मूळही प्रा. वा. लं. च्या समीक्षाविषयक दृष्टिकोनात रुजलेले आढळते. कारण हा समीक्षाविषयक दृष्टिकोनही अखेर साहित्याच्या साचेबंद शास्त्रावर आधारलेला नसून, तो चैतन्यपूर्ण, विकसनशील व नवनवोन्मेषशाली साहित्याच्या सतत अभ्यासावर अधिष्ठित आहे. साहित्यकृतींचे स्वरूप जीवनाप्रमाणेच नित्य नवे रूप धारण करीत असल्याने त्याचे सम्यक दर्शन एकाच व्यक्तीला एकाच वेळी होईलच, अशी अपेक्षा करणेच जेथे चुकीचे, तेथे त्या क्षणदर्शनाने बनलेल्या आपल्या मताचा आग्रह का धरावा ? प्रा. वा. लं. नी मराठी समीक्षेला दिलेलं हे सामंजस्य अती मोलाचं आहे; म्हणूनच आजची मराठी समीक्षा अत्यंत सावधपणे बोलताना, जपून पावले टाकताना दिसते. कारण समीक्षक हाही अखेर एक वाचक नसतो काय ? त्याअर्थी त्याची त्या साहित्यकृतीकडे जाण्याची वाट ही ‘ एका पावलाची वाट ’ असते. या वाटेने फार तर तो स्वतः त्या साहित्यकृतीकडे जाऊन दाखवू शकेल. इतरांच्यासाठी राजरस्ता तयार करणे हे त्याचे कार्य नव्हे; ती त्याची जबाबदारीही नव्हे; तशी प्रतिज्ञाही नव्हे.

या अनाग्रही वृत्तीमुळेच त्यांना आपले समीक्षालेखन अभिनिवेशापासून अलिप्त राखता आले आहे. “ हे समीक्षालेखन मुख्यतः आत्मसुखार्थ केले आहे, ” ही प्रा. वा. लं. नी मराठीच्या अभ्यासकांना दिलेली स्वतःच्या भूमिकेसंबंधीची गंभीर सूचना आहे. एके ठिकाणी ते म्हणतात, “ आपल्यासमोर असलेली साहित्यकृती ही श्रेष्ठ आहे की कनिष्ठ आहे, चांगली आहे की टाकाऊ आहे, या किंवा यांसारख्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मी क्वचितच समीक्षालेखन केले आहे. ” ह्या विशिष्ट भूमिकेमुळेच प्रा. वा. ल. तात्त्विक स्वरूपाचं लेखनच अधिक करतात, हा जसा त्यांच्या चाहत्यांच्या तक्रारीचा सूर कानी पडतो, तसाच दुसराही एक सूर कानी पडतो. त्यांचे म्हणणे असे, की आजकाल साहित्यिक–जवानांना प्रा. कुलकर्णींचे ‘ एअर कव्हर ’ मिळेनासे झाले आहे. ते त्यांचे कौतुक करता करता त्यांच्यावर कधी उलटतील याचा नेम नाही, इत्यादि प्रा. वा. लं. संबंधी या ज्या गोड

तक्रारी ऐकू येतात, त्यातच त्यांच्या समीक्षेचे दुसरे वैशिष्टय दडले आहे. ते असे की, कोणत्याही साहित्यकृतीकडे वळताना प्रा. वा. लं. ची एकमेव भूमिका ही त्या साहित्यकृतीचे स्वरूप समजावून घेऊ पाहणाऱ्या शोधकाची असते. प्रा. वा. लं. व ती साहित्यकृती यांच्या संवादात त्या साहित्यकृतीला जन्म देणाऱ्याची जवळिक वा दुरावा आड येण्यासारखा नसतो. त्यामुळे त्यांची समीक्षा यत्किंचितही विचलित होत नाही. प्रा. वा. लं. च्या समीक्षेची ही जी नि:पक्षपाती, बाणेदार व प्रामाणिक वृत्ती, तिच्यामुळेच त्यांच्या बैठकीतील साहित्यिकांनाही तिचा भरवसा नसतो. तिचा तिच्या परिचितांना वचक असतो; तर दुसरीकडे तिच्या अपरिचितांना, तिच्या ह्या निर्भीडपणातून दिलासा मिळत असतो. वास्तविक समतोल समीक्षा म्हणजे तारेवरची कसरत ! पण प्रा. वा. लं. च्या समीक्षेने ही वृत्ती निष्ठेने स्वीकारली आहे; सतत अभ्यासाने जोपासली आहे आणि सुजाणपणे तिची मराठी समीक्षा-क्षेत्रात प्रस्थापनाही केली आहे.

## विकसनशीलता

प्रा. वा. लं. ची समीक्षा वृत्तीने चिकित्सक असली तरी अंत:करणाने उदार आहे. जीवनाचे दरवाजे जसे सर्वांना अखंड उघडे असतात, तसे साहित्याचेही असायला हवेत, अशी तिची धारणा आहे. प्रत्येक नवागताची—मग तो कोणत्याही जातीचा, वंशाचा असो— व्यवस्था ज्या उदारपणाने समाज लावीत असतो, त्याच उदारपणाने समीक्षेने साहित्य-क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक लेखनकृतीची—मग ती स्वरूपाने कशीही असो, जातीने कोणतीही असो—व्यवस्था लावणे अत्यावश्यक असते. धारणा करणे हा जसा जीवनव्यवहारासंबंधीचा समाजाचा धर्म, तसाच तो वाङमय-व्यवहारासंबंधीचा समीक्षेचाही धर्मच असतो. समाज मानवी जन्म नाकारू शकत नाही, समीक्षेलाही एखाद्या साहित्य-कृतीचा जन्म नाकारता येणार नाही – मग ते नाटक असो, की एक भावकाव्य असो.

प्रा. वा. लं. च्या समीक्षेचे हे औदार्य दुसऱ्या एका बाजूनेही लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांच्या मते श्रेष्ठ कलाकृती या त्यांच्या श्रेष्ठत्वामुळे जशा समीक्षेला उपकारक ठरतात, तशाच सामान्य साहित्यकृतीही आपल्या सामान्यत्वामुळेच समीक्षेला उपकृत करीत असतात. कारण श्रेष्ठ साहित्यकृतीचे श्रेष्ठत्व जसे समीक्षेला एक गूढ वाटत असते, तसेच सामान्य साहित्यकृतीचे सामान्यत्वही समीक्षेला एक गूढच असते. श्रेष्ठ साहित्यकृतीच्या श्रेष्ठत्वाचा शोध हा सामान्य साहित्यकृतींच्या सामान्यत्वाच्या शोधावरच उभा असतो. म्हणूनच खऱ्या समीक्षकाने सर्वच साहित्य-कृतींना एका विशिष्ट मर्यादेपलीकडे समदृष्टीने वागविणे आवश्यक असते. प्रा. वा. लं. च्या या सहिष्णु समीक्षा-दृष्टीने एकीकडे साहित्यसंसारातील कितीतरी लेखन-कृतींना अभ्यासाचे व व्यवस्थापनेचे आश्वासन दिले आणि त्याचवेळी समीक्षा-क्षेत्रात स्थिर होऊ इच्छिणाऱ्यांच्या दृष्टीपुढे कर्तृत्वाचे एक विशाल दालन खुले केले.

विकसनशीलता हा प्रा. वा. लं. च्या समीक्षेचा प्राण आहे. अखंडप्रवाहित्व, नित्यनूतनत्व व विकसनशीलता हे जीवनाचे धर्म साहित्यात व साहित्याद्वारे समीक्षेत अपरिहार्यपणे उतरत असतात, हा प्रा. वा. लं. यांचा एक आवडता विचार आहे. स्वत: प्रा. वा. लं. ची समीक्षा अशीच साहित्याच्या काठाकाठाने प्रवास करीत आलेली दिसते. त्यांच्या समीक्षाविषयक लेखनांच्या साह्याने तिच्या या प्रवासाचा आलेख निश्चितपणे काढता येणे शक्य आहे. 'वाङमयातील वादस्थले,' 'वाङमयीन मते आणि मतभेद,' 'वाङमयीन टीपा आणि टिप्पणी,' 'वाङमयीन दृष्टी आणि दृष्टिकोन' व 'साहित्य आणि समीक्षा' ह्या सर्व ग्रंथांतील वा. ल. जेवढे एक आहेत, तेवढेच विविधही आहेत. प्रत्येक ग्रंथातील वा. लं. आपली जणू नव्याने ओळख करून देत आहेत, असे वाटते. हे चिरतारुण्य प्रा. वा. लं. च्या समीक्षेला कसे लाभले ? सतत तीन दशके प्रवास करूनही तिला आपला टवटवीतपणा कसा टिकविता आला ? याचे उत्तर एकच आहे. ते असे की प्रा. वा. लं. नी आपल्या समीक्षेचे शास्त्र केले नाही. स्वतःच्या विचारशक्तीला शास्त्राचे तीक्ष्ण, काटेरी कुंपण घातले नाही. शास्त्राचा गौरव त्यांनी शास्त्रीय दृष्टिकोनाचा अंगीकार करून केला, पण 'शास्त्र' बोलण्याचे मोठ्या नम्रतेने नाकारले. समीक्षेला शास्त्राच्या सामोरी नेऊन त्यांचा परस्परसंवाद साधला, तरीही त्यांनी तिला शास्त्राच्या आहारी जाऊ दिले नाही.

त्यामुळेच प्रा. वा. लं. ची समीक्षा थिजली नाही; आत्मसंतुष्ट होऊन स्वत:भोवती गरगरत राहिली नाही; की स्वत:च्याच तत्त्वकोषात बंदिस्त होऊन पडली नाही. ती सतत पुढे जात होती आणि पुन्हा पुन्हा मागे वळूनही पाहत होती असे दिसते.

एकूण साहित्यासंबंधीचे अखंड कुतूहल व समीक्षेसंबंधीचा एक ठाम दृष्टिकोन यामुळेच प्रा. वा. लं. च्या समीक्षालेखनाला विषयदृष्टचा मर्यादा पडू शकल्या नसाव्यात, असे वाटते. कविता, लघुकथा, लघुनिबंध, चरित्र, आत्मचरित्र, प्रवास-वर्णन, बालवाङमय, एकांकिका, नाटक व कादंबरी इत्यादी साहित्यप्रकारांना त्यांच्या समीक्षेने समभावाने वागविले आहे. स्वत:च्या भूमिकेवरील तिची पकड एवढी पक्की आहे, की त्यामुळेच इतके साहित्यप्रकार हाताळूनही त्यासंबंधीच्या तिच्या चिंतनात तिने यत्किंचितही विरोध वा विसंगती येऊ दिलेली नाही.

प्रा. वा. लं. च्या समीक्षेचे आवाहन स्वकालीन साहित्यापुरतेच मर्यादित नाही. सर्वकालीन सर्व साहित्यकृतींबद्दल तिला सारखीच आत्मीयता वाटत आली आहे. प्रत्येक काळ हा आपल्याबरोबर जसे जीवनविषयक काही वैशिष्टचपूर्ण प्रश्न घेऊन येत असतो, तसेच त्या विशिष्टकालीन जीवनानुषंगाने तो काही वैशिष्टचपूर्ण असे साहित्यविषयक प्रश्नही घेऊन येत असतो. ह्या प्रश्नांची कोडी उलगडत असता त्या काळातील एखाद्या साहित्यिकाला एखादे नवे साहित्यमूल्य गवसण्याची वा

जुन्या मूल्यांचा नवा अर्थ प्रतीत होण्याची शक्यता असते. ते नवे मूल्य वा जुन्या शाश्वत मूल्यांचा तो नवा अर्थ जुन्या साहित्याच्या नव्या अभ्यासाने जोखून घेण्याची आवश्यकता असते. साहजिकच नव्या साहित्याचे स्वरूप लक्षात घेऊनच समीक्षकाला भागण्यासारखे नसते, तर त्या साहित्याने प्रकाशमान केलेल्या नव्या मूल्यांच्या वा अर्थांच्या संदर्भात त्यापूर्वीच्या सर्व साहित्याची पुनर्व्यवस्था करणेही अत्यावश्यक असते. प्रा. वा. लं.नी नव्या समीक्षेला दिलेली एक गंभीर सूचनाच म्हणावी लागेल.

## प्रवाही चिंतन

शोधकाच्या भूमिकेतून साहित्याला सामोरे जाणारे हे जिवंत मन लाभल्यामुळेच की काय, प्रा. वा. लं. ची समीक्षा ही अखेर एका सर्जकाच्या-नवनिर्मात्याच्या-भूमिकेत विलीन होऊ लागते. त्यांची समीक्षा एका विशिष्ट साहित्यकृतीचे परीक्षण करते, असे म्हणण्यापेक्षा त्या साहित्यकृतीच्या संदर्भात आपल्या साहित्यासंबंधीच्या अखंड चिंतनालाच गोचर करीत असते, असे म्हणणे योग्य ठरेल. त्यामुळेच प्रा. वा. लं. ची खरी साहित्यसमीक्षा त्यांच्या प्रकाशित ग्रंथात नसून, त्यांच्या साहित्या-संबंधीच्या प्रवाही चिंतनात आहे. म्हणूनच प्रा. वा. लं. चे समग्र ग्रंथ वाचूनही अखेर वा. ल. वाचावयाचे उरतातच ! आणि प्रकट वा. ल. वाचणे जेथे जिकिरीचे, तेथे अप्रकट वा. ल. समजावून घेणे कोण कठीण होते.

मध्यंतरी प्रा. वा. लं. नी आकाशवाणीसाठी एक भाषण दिले. वास्तविक हे भाषण होते अवघ्या १५ मिनिटांचे. विषय होता तसाच थोडाफार सरधोपट. बोला-यचे होते प्रा. वा. लं. नाच; पण म्हणून काही ते निर्धास्त नव्हते. त्यांच्या त्या अखंड चिंतनाने त्यांना ओढून नेले होते कधीच त्या गूढ पुराणकाळात. ' साहित्य आणि इतिहास' यांची नाती तपासता तपासता प्रा. वा. ल. त्या पुराणांच्या जंजाळातच प्रवेश करून बसले होते. विचार ढवळत होते, नवी नवी सत्ये प्रकाशमान होत होती, नवे अर्थ गोचर होत होते, विचारांचे नवेच आकृतिबंध जुळून, चमकून अदृश्य होत होते. पुराणांच्या त्या पुराणजाळ्यात प्रा. वा. लं. नी स्वतःला खुशाल गुंतवून घेतले होते आणि त्या अजस्र जाळ्यातील एक एक धागा अत्यंत सावधपणे ते सोडवू पाहत होते.

थोडेफार लिहिलेले कागद त्यांनी आमच्यापुढे टाकले आणि आम्ही आमच्या तोकड्या विचारशक्तीने त्या लेखनाच्या स्वरूपाचा अंदाज घेऊ लागलो. कारण हे जे जन्माला येत होते, ते स्वरूपाने ललित नसले तरी वृत्तीने ललितच वाटत होते; कारण नवे दर्शन घडविण्याची ते प्रतिज्ञाच करीत होते. ती एक साहित्यकृती नव्हती, पण तिची निर्माणप्रक्रिया एखाद्या जिवंत कलाकृतीच्या निर्माणप्रक्रियेशी सदृश निश्चितपणे होती. त्या नवनिर्मितीच्या उन्मेषात प्रा. वा. लं. ची समीक्षा चिंब न्हाऊन थेंबाथेंबाने निथळत होती.

— आणि स्तिमित होऊन आम्ही तो जन्मसोहळा अवलोकित होतो; नव्हे, अनुभवीत होतो.

● ●



# हिरवा क्षण

सौ. जयश्री खिरे

सुधाचे डोळे लकाकतात. तो क्षण तिने पकडलेला आहे. सर्वांच्या तिच्याकडे पाहण्यात आता याची जाणीव आहे, की ती तरुण आहे.

सुधा बाहेरच्या अंगणात बसली आहे. नहमीच्या पद्धतीनं नाही. तिला बसायलाही दुसऱ्याची मदत, बसण्यासाठीच नाही, प्रत्येक गोष्टीसाठी. सकाळचं ऊन अंगावर घेण्यासाठी ती वसली आहे, अंगणातल्या आरामखुर्चीत. खरं तर पडली आहे. हे पडणंच तिला अधिक जवळचं. अधिक परिचयाचं. या पडण्याखेरीज तिच्या शरीराला दुसरी स्थिती नाही. तिच्या पायांना फारसं चालणं ठाऊक नाही. ती घरातून बाहेर आली. आरामखुर्चीत बसली. तिच्या पायांनी नाही. काही वेळानंतर ती घरात जाईल तेही तिच्या पायांनी नाही. तिला आणावं लागतं. न्यावं लागतं. तिच्या आयुष्यानं सांगायचं, दुसऱ्यानं त्याप्रमाणे करायचं.

तिनं वाचायला घेतलेलं पुस्तक तिच्या कृश अंगावर, तिच्या शरीरावर गळून पडलेलं. तिच्या कृश हातांना ते पुस्तक धरवत नाही, पण गळून पडलेल्या त्या पुस्तकाचं इवलं शरीर, त्याचाही भार तिला सहन होत नाही. पुस्तकाच्या दडपणाखाली तिचं शरीर पिचून गेलं आहे.

ती कष्टानं हात उचलते. पुस्तकाशी हात नेते. मग पुस्तक उचलून खाली अंगणाच्या मातीत टाकून देते. माती ओली असली, तर तिचे डाग पुस्तकातली अक्षरं धरतात. पुस्तक खाली टाकून दिलं तरी शरीरावरचं ओझं तसंच आहे. पुस्तकात वाचलेलं ते छातीवर दबा धरून बसलं आहे. गळा आवळून दाबून धरत आहे. पुस्तकाचं हे दुसरं ओझं. श्वास गुदमरतो. सुधा घुसमटून श्वास घेण्याचा प्रयत्न करते.

'सुधा ऽऽ सुधा '—दूरवरून आलेल्या हाका जवळून येतात. कुणीतरी तिच्या तोंडात पाणी ओततं. पाण्याचा घोट खाली उतरतो. सुधा समोर पाहते. तिला तहान लागलीय, हेही दुसऱ्यानं ठरवायचं.

कुणीतरी तिला हलकेच उचलून आत नेऊ लागतं. उचलणाऱ्याचं हळूवारपणं तिला जाणवतं, पण वेदना तुटत नाही, शमत नाही. सुधा दुखावली जाते. डोळ्यांपुढे पलंग येतो. मग जाणिवा एकवटून ती म्हणते,' नको, आत नको नेऊ मला. जरा वेळ इथंच पडू दे मला. पलंगावर झोपणं म्हणजे दुखण्यावर झोपणं. '

तिला खाली ठेवलं जातं. पुन्हा खुर्चीत. लांबलचक वाक्य बोलताना तिला दम लागतो. तिची इच्छा मोडली जात नाही. तिला तिथंच बसायला मिळतं.

ती डोळे मिटून घेते. डोळ्यांसमोर पलंग. पलंगासमोरची भिंत सारखी नजरेला. भिंतीवर पाल असतेच. पालीला भिंतीचं भय नाही. पालसुद्धा एकसारखी एका जागी. तिला कंटाळा येत नाही. आपल्याला कंटाळा. आपल्याला भय पलंगाचं. पाल भिंतीला खिळलेली सुखानं. आपण दुःखानं. दुखण्यानं. म्हणूनच ही तळमळ.

पण पालीची सोबत तिला आवडते. पालीची सोबत ती होते. दिवसान् रात्री. रात्री तर पालीच्या शरीराची मूक स्पंदनं ती डोळ्यांनी टिपत राहते. पालीची सोबत असली, की भिंतीवरच्या सावल्या तिला काही करत नाहीत. पाल सारखी त्या सावल्यांवर धावून जाते. रात्रीच्या अंधारात समोरची झाडं मरून जातात. त्यांची सळसळ सावल्यांतून जिवंत होते. मग पालीचं सारखं धावून जाणं सावल्यांवर, पण समोरच्या भिंतीवरची पाल वर आल्यावर गेली, की मात्र सुधा विलक्षण भयभीत होते. आपण झोपलं तर ही पाल वरून आपल्या अंगावर पडेल. आपल्याला निर्जीव समजून. आपल्याला उठता येणार नाही. आपल्याला पळता येणार नाही. तिला हे भयानक वाटतं. किळसवाणं. मग ती झोपत नाही. एकटक पाहत पालीबरोबर नजरेनं खिळून राहते.

सुधा समोर पाहते. समोर कुणीच नसतं. दूरवरपर्यंत कुणीच दिसत नाही. बाजूची झाडं, वेली, समोरची निस्तब्ध पोकळी. ती एकटी पडून राहते. हालचाल न करता डोळे मिटून घेते. क्षणभर श्वास रोखून धरते. मग नंतर आपण अशाच होऊ. निश्चल. डोळे मिटलेले असतील. श्वास बंद असेल. बाकी सारं असंच असेल की निराळं? स्वतःच्या कल्पनेची तिला भीती वाटत नाही. ती श्वास सोडते. हळू. सगळं कसं सोपं आहे. साधं आहे. त्या पलंगावर पडून राहण्यापेक्षा हे किती छान. सहज. पण काहीतरी खटकतं. राहिल्यासारखं वाटतं. राहिल्यासारखं ते विसरलेलं. चुटपुटती हुरहुर. त्या हुरहुरीच्या कळा मोठ्या. जाणिवा मोठ्या. सुधाच्या डोळ्यांत पाणी चमकतं. मघाची कल्पना आता भयानक वाटते. कुणाचा तरी आधार हवासा वाटतो. कुणाचा आधार? आईचा? बाबांचा? ताईचा? त्यांचा आधार वरवरचा. सहानुभूती वरवरची. पोकळ. त्यांना माहीत आहे, आपण मरणार आहोत. त्यांना माहीत आहे, आपल्याला सारं कळलंय. रडायला लागलं की सगळे गप्प होतात. जणू त्यांचाच गुन्हा. जणू तेच अपराधी. चिडलं की सगळे समजूत घालतात. मऊमऊ बोलतात. कुणी तिच्यावर चिडत नाही. तिच्यावेगळं बोलत नाही. सगळं तिच्या मनासारखं. तिला जपणारं. पण सगळ्यांच्या चेहऱ्यावर एक भाव —पराधीनतेचा. आम्ही काही करू शकत नाही. कसली तरी वाट पाहत असल्यासारखे त्यांचे शब्द. ते बोलतात एक, आपल्याला ऐकू येतं वेगळंच. शब्दामागचं डोळ्यांपुढे दिसतं. शब्दांमागचं काळं सरसरून येतं.

किती दिवस झाले आपण बाहेर गेलो नाही. कुणाच्यात मिसळलो नाही. सगळे आपलं मन रमवायचा प्रयत्न करतात, पण ती वेगळ्या जगातली वाटतात. पुढचे बेत, पुढच्या आकांक्षा त्यांच्या डोळ्यांपुढे. आपल्यापुढे सगळं सपाट. सपाटीलाही स्पर्श नाही. गंध नाही, आवाज नाही. आपलं जग वेगळं. मरणाचं जग. जगावेगळं जग. किती अज्ञात. यापूर्वी कुठं पाहिलं आपण? पहिल्याप्रथम पाहतो. त्या जगातलं कुणी येऊन सांगत नाही— ते जग कसं असते? त्या जगाबद्दल कुणी लिहून ठेवलेलं

नाही. जातो तो जातोच. गूढ अज्ञात जग. तिथं मनोराज्य नाहीत– इथल्यासारखी.

दादाला खूप शिकायचं आहे. ताईचं लग्न ठरवायची खटपट चालली आहे. ती स्वप्न रचते आहे– प्रीतीची, संसाराची आणि आपण ? आपल्या या जगात स्वप्न नाहीत. तिथं काय आहे ? कुणास ठाऊक ? आपल्या ' त्या '–' या ' दोन जगांमधला प्रवास अंधाराचा आहे. डोळे फाडून पाहायचा प्रयत्न केला तरी काही दिसत नाही. काही स्पर्शत नाही. काही श्रवत नाही. त्या जगाचे वेध आपल्याला केव्हापासून लागले आहेत. डॉक्टरांनी आपण बरं होण्याची आशा सोडून दिली, तेव्हापासून आपल्या वाटणाऱ्या घरातल्या माणसांमध्ये दूरस्थतेची भावना आली तेव्हापासून. दोन वर्षांच्या सततच्या दुखण्यानं आपण ह्या जगातून दूर गेलो आहोत–मनानं–जाणिवेनं. आता फक्त तो एक क्षण–ज्याची आपण वाट पाहत आहोत–तो क्षण, नव्या जगात जाण्याचा.

तो एक क्षण मृत्यूचा, पण त्या आधी ती एक इच्छा. आजवर मनात जपलेली, जोपासलेली, वाढलेली, अंकुरलेली.

पुस्तकात वाचलेला मघाचा भाग सुधाच्या नजरेपुढे डोकावून जातो. तिच्या अशक्त पण तरुण शरीराच्या उरल्यासुरल्या जाणिवा मोहरतात. नायकनायिकेच्या प्रीतीचं पुस्तकातलं वर्णन तिला आठवतं. मग ती स्वतःशी म्हणत राहते. ' एकदाच...' एकदाच...... कुणीतरी आपल्यावर प्रेम करावं, प्रेमानं बोलावं, निदान प्रीतीचा एक दृष्टिक्षेप तरी आपल्याला मिळावा, ही तिची उत्कट इच्छा. तिला आश्चर्य वाटतं, वाईट वाटतं. सगळे आपल्याला एवढं जपतात, पण कुणाच्याच कसं लक्षात येत नाही. आपण शरीरानं, मनानं लहान होत आहोत, शून्यात मिसळणार आहोत, पण आपलं वय, आपल्या जाणिवा, त्याचं तरुणपण ते कसं कुणाच्याच लक्षात येत नाही ? की मुद्दाम त्यांकडे डोळेझाक ? शून्यात विरघळणारं हे हिरवं–शून्याला काय त्याचं ? किती वय असलं तरी त्याला त्याचं काही नाही. लाल-गुलाबी असलं, हिरवं असलं किंवा समोरच्या त्या पिकल्या पानासारखं पिवळं असलं तरी शून्याला त्याचं काय ? त्याचं रसायन एकच. कुठलाही रंग त्यात टाका, त्याचं रसायन एकाच रंगाचं.

समोरच्या पिवळ्या पडलेल्या पानाकडे पाहता पाहता सुधाचं लक्ष समोर जातं. तिच्या अंगातून शिरशिरी जाते. समोर दिसणाऱ्या लांबलचक कंपाउंडच्या पलीकडे हल्ली हे मवाल्यासारखे दिसणारे दोघे नेहमी दिसतात. सुधाला रोज सकाळी कोवळं ऊन घेण्यासाठी अंगणात आणून ठेवलं जातं. डॉक्टरांनी कधीतरी सांगितलेला हा एक उपाय. त्याचा काही उपयोग नाही, हे सर्वांना माहिती, पण इतर सर्व औषधी उपाय थकले आहेत. आता औषधं पाहिली, की इंजेक्शनं दिसली की सुधा चवताळते. दोन वर्षं तिनं हे सारं सोसलंय. सुरवातीला तिनं हट्टीपणा केला, पण तिला आलेल्या आजाराचा गंभीरपणा कळल्यावर ती सारं सोशिकपणे घेऊ लागली. मृत्यूच्या भीतीनं की जीवनाच्या आसक्तीनं ती आयुष्याची खुंटी आवळून धरू लागली, पण

आता तिचे हात थकले आहेत आणि इतरांचेही. खुंटी तिच्या हातातून निसटली आहे. ती मध्येच लोबकळत आहे. जीवनमरणाच्या सीमारेषेवर. आता सुधा कुठलाही उपाय करू देत नाही. कित्येकदा जास्त झाल्यावर तिला गुंगीची इंजेक्शने द्यावी लागतात. अंगणात आरामखुर्चीत पडण्याला मात्र सुधाचा कधी विरोध नसतो. इथं बसून बागेकडे पाहण्यात, जमेल तर वाचण्यात सुधाला बरं वाटते. कित्येकदा मोकळ्या हवेत तिला छान झोपही लागते.

हल्ली दोन दिवस मात्र सुधाची नजर बागेवरून बाहेरच्या कंपाउंडकडे पोहोचते. बागेच्या कडेला लावलेलं मेंदीचं कुंपण मध्येच मोडून पडलं आहे. परवा एकदा रात्री गाय आत शिरली होती. तिनं हे कुंपण मोडलं आहे. त्यामुळे आता बाहेरचं कंपाउंड सुधाला स्पष्ट दिसतं. दोन दिवस झाले, हे दोघं इथं कशाला येतात, ह्याचं सुधा आश्चर्य करते. आताही तिला ते तिथं दिसतात. त्यांच्या येण्याचं कारण सुधाला कळतं. कंपाउंडच्या दुसऱ्या टोकाला चौक आहे. भांडी घासण्यासाठी तिथं येणाऱ्या मोलकरणीकडे पाहत ते दोघे मवाली हसत असतात. त्यांपैकी कुणाला तरी काही खूण करतात. पुन्हा हसतात, कसलं तरी वेगळं–विचित्र. त्यांचे पान खाल्लेले दात दिसतात. त्यांपैकी एक वर पाहतो. त्याचं हसू, त्याची नजर दातांसारखीच किडलेली, किळसवाणी. सुधा दचकते. एकदम भय घेते, घाबरते, पण पुन्हा तिकडंच पाहू लागते. ते दोघे काही बोलत–हसत असतातच. सुधाला चक्कर येते. खुर्चीच्या काठावर ती डोकं टेकते. तिची नजर समोर. घशाला. कोरड पडते घाम आल्यासारखा वाटतो.

पुस्तकातलं सार सुधाच्या डोळ्यांभोवती फेर धरू लागतं. ती छातीवर हात दाबून धरते. मघाच्या त्या एका विचारानं ती तळमळू लागते. तो क्षण तिच्याकडे कधीच येणार नसतो. त्या क्षणाला धरून तिला शून्याकडे जायचं असतं. तिला पालीची सोबत नको असते. तो एकच हिरवा क्षण तिला हवा असतो. त्या क्षणाची सोबत ती घेणार असते– न जन्मणाऱ्या न येणाऱ्या ... तो क्षण नाहीतर त्याचा आभास ... आभास तरी ... सुधा दचकते. आभासाची तिच्या मनातली कल्पना तिला शिसारी आणते. समोरच्या मवाल्यासारखी किळसवाणी; तरी त्याच्याकडे पाहायला लावणारी.

सुधाचा ओठ दातांखाली चिरडला जातो. ती काहीतरी ठरवल्यासारखी मान हलवते आणि तिच्या तोंडून एकाएकी किंकाळी फुटते– ' आईऽऽ आई– '

आपल्याच किंकाळीचा आवाज तिला वेधून जातो. ती डोळे मिटते आणि एकाएकी हुंदके देऊ लागते. घरातले सगळे तिच्याभोवती हजर असतात.

" सुधा ऽऽ सुधा, काय झालं ? " कुणीतरी तिच्या तोंडात पाणी घालतं. तिला उचलून आत नेलं जातं.

" सुधा ऽऽ सुधा, काय झालं ?" हे घाबरे प्रश्न चालूच.

सुधाचे फक्त हुंदके.

'थांबा, असं घाबरवू नका तिला.' हा कुणाचा आवाज ? बाबांचा. त्यांचा अधिकारी स्वर तिच्या परिचयाचा. 'सगळे आधी बाहेर जा पाहू.'

आईबाबांखेरीज सगळे बाहेर.

सुधा घसकल्यासारखी, पण आता माघार नको ... नको तो आभासाचा हिरवा क्षण तिनं मुठीत घट्ट पकडला आहे.

आईचा मायेचा हात पाठीवर फिरतो. आता तो परका वाटत नाही. त्यातली माया सुधा पीत राहते.

'सुधा, काय झालं, सांग. बाळा...' बाबांची मायेची हाक. सुधा सर्वांत धाकटी. लहानपणी बाबांची फार लाडकी, पण हल्ली तेही सुधाच्या आजारानं चिडचिडलेले.

'सांग, सुधा काय झालं ? कुणी काही केलं ? कुणी काही बोललं ?'

सुधाचे हुंदके किंचित विलग होऊ घातलेले. थांबून येणारे.

सुधा मान हलवते.

आता मात्र बाबा जवळ येऊन बसतात. पाठीशी आई, पुढे बाबा. सुधा सुरक्षित.

'समोरचा तो मवाली मला खुणा करीत होता.'

'कोण मवाली ?' बाबांचा आवाज मघाचा समंजसपणा विसरतो. सुधा कसं-तरी सांगते. मान टाकते. वर न पाहता पडून राहते.

आई तिला सावरते. नीट विचारायचा प्रयत्न करते. तोवर बाबांनी त्या दोघांना खेचून आणलेलं असतं.

बाबा सुधाला काहीतरी विचारतात. काय ते तिलाही समजत नाही. ती फक्त एकाकडे बोट दाखवते. पडल्या पडल्या.

संतापलेले बाबा, बाहेरून आवेशानं आलेला दादा, दोघे त्याच्यावर तुटून पडतात. तो आपली बाजू सांगत असतो, पण बाबांच्या गडगडाटात, लाथाबुक्क्यांच्या वर्षा-वात तो कुठल्याकुठे विरतो. आई, ताई दबकून जातात. नोकर, शेजारी जमतात. सर्वांची सहानभूती सुधाकडे ... आणि सुधा.

सुधाचे डोळे कसलं आसुरी तेज घेऊन लकाकतात. ती हसत असते. आतल्या आत मनातल्या मनात. तो हिरवा क्षण तिनं पकडलेला असतो. तिच्याकडे सर्वांच्या बघण्यात आता वेगळी भावना आहे, हे तिला जाणवतं. आता ती केवळ अशक्त, आजारी, दुबळी नाही. आता ती अशक्त, आजारी, पण तरुण मुलगी आहे.

आता यापुढे आई तिला वेगळ्या भावनेनं जपणार आहे. बाबा, दादा तिचे रक्षणकर्ते होणार आहेत. आता सुधा मरणार आहे, पण वेगळी होऊन, तरुण होऊन. त्या शून्याला काही नसेल त्याचं. त्याचं रसायन एकच, पण ही मागे राहिलेली, ह्या वेगळेपणानं, ह्या वेगळ्या जाणिवेनं तिच्या मृत्यूकडे पाहणार आहेत.

• • •

" ती आली तवा मी ल्हानगा हुतो.
आसन् आटनौ वर्साचा..."
–तिची ही कथा.

# सोनी

## म हा दे व मो रे

ती आमच्याकडं आली, तवा मी ल्हानगा हुतो. आसन् काय तरी आटनौ वर्सांचा. इत्काच. पर जास्त न्हाई. माजा आजा नि आजाचा दोस्त गोपाळ तिप्पे ह्यास्नी बैलांचा जबर नाद. आज काय तर मुरगुडचा बाजार, परवा कोल्हापूरचा, तेरवा संकीसूर, हे आसं दोघांचं हेलपाटं चालायचं...

अशाच एका हेलपाटचास्नं आजानं एक म्हस आणली. ह्या दुभत्या म्हशीबरोवर एक रेडकूबी हुतं. कुऱ्यागत बारकुलं. आणि सोनी म्हंजे हीच.

दोन वरसं सोनीच्या आईनं आमास्नी दूध दिलं. फुढं गाभ गेली नि याय् झाल्यावर पोटात कसलासा आजार हून एक दिवस गोठ्यातच मरून पडली.

सोनी पोरकी झाली. 'आंय् आंय् ऽ' करून आरडत दोन-तीन दिवस तिनं सारा गोठा डोक्येवर घेतला...दिवस लोटतील तसं इसराय् लागली...मारवेलाचं गुलवेदार गवात चापलत प्वाट भरू लागली...

रोज सकाळी आई सोनीला मोकळी सोडी नि तिच्याबरोबर मला पिटाळी. लव्हारांच्या सोनाक्काचीबी ढोरं हुती. त्या ढोरांत मी सोनीला उस्कली नि सोनाक्काबरोबर निघे...कोल्हापूर नाक्याफुढल्या लेंढवडचात आम्ही ढोरं घुसवी. वाडचाकडंचं दडु दांतलत दांतलत ढोरं पोलीसच्या शेतापतोर जात. पोलिसाचं श्यात माज्या गोपामामानं केल्यालं. तवा ते आमचंच. त्या शेताच्या माळाला ढोरं सोडली, की बिनघोरी वाटायचं...थोरल्या मामाचा म्हारुत्यावी ढोरं घिवून यायचा...ढोरं माळाला ताणून देऊन वडचातल्या पाण्यात चिंगळचा, खेकडं हुडकत आम्ही न्हायचं. एखादं खेकडचाचं पेटुक, न्हाईतर आख्खा मोठा खेकडा गावला, की आम्ही माळाला योचं नि चगाळचोथा गोळा करून त्यो भाजून कुडुम् कुडुम् आवाज करीत खायाचं. ह्यात सोनाक्काचीबी वाटणी असायची!

सांजचं घराकडं परत येतावख्ती सोनीचं प्वाट टुम् फुगल्यालं असायचं !

मामाच्या, लव्हाराच्या नि अशाच दुसऱ्यांच्या ढोरांसंगी सोबतीनं सोनी नाव नाव मोठी व्हाय् लागली. तिचा काळाकुळकुळीत रंग तव्याच्या शाईगत दिसायचा– यऊशार, तकाकीत नि देखणा. तिची दोन्ही शिंगं इळचाच्या पात्यावानी मनोहारक वळणं घेत मागं वाढाय् लागली व्हती. डोळं एका निराळयाच तेजानं लकाकाय् लागलं व्हतं आन् तिचा बांधा इत्का गच्चोगची भराय् लागला व्हता, की आई तर रोज सांच्चं तिच्यावरनं मीठ–मिरच्या वव्वाळून टाकायची– ढॉर दिस्टचावू ने म्हणून !

अशी सोनी वाढ वाढ वाढली नि आवचीत एका दिशी ' आंय् ऽ आंय् ' करून जोरजोरानं आरडू लागली. चराय् सोडली तरी कानांत वारं शिरल्याल्या वासरागत वेजान वेगानं दिक्पाल झाल्यागत पळून जाऊ लागली आनी मग तिला हुडकून घराकडं आनस्तोवर माजी पेकाटं ढिल्ली व्हाय् लागली. मी रंजीस याय् लागलो. लिंगडीच्या छप्पीनं तिला झमाझम् झोड्पू लागलो... एक दिशी वा म्हणाला, " ह्रिला रेडा दाखवाय् पायजे. जा, न्हाव्याचा रेडा सांगून ये जा."

मला हे समजंना, रेडा दावल्याबर अशी खुळचा कावऱ्यागत करणारी सोनी परत श्यानी हून ढोरात कशी काय येणार ?एक हुमानच पडलं मला हे, पर थोरल्या मान्सांचं आपणाला काय कळतंय्, असा भावरथी इचार करून म्या न्हाव्याचा रेडा सांगून आलो...



सोनी गाभ गेली. नाव नाव मोठी व्हाय् लागली, आदीपरास थोराड व्हाय् लागली... पैलगत सोनीच्या पाठीवर बसून मी सांजचं चारून याय् लागलो, की बा एक वादाडात ठेवून देऊ लागला. पाठीवर बसायचं न्हाई म्हणू लागला...

सोनीला चारावाय् न्हेल्यावर कराळचाच्या, बागलाच्या म्हशींबरोबर मी सोनीची टक्कर लावायचा. टक्करीत सोनी त्या म्हशीस्नी हा हा म्हणता पळवून लावायची! आनी मांडी उघडी करून काड्दिशी शड्डू मारीत मी म्हणायचा, की माज्या सोनी बरोबर टक्करीत टिकणारी म्हस उभ्या गावात न्हाई ! माजी ही शर्त ऐकून पाटलाचं बसगौंड्या आपली म्हस घिवून आलं...लावली दोन्हींची टक्कर ! कडाकड् शिंगं वाजाय् लागली...एक दुसरीला शिंगांचं खोंबारं लागाय् लागलं...काळचा कातडीवर ताज्या, लालभडक रक्ताचं ओरबाडं दिसाय् लागलं...खुरानं माती उडू लागली... एक दुसरीला आटपंना ! दोगीबी सारख्याला वारक्या होत्या ! आता ही टक्कर कशी सोडवावी समजंना ! बगणारी आमी सारीच घाबरून घट्ट झालो ! एवढचात बसगौंड्याच्या म्हशीनं सोनीला रेटर रेटत मागं न्हेलं...मागं दगडाची खाण व्हती... मागं सरत सरत भाम न्हाई ते आवलगामी सोनी गेली ती सरळ खाणीत पडली– चांगली तीन–चार वाव उंचीवरनं ! माज्या पायांतनं वारं गेल्यागत झालं. मी माट्कन् खाली बसून रडायच लागलो...एवढया उंचीवरनं कोसळली, तवा आता सोनी मेलीच वाटलं अन् मी मोठमोठयानं रडाय् लागलो–टाळा पसरून...पर खाणीतनं सोनी आरडल्याला आवाज आला, तसा चाट्शिरी तिकडं धावलो...सोनी उठून उभा न्हायली व्हती...घाबरून आरडत व्हती...पळत पळत पल्याडल्या वाटनं खाणीत गेलो नि सोनीला वर आनली...वर आली ते सोनीनं सरळ घर गाठलं...गोठयात येवून बसकण घेतली...तवर साऱ्या गावभर बोंब–सोनी खाणीत पडली ! सोनी खाणीत पडली–टक्कर खेळताना ! सारी आमच्या घराकडं...यवड्या उंचीवरनं पडूनवी सोनी वाचली कशी ? आनी चालत घराकडं आली म्हंजे एक व्हकच !– आसं साऱ्यांचं.

बाला हे समजाय कितीसा येळ ? घरात यताच पयल्याझूट त्येनं च्याबूक घेतला नि मला हिवं निळं केलं आणि मगच गोठयात गेला !

भाम न्हाई त्ये तवाच्या एका भिरमीटीत सोनी घराकडं आली व्हती......पर गोठयात येवून बसकण घेतली ती उठंना......पंद्रादी तिच्या पाठीवर, बरगड्यावर चराचरा शेकलं, आनीक काईवाई मुळ्या चारल्या, तवा ती हाताला लागली. तिच्या साऱ्या बरगड्या कुस्करल्यागत झाल्या हुत्या. मुका मार लागला व्हता......माणूस असतं तर इवळत बसलं असतं. भडाभडा बोलून काय ते 'व्हय-न्हवं' सांगितलं असतं...पर हे मुकं जनावार...आमी गोठयात गेल्यावर टकाटका बगाय लागायचं... माझ्या तर काळजात झार् झार् व्हायचं. आपसुक डोळं भरून याचं...

सोनी बरी झाली. हिंडू फिरू लागली...आसंच आनीक काई म्हैने सरलं...एक

दिशी सकाळचा उठून मी गोठ्यात गेलो नि अप्रुप घडल्यागत दिसलं... गोठ्यात एक रेडाक् धडपडत हुतं...सोनी रातीच कवा याली हुती तर ! सोनीनं रेडी दिली व्हती. (सोट्टभैरी रेडा नव्हं !) मी मनोमनी हारकून गेलो...

त्या दिशी आईनं गिन्ना केला. गुळमाटढयानं बर्फीवानी लागत्याला त्यो गिन्ना झाकणीत घिवून मी गोठ्यात गेलो...त्या बारक्या रेडीच्या डोस्क्यावर, आईनं सांगितल्यासारखं, गिन्न्याचा एक एक खडा ठेवून 'चोरी-मारी करू नको...मारकुंडी हू नको...लोकाच्या पिकात शिरू नको,' आसं बरंच काईबाई म्हणत गिन्ना मटकावून टाकला...

मग घरातल्या मान्सांनी माझी तानपट्टी काढली... गिन्न्याचं भांडं घिवून शिरगुप्पीच्या मावशीकडं, वाडीवरल्या आजीकडं, सौंदलग्याच्या आतीकडं, सगळीकडं मलाच पिट्टाळलं...मीबी अंगात बारा रेड्यांचं बळ आल्यागत सगळीकडं जाऊन आलो...पावण्यापयास्नी मटचा आप्रुवाईनं गिन्ना दिवून आलो...सोनीनं ह्यो इतका चिक्क दिला...रेडी तर ही इतकी जंक्शन हाय–आशी बरीच बरीच बढाई मारून आलो...

आशी सोनीनं आट 'येतं' दिली. समद्या रेड्याच. जात जवारी हाय, चांगली हाय, नम्री हाय–असा साऱ्या मुलखात बोलवा झाला. तशी रेडीस्नी गिऱ्हाइकं, सांगून याय् लागली, पर वानं एक बी रेडी इकली ऱ्हाई... 'जनावरं आमास्नी साखळ हाईत, ऱ्हावू द्यात. काय आमास्नी डुई जड हूत ऱ्हाईत. द्येवानं त्येंचा त्यानला शेर दिल्याला हाय. जगत्यात–वाढत्यात, कशीबी झटाझोंब्या देत; तवा इकायची कशाला ?'–आसं बाचं म्हन्नं. त्येच्या म्होरं कुणाची टाप हाय जायाची !

ह्या आववीत मी मोठा झालो हुतो. कर्तासवरता झालो हुतो...तीन सालांमागं माजं लगीनबी झालं हुतं...आम्ही सारी भावंडं आशी वाढत हुतो आनी सोनी ठकत चालली हुती...म्हातारी झाली हुती...तिच्या बरगड्यांची, पायांच्या खुब्याची हाडं आता दिसाय् लागली हुती. काळी कातडी त्येच्यावर कशीतरी चिकटून बसल्यागत दिसायची नि तिची ती साजिवंत शिंगं बांध्याच्या मानानं आता भली मोठी वाटायची...चराय् सोडलं तरी गवताचं दडु तिला वरवडाय् याचं ऱ्हाई. हातात ताकतच ऱ्हाय् नव्हती...म्हस काय, मानूस काय, म्हातारं झाल्यावर सगळ्यांचं सारखंच...

एक दिवस सोनी गोठ्यात बसली, ती उठंनाच...उठंना आनी काय सुद्क खाईनात्री...जनावराच्या डॉक्टराला बलवून आणलं, दावलं. त्येनं सांगितलं–'म्हातारं झालंया. आता आसंच. त्याला औषधपानी करूनही काही उपयोग व्हायचा नाही !' हे बोलणं ऐकून माज्या काळजात चर्र झालं !

काई न खाता-पिता, जागची न हालता बरोबर चार दिसांत सोनी आमास्नी सोडून गेली. आमी सारी झोपलो असतावक्ती–रातीच. कुणाला कसलाबी तर्रास न

देता. गुमान जशी ती आमच्या घरात आली, तशी कुणाचा निरोपबी न घेता गुमानच गेली...सकाळी गोठ्यात बघताव् तर सोनी मरून पडल्याली. सारं आंग ताठल्यालं, पाय पसरल्यालं, डोळ्यांच्या गारगुट्या झाल्याल्या...मला एकदम रडूच कोसळलं. माट्दिशी खाली बसून मी रडाय् लागलो. डोळ्यांतलं पानी खळनासं झालं...

एखादं माणूसच मेल्यागत सारं गाव जमलं. बोलाय् लागलं–

"लै चांगली म्हस बघा. तळ्याला याय्-जाय्च्या वक्ताला तोंडानं माजं दार ढोसलाय्ची नि 'आंय्' करून बलवायची बघा. मान्सास्नी एक येळ जाण नसती, पर ह्ये ढोर कसं मायाळू व्हतं बगा!" सुताराची कोंडाक्का म्हणाली.


"दोन वर्सवनी हुती नि दूद तर इत्की द्याची–ही इत्की दांडगी कासंडी भरायची वगा–गच्चोगची! ही जशी घरात आली, तसं घरातलं दूद काई खळलं न्हाई बगा. पोराटारास्नी फुरं हून आनीक उरायचं..." आई म्हणू लागली.

"आनी किती गरीब जनावर बगा. आता इत्की वर्सं हुती गावात–कुठल्या पोराला, कुठल्या बाईला, कोंच्या बापयाला जरासुदुक मारल्याची आलवा न्हाई कानावर!"

बानं म्हाराच्या तारूकीला सांगावा धाडला. ती बैलगाडी घिवून आली नि सोनीला घिवून गेली.. म्हारास्नी द्याची नको, शेतात न्हेवून पुरू या–आसं मी म्हनत हुतो, पर घरातल्यांनी मानलं न्हाई हे. श्यात दोन मैल लांब; म्हशीला गाडीत घालून न्ह्याची, पुरायची म्हंजे संगट आनी आट-धा मानूस पायजे. ह्या मोसमाच्या दिसात ज्ये-त्ये मानूस तंबाखूच्या कामाला ढासाळल्यालं, कोण रिकामं गावतंय!–घरच्या मान्सांचं ह्ये म्हन्नं.

ह्या वर्तुनिकीनं माझ्या काळजाला आणीक् खोंबारा लागला. तुम्ही सोनीला हिंडिवला-फिरिवला न्हाईसा. तिच्यावर माया केला न्हाईसा. ढोर मेल्यावर म्हारास्नी देणं हेच तुम्हास्नी ठावं. उद्या सोनीच्या चमड्याचं तीन–तेरा तुकडं हुतील. कशाची मोट करतील, कशाची पायतानं करतील, कशाच्या चप्पल्या करतील, तर कशाच्या वाद्या, सापत्या करतील! काय केलंसा तुमी हे, काय केलंसा! माजं डोळं आनीक् भरून याय् लागलं...

● ● ●




तुमचा पैसा

पंजाब नॅशनल बँकेंत

असतो म्हणजे

सत्तर वर्षांच्या

जाणत्या अनुभवी संस्थेत असतो.

PR6531/Mar/Ad/1



रशियन आघाडीवर व इटालीतही जर्मन सैन्य झपाट्याने मागे रेटले जात असताना स्टॅलिनशी किंवा अँग्लो–अमेरिकनांशी, कुणाशी तरी एकाशी समझोता करण्याचा विचार फ्यूररच्या मनात अधूनमधून येऊ लागला व त्याचबरोबर नाझी राजवटीची लोकप्रियता आता घसरणीला लागून एखाद्या डोके भडकलेल्या इसमाच्या गोळीला आपण बळीही पडू, ही गोष्ट त्याच्या चांगली ध्यानात होती. यासंबंधी तो आपल्या सहकाऱ्यांशी युद्धाच्या सुरवातीपासूनच अनेकवेळा बोलतही असे.

२२ ऑगस्ट, १९३९ ला म्हणजे पोलंडवर हल्ला चढवण्याच्या सुमारास हिटलरने आपल्या सेनानी–सहकाऱ्यांना सांगितले होते—" व्यक्तिशः माझी जागा आज अन्य कुणी घेऊ शकणार नाही," ही गोष्ट खरी असली तरी एखाद्या गुन्हेगार–प्रवृत्तीच्या किंवा मूर्ख माणसाला मला कधीही नाहीसा करणे शक्य आहे. "

" There can never be absolute security against fanatics & idealists– "

(ध्येयवेडचा आणि माथेफिरू माणसांपासून संपूर्ण संरक्षण मिळवणे कधीही शक्य नाही.) अशी सुरवात करून हिटलरने ३ मे, १९४२ ला उद्‌गार काढले होते....

" If some fanatic wishes to shoot me or kill me with a bomb, I am no safer sitting down than standing up.... "

(जर कुणा माथेफिरूने माझ्यावर गोळी झाडण्याचे किंवा बॉम्ब फेकून मला मारण्याचे ठरवले, तर त्याच्यापासून मी वाचणे शक्य नाही.)

आपला खून होऊ शकेल, याची हिटलरला अशा रीतीने पूर्ण कल्पना असल्यामुळे, ठराविक वेळी ठराविक भेटीगाठी करण्याचे तो कटाक्षाने टाळीत असे. यासंबंधी

उत्तरार्ध

लेखांक : १५ वा

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

त्याने सांगितले आहे--

" इतिहासातील नव्वद टक्के वध हे यशस्वीरीत्या का पार पडू शकले, याची मला पूर्ण जाणीव आहे. यासाठी राजकारणी माणसांना एकच उपाय योजणे शक्य आहे आणि तो म्हणजे, वाटचाल, मोटारीचे प्रवास व इतर प्रवास हे अवेळी व अचानक ठरवून करावेत. मला जेव्हा जेव्हा मोटारीने कुठे जायचे असेल, तेव्हा मी अनपेक्षितपणे जातो व पोलीसखात्यालाही कळवीत नाही. "

हिटलरने अधिकारभ्रष्ट केलेला माजी चीफ ऑफ स्टाफ जनरल बेक् याचे हिटलरला उडवण्याचे प्रयत्न चालू होते. परंतु त्याला म्हणण्यासारखे यश येण्याचे चिन्ह नव्हते. अशा गोष्टी मोठाल्या संघटना निर्माण करून किंवा मोठाले कट रचून करण्यापेक्षा, एखादा ध्येयवेडा माणूस पेटला तरच त्वरित तडीस जातात. अर्थात हिटलरला उडवणे, हाच केवळ हेतू जनरल बेकला अभिप्रेत नव्हता. हिटलर उडाला व नाझी राजवट उडवता आली नाही, तर हिटलरच्या वधाला फारसा अर्थ त्वरित तरी प्राप्त झाला नसता. त्वरित युद्धबंदी घडवून आणून जर्मन देशाचा युद्धातील विनाश थांबवावयाचा तर हिटलरचा खून करून पाठोपाठ राज्ययंत्राचा कबजा करणे आवश्यक होते. यामुळे जनरल बेकच्या प्रयत्नांना प्रत्यक्ष फळ येणे फारच दुरापास्त झालेले होते.

**स्टूफेनबर्गचा पहिला प्रयत्न**

परंतु स्टूफेनबर्ग ( Stauffenberg ) नावाच्या जर्मन पॅन्झर तुकडीतील एका सैनिकाने अखेर ही गोष्ट मनाशी पक्की केली, की हिटलरला उडवावयाचाच. हा स्टूफेनबर्ग लढाई सुरू झाली, तेव्हा ३२ वर्षांचा होता. १९३६ मध्ये तो सैन्यात

दाखल होऊन पॅन्झर तुकडीत एक लहानसा अधिकारी झालेला होता. जून, १९४० मध्ये तो रशियन आघाडीवर दाखल झाला. जर्मनांच्या पहिल्याच दणक्यात लाखोंनी रशियन सैनिक कैद झालेले होते. या रशियन युद्धकैद्यांपैकी जे स्टॅलिनशाहीला विटलेले होते, त्यांचे एक रशियन दल या स्टूफेनबर्गने निर्माण केले होते. स्टॅलिनची राज्यसत्ता उलथून पाडण्यासाठी या दलाचा उपयोग होईल, असा त्याचा विश्वास होता.

पण जसजशी जर्मन सैन्ये पुढे सरकू लागली व स्लाव्हवंशियांवर अत्याचार सुरू झाले, तसतशी स्टूफेनबर्गचे डोळे उघडले. तो ज्या मार्गाने, रशियन कम्युनिस्टातून स्वातंत्र्याचे उद्घोषक निर्माण करू पाहत होता, तो मार्ग नाझींना पसंतच नव्हता. त्यांनी स्लाव्हांची व कडव्या कम्युनिस्टांची सरसहा कत्तलच चालवली होती.

स्टॅलिनग्राडच्या वेढ्यात जनरल पोलस्च्या बाबतीत फ्यूररने जे धोरण पत्करले, त्यावरून फ्यूरर हा किती अमानुष होऊ शकतो, याचाही प्रत्यय त्याला आला ! फेब्रुवारी, १९४३ मध्ये त्याची ट्युनिशियातील रणक्षेत्रावर बदली झाली व तिथेच ७ एप्रिल, १९४३ ला दोस्तांच्या अगदी खालून उडणाऱ्या विमानाने त्याच्यावर गोळ्या झाडल्या. त्याचा डावा डोळा निकामी झाला. उजवा हात व डाव्या हाताची दोन बोटे तोडावी लागली. आपण जगत नाही, अशी त्याची खात्री झाली, परंतु म्युनिच हॉस्पिटलात तो हळूहळू बरा झाला.

आता त्याला प्रत्यक्ष रणांगणावर काही करणे शक्य नव्हते. म्हणून त्याची बदली पुन: रॅस्टेनबर्ग येथील हिटलरच्या छावणीतील जनरल स्टाफवर झाली. आता तो लेफ्टनंट कर्नल झालेला होता. त्याने डाव्या हाताच्या उरलेल्या तीन बोटांनी बॉम्ब उडवण्याचा सराव केला व २६ डिसेंबर, १९४३ ला रॅस्टेनबर्गच्या छावणीत हिटलरला उडविण्याचे त्याने नक्की केले. ब्रिफकेसमध्ये टाईमबॉम्ब ठेवून तो छावणीत तयारीत होता...

आणि हिटलर त्याच्या नेहमीच्या पद्धतीने अचानक ख्रिसमससाठी बर्लिनकडे निघून आला !

स्टूफेनबर्गचा हा प्रयत्न फसला, पण तो निराश झाला नाही.

१९४४ साल उजाडले. अँग्लो–अमेरिकन फौजा ब्रिटनमध्ये स्वारीच्या तयारीत आहेत, ही गोष्ट सर्वज्ञात होती. फील्ड मार्शल रोमेल याला इटालीतून काढून घेऊन फ्यूररने फ्रान्समध्ये आर्मी ग्रुप ' बी ' या सेनेचे अधिपत्य दिले. फ्रान्सचा लष्करी गव्हर्नर जनरल स्टुएटप्नागेल (Stuetpnagel) व इतर सेनाधिकाऱ्यांपैकी काही, हे हिटलरविरोधी वर्तुळात सामील झालेले होते. या सेनानींनी फील्ड मार्शल रोमेलला आपल्या कटात ओढले. रोमेल याची या वेळेपर्यंत अनुभवाने खात्री पटली होती, की जोपर्यंत लष्करी निर्णयही स्वत: फ्यूररच घेणार आहे, तोपर्यंत आता रणात कर्तृत्वाला अवसर नाही. तेव्हा वेळीच फ्यूररला अधिकारावरून दूर करून,

जर्मनीने युद्ध जिंकण्याच्या दृष्टीने निकराचा प्रयत्न करावा, असे रोमेलचे मत झाले होते. त्याने कटातल्या नेत्यांना हे स्पष्ट केले की—"It is my duty to come to the rescue of Germany."

यामुळें जर्मनी वाचणार आहे व या प्रयत्नात सामील होणे, हे मी माझे कर्तव्य समजतो. परंतु याचवेळी त्याने हिटलरचा वध करण्याच्या कल्पनेला सक्त विरोध दर्शविला.

या कटात सामील झालेले आणखी दोन नाझी नेते म्हणजे न्यूराथ–हा हिटलरचा पूर्वीचा परराष्ट्रमंत्री व शूलेनबर्ग–जर्मनीचा रशियातील वकील हे होत.

रोमेलचा या प्रयत्नांना आशीर्वाद मिळताच सगळी बडी धेंडे म्हणू लागली, की हिटलरला अटक करून अधिकारभ्रष्ट करण्याचे महत्त्वाचे काम खुद्द रोमेलनेच केले पाहिजे ! कारण जर्मन जनतेचा तो लाडका झालेला आहे.

१९४४ चा मे महिना जवळ येत होता. लाल सैन्ये राईशच्या सरहद्दीच्या जवळ सरकत होती. ब्रिटिश–अमेरिकन फौजा इंग्लंडमध्ये–युरोपवर स्वारी करण्याच्या तयारीने–इशाऱ्याची वाट पाहत होत्या. इटालीमध्ये जनरल अलेक्झांडरची सैन्ये हळूहळू केसरलिंगला इटाली–जर्मन सरहद्दीकडे रेटत होती ... जर हिटलरला दूर करून दोस्तांशी संधी करायचाच असला, तर आता फार वेळ दवडण्यात अर्थ नव्हता, या जाणिवेने कटवाले अस्वस्थ झाले होते.

प्रतिदिनी या दृष्टीने काय उचल करावी, या बाबतीत रोमेलला चर्चेत भाग घेणे शक्य नव्हते. कारण फ्रान्समध्ये दोस्तांच्या फौजांना तोंड देण्याच्या तयारीत रोमेल गुंतला होता. हिटलरला अधिकारभ्रष्ट करून शांतता–याचना त्याला नको होती; तर दोस्तांशी चांगला मुकाबला करता यावा, यासाठी हिटलरच्या हातातील सूत्रे, त्याला सेनानींच्या हाती यावयास हवी होती.

अर्थातच स्टूफेनबर्गने हिटलरचा वध करण्याच्या दिशेनेच आपला उद्योग चालू ठेवला होता. याकरता त्याने आता त्याच्या हिशोबात 'मवाळ' वाटणाऱ्या रोमेलचा नाद सोडला व हिटलरचा वध करून सत्ता जनरल बेकने हाती घ्यावी, असा मनसुबा कटवाल्यानी मुक्रर केला. याची गंधवार्ता अर्थात रोमेलला नव्हती !

४ जून, १९४५ ला रोम पडले.

२० जुलै, १९४४ ला हिटलरच्या वधाचा प्रयत्न झाला व फसला.

परंतु या मधल्या काळात ६ जून, १९४४ ला दोस्त सैन्ये नार्मंडीत उतरली !! तेव्हा हिटलच्या वधाच्या प्रयत्नाची हकीकत सांगण्यापूर्वी दुसऱ्या महायुद्धातील या महत्त्वाच्या घटनेची दखल थोडी विस्ताराने घेतली पाहिजे.

**नार्मंडी–६–६–१९४४**

इंग्लिश खाडी ओलांडून येऊ शकणाऱ्या दोस्त सैन्याला अडवण्यासाठी हिटलरने व्याप्त फ्रान्स व बेल्जम–हॉलंडमध्ये जी सैन्ययोजना केली होती, तिचा उल्लेख

हिटलर नेहमी अटलांटिक वॉल (भिंत) असा करीत असे. रशियावर हल्ला करण्यापूर्वी खरोखरच अभेद्य असलेल्या या तटबंदीच्या आड आता मात्र बराच कमकुवतपणा निर्माण झाला होता. फ्रान्समध्ये उतरण्यापूर्वी इटालीत उतरून दोस्त सैन्याने त्या भागात जर्मन सेना अडवून ठेवण्याचे जे धोरण आखले, ते यशस्वी ठरले होते. या वेळी जर्मनीजवळ जे एकंदर ३०७ डिव्हिजन्स सैन्य होते, त्यांतले १६५ डिव्हिजन्स तर केवळ रशियन आघाडीबर लढत होते. १८ डिव्हिजन्स नार्वे-डेन्मार्कमध्ये होत्या. ४१ उत्तर फ्रान्समध्ये व ७४ दक्षिण फ्रान्समध्ये असून, केवळ ९ डिव्हिजन्स सैन्य हे राईशच्या भूमीवर होते.


रशियन आघाडीवर जर्मन सैन्याची पिछेहाट होत असताना, निकडीने एकही डिव्हिजन दुसरीकडे नेणे हिटलरला शक्य नव्हते. नार्वे-डेन्मार्क खाली करून त्याने तिकडील सैन्यविभाग युरोपात आणले असते, तर दोस्तांना वरची बाजू उघडी मिळणार होती. फील्ड मार्शल केसरलिंगने दोस्तांना इटालीत बराच अडसर घातला असला, तरी सैन्य–विभाग वाढवल्याखेरीज दोस्तांना मागे रेटणे आता शक्य नव्हते.

याचा अर्थ एकच होता, की दोस्त सेना फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरताच, ज्या मोठाल्या दोन-तीन लढाया म्यूस, ऱ्हाईन या नद्या ओलांडताना होणार, त्या जर जर्मनीने गमावल्या, तर प्रत्यक्ष जर्मनीच्या भूमीवर जर्मन सैन्ये फार काळ लढणेच अशक्य होते. कारण तिथे फारसे सैन्यच शिल्लक नव्हते. फ्रान्सच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवल्यापासून केवळ आठ-दहा महिन्यांच्या अवधीत जर्मनीचा जो पराभव दोस्तांनी केला, त्याचे हे मुख्य कारण होते, की जर्मन सैन्य असंख्य दिशांना तोंडे करून उभी होती व एकाही दिशेकडून माघार घेऊन, जर्मन सेनानींना सोयीच्या वाटणाऱ्या ठिकाणी दोस्तांचा मुकाबला करण्याची संधी फ्यूररने आपल्या सेनानींना कधीच दिली नाही ! माघार घ्यायची नाही व असतील त्या ठिकाणी, असतील त्या संख्येने अखेरपर्यंत लढायचे, या संपूर्ण चुकीच्या लष्करी धोरणाने, फ्यूररने जर्मन सैन्याचे लष्करी पराभव अटळ करून ठेवले होते !

फील्ड मार्शल रोमेल हा उत्तर फ्रान्सचा सेनानी म्हणून व फील्ड मार्शल रूडस्टेंड हा दक्षिण फ्रान्समधील जर्मन सैन्याचा ,सेनानी म्हणून जसे १९४४ च्या सुरवातीलाच फ्रान्समध्ये दाखल झाले, त्याचप्रमाणे रोमेलला उत्तर आफ्रिकेतून पळवून लावलेल्या दोस्त सैन्याचे सेनानी जनरल आयसेन हॉवर व जनरल मॉन्टगोमोरी यांनी फ्रान्समध्ये उतरणाऱ्या सेनेचे उत्तरदायित्व पत्करलेले होते.

फ्रान्समध्ये उतरणाऱ्या दोस्त सैन्याचे मुख्यत: दोन विभाग होते. जनरल ब्रॅडले व जनरल पॅटन यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकन सैन्यविभाग सज्ज होते व जनरल मॉन्टगोमोरीच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश व कॅनेडियन सैन्य फ्रान्समध्ये उतरणार होते.

[ जनरल पॅटन हा अमेरिकेच्या टँक दलाचा धाडसी सेनानी होता. जर्मन




# ६ जून १९४४

सैन्याचा कणा यानेच मोडला. याच्याच नावाने भारत–पाक युद्धात बदनाम झालेला पॅटन रणगाडा जन्माला आला आहे ! ]

पहिल्या ४८ तासांत १७६००० सैन्य व २०००० लष्करी वाहने फ्रान्समध्ये उतरवण्यासाठी जवळजवळ सर्व ब्रिटिश आरमार, काही अमेरिकन आरमार ब्रिटिश खाडीत एकवटलेले होते. पेट्रोलचे साठे इंग्लंडच्या किनाऱ्यावर जमिनीखाली तयार ठेवण्यात आले होते व इंग्लिश खाडीखालून पंपाने तेल फ्रान्समध्ये जमिनीतून पुनः वर येण्याची योजना आखलेली होती. हे सारे घडायचे, तर त्यासाठी प्रथम किनाऱ्यावर भक्कम पाय रोवणे आवश्यक होते. हे पाय घट्ट रोवणे शक्य होईल की नाही, याचे विविध अंदाज व्यक्त झालेले होते. आयसेन हॉवरच्या एक ए. डी. सी. स्मिथ याने आपल्या दैनंदिनीत लिहिले आहे–

" The chances of being able to hold the bridgeheads are no more than fifty fifty. Will the channel run red with blood ?"

[ किनाऱ्यावर पाय रोवण्याची शक्यता केवळ पन्नास टक्केच आहे. इंग्लिश खाडीचा रंग रक्ताने लाल होणार की काय ? ]

स्वतः विन्स्टन चर्चिल हे धैर्याचे मेरुमणी असून, त्यांनीही अशी कबूली दिली आहे, की दोस्त सैन्याचे सेनापतिपद त्याचेकडे असते, तर खाडी ओलांडून फ्रान्समध्ये सैन्य उतरवण्याच्या या योजनेला (Over lord) त्यांना संमती दिली नसती. आल्प्स् ओलांडून दक्षिण फ्रान्स व इटालीतून जर्मनीत घुसून सैन्याचा पराभव करण्याचा प्रयत्न त्यांनी केला असता, परंतु चर्चिल यांनी एकदा धोरण आखून दिल्यानंतर सेनानींच्या क्षेत्रात कधीही हस्तक्षेप केला नाही ! ८ मे, १९४४ ला आपले व्यक्तिगत मत बाजूला सारून, त्यांनी आयसेन हॉवर यांना सांगितले–

"I am in this thing with you to the end & if it fails we will go down together."

[या साहसाबाबत मी तुमच्याबरोबर अखेरपर्यंत आहे. जर हा प्रयत्न फसला, तर दोघेही बरोबर खाली जाऊ.]

हे सांगताना चर्चिल यांच्या डोळ्यांत अश्रू उभे होते. परंतु जनरल मॉंटगोमेरी, आयसेन हॉवर, अमेरिकन चीफ ऑफ स्टाफ बिल् (Dhil), इंग्लिश चीफ ऑफ स्टाफ जनरल अॅलन ब्रूक या सार्‍यांनी आत्मविश्वास प्रदर्शित केला होता व पन्नास टक्के धोका पत्करण्याचा निश्चय केलेला होता.

## हिटलरचे अंतर्मन

जर्मनांना ही स्वारी काही अनपेक्षित नव्हती. फक्त ही स्वारी नेमकी कुठल्या भागात होणार, याचा अचूक अंदाज येणे महत्त्वाचे होते. रोमेल व रूडस्टेंन्ड यांचे या बाबतीत एक मत होते, की दोस्तांची मुख्य स्वारी डोव्हर विभागातून कॅले या बंदराजवळ होणार! पण हिटलरचे अंतर्मन हे विलक्षण यंत्र असले पाहिजे!! मार्च, १९४४ ला म्हणजे स्वारी होण्यापूर्वी दोन महिने हिटलरने या दोघांना इशारा दिला—"नार्मंडीवर लक्ष ठेवा!" (Watch Normandy!)

स्वत: हिटलर पश्चिम आघाडीपासून लांब असूनही त्याने केलेला हा अचूक अंदाज रोमेल–रूडन्स्टेन्ड यांना खरा वाटत नव्हता...आणि दोस्तांनी डोव्हरच्या परिसरात एक 'नाटक' ही उभे केले होते. मोठमोठ्या आरमारी बोटी वाटाव्या, अशी जहाजे, रबरी नौका व असंख्य मोडतोड झालेल्या नौका त्यांनी त्या भागात नांगरून ठेवलेल्या होत्या. दुरून पाहणार्‍यांना ही मोठी हल्ल्याची तयारी वाटावी, असाच आभास त्यांनी निर्माण केला होता. रूडन्स्टेन्डने अर्थातच हिटलरच्या सूचनेकडे पुरेसे लक्ष न देता, कॅले विभागात जर्मन सैन्याची मोठी जमवाजमव केली होती. सर्व पॅन्झर तुकड्या या भागात हलविण्यात आल्या होत्या.

दोस्तांना स्वारीचा दिवस व नक्की वेळ ठरविणे ही गोष्ट सोपी नव्हती. दिवस ठरल्यानंतर नेमके किती वाजता सैन्यवाहू बोटींनी समुद्रकिनार्‍यावर पोचायचे, याची निश्चित योजना आखणे भाग होते. शत्रूच्या किनार्‍यावर उतरण्यासाठी चंद्रप्रकाश हवा ही गोष्ट उघड होती...कारण त्याशिवाय जहाजांना व माणसांना किनार्‍यावर वावरणे कठीण झाले असते. त्याचप्रमाणे पहाट फुटण्यापूर्वी काही तास सैन्याचे किनार्‍यावर पाऊल पडणे आवश्यक होते. अर्थात हा वेळ फार प्रदीर्घ असून चालणार नव्हता. चांगले उजाडण्यापूर्वी सर्व सैन्याची निरनिराळ्या दिशांनी आगेकूच सुरू होणे भाग होते. नाहीतर जर्मन विमानांना बॉम्बवर्षावासाठी सर्वच्या सर्व सैन्यदले व सामग्री एकत्रच सापडली असती.

भरती–ओहोटीचा प्रश्न महत्त्वाचा होता. भरतीची वेळ असली तर समुद्राच्या पाण्याखालील प्रवाहाचा त्रास अधिक होतो; परंतु ओहोट लागल्यावर किनार्‍यावर

उतरावयाचे तर मैलच्या मैल उघडा समुद्रकाठ तुडवीत येणे भाग होते व हे धोक्याचे होते. भरती सुरू होताच, तीन तासांनी किनाऱ्यावर पाय ठेवता येईल, अशा बेताने स्वारी आखण्यात आली होती.

प्रत्येक महिन्यातील शुक्ल पक्षातील तीन दिवस या दृष्टीने सोयीचे होते. ३१ मे नंतर ५–६ व ७ जून, १९४४ याच तारखांना स्वारीसाठी सुयोग्य वेळ व क्षण उपलब्ध होत होता.

४ जून, १९४४ च्या रात्री सैन्यवाहू जहाजांनी ब्रिटिश किनारा सोडावा, असे ठरवण्यात आले. तो दिवस रविवार होता.

परंतु त्या रात्री हवा एकदम खराब झाली. अगदी खालवर ढगांची गर्दी उसळली व जोराचे वादळी वारे सुरू झाले. अखेरच्या क्षणी स्वारीचे सर्वोच्च अमेरिकन सेनानी (Supreme commandar) जनरल आयसेन् हॉवर यांनी स्वारीचा बेत २४ तास पुढे ढकलला.

या गडबडीत विस्टन चर्चिल यांनी H. M. S. बेलफास्ट या लष्करी जहाजा-वरून स्वारीवर प्रत्यक्ष जाऊन ब्रिटिश सैन्य प्रत्यक्ष कसे उतरते, ते पाहण्याचा जो गुप्त बेत आखला होता, तो उघडा पडला होता. ब्रिटिश चीफ ऑफ स्टाफ प्रमुख ॲलन ब्रूक किंवा कुणाही सेनानीला न सांगता चर्चिल यांनी हा बेत आखला होता. कारण त्यांना हे माहीत होते, को त्यांना प्रत्यक्ष युद्धात भाग घेण्यास कुणीही परवा-नगी देणार नाही.

चर्चिल यांनी ३० मे स रात्री इंग्लंडच्या राजाशी खाना घेताना आपला बेत त्यांना सांगितला. राजेसाहेबांनाही चर्चिल यांचेबरोबर जावेसे वाटू लागले व ही गोष्ट आयसेन हॉवर् यांना कळली. त्यांनी इंग्लंडच्या राजेसाहेबांना कळवळे की "तुम्ही येऊ नका व चर्चिल यांनाही मी येऊ देणार नाही." चर्चिल यांना जेव्हा राजेसाहे-बांनीच न जाण्याचा सल्ला दिला, तेव्हा चर्चिल यांची फार निराशा झाली. आपल्या बेतात आपण राजेसाहेबांना सामील करावयास नको होते, असे आता त्यांना वाटू लागले.

रोम ४ जूनला पडले. स्वारी रद्द झाल्याची निराशा थोडीशी कमी झाली. रोम-मध्ये दोस्त शिरल्याची बातमी ५ जूनला लंडनला पोचली होती. त्याच दिवशी पहाटे ४ वाजता, ६ जून हा दिवस स्वारीसाठी निश्चित करण्यात आला.

**६ जूनची पहाट**

६ जून हीच तारीख निश्चित करण्यात दोस्तांनी मोठी धूर्तता दाखविली, कारण ५ जूनची वादळी हवा इतकी त्रासदायक होती, की जर्मन वेधशाळांनी ५ व ६ जून या दिवशी स्वारी होण्याची अजीबात शक्यता नाही, असे अंदाज निश्चितीने केल्या-मुळे मार्शल रोमेल त्याच दिवशी बर्लिनला पूर्वनियोजित बेतानुसार निघून गेला व ज्या ठिकाणी म्हणजे नार्मंडीत प्रत्यक्ष दोस्त सैन्य उतरणार होते, त्या ठिकाणच्या

जर्मन सेनानी जनरल डॉलमन् याने सहकारी अधिकाऱ्यांसमवेत किनाऱ्यापासून दूर आत १२५ मैलांवर काही लष्करी चाचण्या मुक्रर केल्या.

शीन नदीच्या उत्तरेस कॅलेच्या जवळ रूडन्स्टेंडची सैन्यपथके मात्र सज्ज होती, कारण हिटलरने पुनः पुनः नार्मंडीवर लक्ष ठेवा, असा इशारा देऊनही दोस्तांची स्वारी कॅलेजवळ होणार, असाच रूडन्स्टेंडचा अंदाज होता.

दिनांक ५ जूनला रात्री, फ्रेंच किनाऱ्यावर दोस्तांनी बेसुमार बॉम्बफेक केली, तरी ही गोष्ट नेहमीचीच असल्यामुळे जर्मनांना विशेष असा संशय आला नाही. अपरात्र झाली व रूडन्स्टेंडच्या छावणीत बातमी आली की बी. बी. सी. वरून फ्रान्समधील सशस्त्र फ्रेंच प्रतिकारकांना रेडिओवरून गुप्त संदेश सारखे दिले जात आहेत. फील्ड मार्शल रूडन्स्टेंड याने ताबडतोब जर्मन सैन्याला सावध राहण्याच्या सूचना सोडल्या खऱ्या, पण या सूचना दक्षिणेकडील शीत नदीपलीकडे कॉटेनीन आखातातील काएन व चेरबूर्ग दरम्यानच्या जनरल डोलमन्च्या सैनिकांना कळवाव्या, अशी निकड त्याला वाटली नाही.

जनरल डोलमन् हा रात्री एकचा सुमार झाला तरी लष्करी चाचण्या उरकून किनाऱ्यावरील आपल्या छावणीत परत गेलेला नव्हता. एक वाजून दहा मिनिटे उलटली आणि दोन अमेरिकन व एक ब्रिटिश अशा तीन हवाई सैन्यतुकड्या अचानक किनाऱ्यावर पॅराशूटने उतरू लागल्या. जर्मन सैन्य स्वारी आज तरी होत नाही, या अंदाजाने बेफिकिरीत होते. एकदम दोस्त सैन्य उतरू लागलेले पाहताच जर्मन सैन्यांत गडबड उडाली. पहाटे १–३० वाजता दुय्यम अधिकाऱ्यांनी धोक्याचे भोंगे वाजवले, पण जनरल डोलमन् अजून परतलेला नसल्याने, एका मेजर जनरलने रोमेलच्या छावणीला फोन करण्यास सुरवात केली. ४५ मिनिटांनंतर छावणीत फोन लागला. अर्थात रोमेल बर्लिनला असल्याने जनरल स्पायडेल याने फोन घेतला. बातमी होती, " मोठ्या प्रमाणावर दोस्त सैन्य उतरू लागले आहे, असे दिसते. "

जनरल स्पायडेलने फिल्ड मार्शल रूडन्स्टेंडशी फोनवरून बोलणे केले. रूडन्स्टेंडने सांगितले–" दक्षिणेकडे उतरणाऱ्या ब्रिटिश व अमेरिकन छत्रीधारी सैन्याचा उद्देश आपले लक्ष खाली वेधावे, असा आहे व मुख्य स्वारी कॅलेजवळच होणार यात शंका नाही. उतरलेल्या तुरळक दोस्त छत्रीधारी सैनिकांचा खातमा सहज उडवता येईल. " यावेळी २–३० चा सुमार झालेला होता. हजारो अमेरिकन व ब्रिटिश बोटी नार्मंडीच्या किनाऱ्याजवळ काळोखात पुढे पुढे येत होत्या.

पहाट झाली. ब्रिटिश व अमेरिकन लढाऊ बोटी आता किनाऱ्यावर भीषण तोफा डागण्याच्या टप्प्यात आल्या होत्या. गोळावारी सुरू झाली व या गडगडाटातच दोस्त सैन्ये किनाऱ्यावर उतरू लागली.

समुद्रात जर्मनांनी पेरलेल्या सुरुंगांमुळे अनेक छोट्या छोट्या बोटींची शकले उडाली. परंतु बुडता बुडता, मरता मरता सैन्ये तीन ठिकाणी किनाऱ्यावर उतरतच

होती. व्हायरे व ओरने या दोन नद्यांमधील नार्मंडीच्या किनाऱ्यावर उत्ता (Utah) ओम्हा (Omaha) या दोन ठिकाणी अमेरिकन सैन्य व या दोघांच्या पूर्वेस 'काएन' शहराच्या दिशेने जाण्यासाठी उतरणारे ब्रिटिश सैन्य अशा तीन ठिकाणी दोस्त सैन्य उतरत होते.

ओम्हा बीचच्या डाव्या-उजव्या अंगावर अमेरिकन व ब्रिटिश तुकड्या विशेष विरोध न होता उतरू शकल्या खऱ्या, परंतु ओम्हा बीचवर तेथे नुकत्याच पोचलेल्या ताज्या दमाच्या जर्मन सैनिक तुकड्यांनी प्रखर प्रतिकार सुरू केला. फक्त ६ जून, १९४४ या एकाच दिवशी या बीचवर ८६०० अमेरिकन सैनिक गारद झाले वा जखमी झाले. येथे पाय रोवण्यापलीकडे अमेरिकन सैन्य काहीही करू शकले नसले, तरी या ठिकाणच्या दोन्ही बगलांवर दोस्त सैन्य तीन ते पाच मैल किनाऱ्यापासून आत घुसून घट्ट पाय रोवून वाटचाल करू लागले होते.

सकाळचे सहा वाजले, तेव्हा तीनपैकी दोन ठिकाणी अशा रीतीने दोस्तांनी आपले दात घुसवलेले होते. बर्लिनला रोमेलच्या घरी आता फोन घणघणत होता. स्पायडेलने स्वारी सुरू झाल्याचे वृत्त देताच फ्यूररला न भेटताच रोमेल मोटारीने निघाला व दुपारी दोन वाजता उत्तर फ्रान्समधील छावणीत दाखल झाला. अशा ऐनसमयी रोमेल मोटारीने का आला, असा प्रश्न पडेल, परंतु याला कारण हिटलरने आपल्या सर्व प्रमुख सेनानींना फ्रेंच किनारपट्टीवर विमानाने प्रवास करण्यास प्रतिबंध केला होता. ज्या ठिकाणी शत्रूची फायटर विमाने पोचण्याचा संभव आहे, अशा ठिकाणी फील्ड मार्शलनाही विमानाने फिरण्यास हिटलरने बंदी घातली होती, ही गोष्ट अत्यंत शहाणपणाची होती !

रोमेल पोचण्यापूर्वी स्पायडेल, रूडन्स्टेंड व जनरल ब्लूमेंट्रिट यांनी बर्लिन येथील सर्वाधिकार असलेल्या लष्करी कार्यालयात फोन करून जोडल्ला आग्रह चालवला होता, की नार्मंडीत पॅन्झर तुकड्या तावडतोब धाडण्यासाठी फ्यूररची परवानगी कळवा ! हिटलर हा आता स्वतःच सुप्रीम कमांडर असल्यामुळे, पॅन्झर तुकड्यांची हालचाल फक्त त्याच्याच परवानगीने होऊ शकत असे. जोडल्ने कळवले–" संपूर्ण चित्र स्पष्ट होईपर्यंत यासंबंधी फ्यूरर हुकूम देणार नाही ! "

दुपारी तीन वाजेपर्यंत ही परवानगी आली नव्हती व नंतर जेव्हा ही परवानगी आली, तेव्हा उशीर झालेला होता !

त्या दिवशी दुपारी फ्यूरर तीन वाजता झोपलेला होता. जागा झाला तेव्हा दोस्त सैन्याने तीन ठिकाणी नार्मंडीत सैन्य उतरल्याची बातमी त्याला कळवली गेली व या तिन्ही ठिकाणीच अधिकाधिक सैन्य उतरत असून, कॅले भागात काहीही हालचाल नाही, या गोष्टी स्पष्ट होताच सायंकाळी ४ वाजून ५५ मिनिटांनी फ्यूररने काढलेली आज्ञा खालीलप्रमाणे होती–

४.५५, जून ६, १९४४

" चीफ ऑफ स्टाफ वेस्टर्न कमांड कळवू इच्छिते व सुप्रीम कमांडची अशी आज्ञा आहे, की आज सायंकाळ संपण्यापूर्वी, ज्या ठिकाणी शत्रूने पाऊल ठेवले आहे, त्या ठिकाणी शत्रूची पुरती विल्हेवाट लागली पाहिजे. कारण याच ठिकाणी अधिकाधिक सैन्य उतरू लागण्याची शक्यता आहे. जास्तीतजास्त आज रात्रीपर्यंत किनारपट्टचा मोकळचा झाल्याच पाहिजेत– "

रोमेल आपल्या छावणीत सायंकाळी पाच वाजता पोचला व पाठोपाठ ही आज्ञा आली. रोमेलच्या सैन्यविभागात अजून शत्रू उतरलेला नसल्यामुळे, रोमेलने शीन नदीपलीकडील रूडन्स्टेडच्या सैन्यपथकाशी फोनवरून संपर्क साधला. दुसऱ्या टोकाहून नार्मंडीतून जनरल पेमसेल् बोलत होता. पॅन्झर तुकडचा आज्ञा येण्यापूर्वीच काएनजवळ सरकल्या होत्या व युद्धाला चांगले तोंड लागले होते. तरीसुद्धा रोमेलने फ्यूररची आज्ञा सांगताच जनरल पेमसेलने उत्तर दिले–

" आजची रात्र उलटण्यापूर्वी किनारपट्टी मोकळी करणे शक्य नाही. "

याचे मुख्य कारण हे होते, की आकाशातून लुप्तवाफ्ला ब्रिटिश व अमेरिकन बॉम्बर्सनी पिटाळून लावले होते व हवाईदलाची मदत असल्याखेरीज कितीही टँक्स् हाताशी असल्या तरी दोस्तांना मागे रेटणे शक्य नाही, ही गोष्ट जनरल पेमसेल याला पक्की माहीत होती.

## माँटगोमेरीविरुद्ध काहूर

काएनजवळ उतरलेल्या व काएनचा कबजा करू पाहणाऱ्या ब्रिटिश सैन्याला काएनजवळ मोठाच प्रतिकार दि. ७ जूनपासून सुरू झाला व माँटगोमेरीच्या सेनेला इंचभरही पुढे सरकणे शक्य होत नाहीसे झाले. काएन ताब्यात घेणे हे नार्मंडीची लढाई जिंकण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. कॉटेनीन आखाताचा आकार बाटलीसारखा आहे व काएनचा कबजा म्हणजे या बाटलीचे तोंड ताब्यात घेण्यासारखे होते. यामुळे आतल्या भागात उतरलेल्या अमेरिकन सेनेला माफक प्रतिकार सुरू ठेवून, जर्मनांनी आपले सर्व बळ 'काएन' च्या लढाईवर केंद्रित केले होते.

दि. ७ जूनला सायंकाळपर्यंत काएनच्या डावीकडे दोन ठिकाणी उतरलेल्या अमेरिकन सेनेचा व ब्रिटिश सेनेचा दुवा सांधला गेला. सुमारे तीस मैल लांबीची व पाच ते सहा मैल खोल अशी किनारपट्टी दोस्तांच्या सेनेने यावेळेपर्यंत व्यापली होती. सुमारे ४०,००० सैन्य ६ जूनच्या सकाळपासून उतरले होते व आणखी उतरत होते.

जनरल माँटगोमेरी हा स्वतः ६ जूनलाच काएनसाठी निघालेल्या ब्रि. सेनेबरोबर नार्मडीत उतरला होता. अमेरिकन सेनेचे दोन भाग जनरल ब्रॅडलेच्या आधिपत्याखाली होते. या दोन्ही विभागांच्या ज्या दिशा ठरल्या होत्या, त्यामध्ये जर्मन

सैन्य तयारीत होते व काएनजवळ मॉंटगोमोरी अडकून पडला होता. काएनचे विमानतळ जर्मनांच्या कबजात असल्यामुळे व पॅन्झर तुकड्या त्याच भागात असल्या-मुळे जर्मनांची सारी आग मॉंटगोमोरीवर कोसळत होती.

दोस्तांच्या या स्वारीचा सुप्रीम कमांडर म्हणून जनरल आयसेन हॉवर यांची नेमणूक झालेली होती. अनुभवाचा विचार करता मॉंटगोमोरी हा या पदासाठी अधिक लायक होता, परंतु ' सर्वे गुणा:कांचनमाश्रयन्ते ' या न्यायाने ज्या श्रीमंत अमेरिकेच्या मदतीमुळे स्वारीसाठी मुबलक शस्त्रास्त्रे व माणसे उपलब्ध झाली, त्याच देशाच्या सेनानीकडे स्वारीचे सर्वोच्च अधिकार असावेत, असा आग्रह अमेरिकन सरकारने धरला व जनरल आयसेन हॉवर यांची सुप्रीम कमांडर म्हणून नेमणूक झाली. स्वारीचा हा सर्वोच्च अधिकारी प्रत्यक्ष रणभूमीवर अद्याप आलेलाच नव्हता ! जनरल मॉंटगोमोरी व अमेरिकन सेनेचा प्रमुख जनरल ब्रॅडले या दोघांचा लष्करी दर्जा समान असल्यामुळे स्वारीच्या प्रत्यक्ष हालचालीतील फेरबदल हे इंग्लंडमध्ये छावणीत असलेल्या आयसेन हॉवरच्या आज्ञेशिवाय होऊ शकत नव्हते. मॉंटगोमोरीच्या सेनेने दोन दिवसांत काएनचा कबजा करावा व त्याला केंद्रबिंदू करून वळसा घालून ब्रिटिश व अमेरिकन दलाने पुढे सरकावे, अशी योजना होती. मॉंटगोमोरीच्या सेनेला काएन घेणे जमेना, कारण जर्मनांनी आपले सर्व पॅन्झर सैन्यदल या लढाईत लोटले होते. जर्मनांचा मोठा रेटा अंगावर घेतलेल्या मॉंटगो-मोरीची अशी अपेक्षा आता होती, की पूर्वीच्या योजनेत थोडा बदल करून अमेरिकन सेनेनेच जर्मन सेनेला मागून वेढण्यासाठी जोराचा प्रयत्न केला पाहिजे, परंतु अमेरिकन सेनाधिकारी व ब्रिटिश सेनाधिकारी यांच्यामध्ये जे किल्मिष निर्माण झाले, त्यामुळे अमेरिकन सेनाधिकाऱ्यांना असा संशय येऊ लागला, की आपली मनुष्य व साहित्यहानी कमी व्हावी, म्हणून ब्रिटिश व कॅनेडियन सैन्य हे मुद्दामच काएनजवळ वेळ काढीत आहे. या विपरीत भावनेचा जन्म होताच काएन न घेणाऱ्या मॉंटगोमोरीविरुद्ध काहूर जमा होऊ लागले.

११ जूनला, म्हणजे स्वारी झाल्यानंतर पाच दिवसांनी मॉंटगोमोरीच्या हे ध्यानात आले, की काएनची लढाई कदाचित महिनाभरही चालेल. तेव्हा त्याने लंडनमध्ये चीफ ऑफ स्टाफला कळवले –

" My general objective is to pull the Germans on to 2nd Army ( British ), so that the 1st Army (American) can extend & expand ..

[ माझा सर्वसाधारण हेतू हा आहे, की दुसऱ्या सेनेवर (ब्रिटिश) जास्तीत जास्त जर्मनांना ओढावे म्हणजे पहिल्या सेनेला (अमेरिकन) पुढे सरकता येईल व व्याप्ती वाढवता येईल. ]

रूडस्टेंड व रोमेल या दोघांनी दोस्त सैन्ये आता किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात

उतरलेली आहेत, ही गोष्ट गृहीत धरली होती. किनाऱ्याजवळ लढणे जर्मनांना अशक्य होत होते, कारण लढाऊ जहाजांवरील तोफा व विमानवाहू जहाजांवरील येणारी बॉम्बर्स सतत आग ओकीत होती. तेव्हा या आगीच्या टप्प्याबाहेरपर्यंत जर्मन सैन्याने मागे हटावे व दोस्त पुढे सरकल्यावर पुनः त्याचे 'डंकर्क' करावे, असा व्यूह मनात योजून यासाठी संमती घेण्यासाठी जर्मन सेनापतींनी १७ जूनला फ्रान्समध्ये मार्गिव्हल येथे फ्यूररची भेट मागितली. जनरल स्पायडेल याने मार्गिव्हल येथील बंकरमध्ये हिटलर आला, तेव्हा कसा दिसला, याचे वर्णन केलेले आहे. तो लिहितो –

"He looked pale & sleepless, playing nervously with his glasses & an array of coloured pencils, which he held between his fingers. He sat hunched upon a stool, while the Field Marshals stood. His hypnotic powers seem to have waned. Then in a loud voice he spoke bitterly of his displeasure of the success of the Allied landings for which he held the Field Marshals responsible–"

[तो चेहऱ्यावर फिक्कट व झोप न घेतल्यासारखा दिसत होता. हातातल्या चष्म्याशी व बोटात धरलेल्या रंगीत पेन्सिलीच्या तुकड्यांशी तो हताशपणे खेळत होता. एका स्टुलावर मुडपल्यासारखा तो बसला होता व दोघे फील्ड मार्शल समोर उभे होते. दुसऱ्यावर छाप टाकण्याच्या त्याच्या शक्ती आता क्षीण झाल्या होत्या. मग एकदम त्याने मोठ्या आवाजात, दोस्त सैन्याने नार्मंडीत स्वारी करण्यात यश मिळवले, यासंबंधी आपली कटु नाराजी व्यक्त करण्यास सुरवात केली. यासाठी त्याने फिल्ड मार्शलनाच जबाबदार धरण्याचा प्रयत्न सुरू केला... ]

## व्ही वन् व व्ही टू

या भेटीत हिटलरने रोमेल व रूडन्स्टेंड यांचा रणव्यूह फेटाळून लावला व सांगितले, की आता जी नवी अस्त्रे आपण निर्माण केली आहेत, त्यामुळे जर्मनीचा विजय अटळ होणार आहे. ही भेट होण्यापूर्वी चार दिवस म्हणजे १३ जूनला रात्री हिटलरने आपले नवे अस्त्र व्ही. वन् (V. 1) प्रथमच उपयोगात आणले होते.

या अस्त्राचे वर्णन म्हणजे वैमानिक नसलेले बॉम्बर (Pilotless Bomber) असे करता येईल. याला इंग्लंडमध्ये उडता बॉम्ब, Flying Bomb किंवा बझ् बॉम्ब म्हणण्यात येऊ लागले. सुमारे ताशी ४०० मैल वेगाने जाणारे हे अस्त्र, ३००० फूट उंचीवरून येऊन झटकन् दिशा बदलून आकाशातून खाली उतरू लागे, तेव्हा त्याच्या इंजिनच्या होणाऱ्या आवाजावरून बझ्-बॉम्ब हे नामाभिधान त्याला मिळाले. या बॉम्बमध्ये सुमारे हजार टनांचा दारूगोळा असे. जमिनीवर आपटण्यापूर्वी काही उंचीवरच याचा स्फोट होत असल्याकारणाने, नुकसानी व मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर होत असे. यातील प्रॉपेलरची गती अशी योजलेली होती, की क्षेपण-

स्थानापासून ठराविक अंतर नाकासमोर काटल्यानंतर, हा बॉम्ब दिशा बदलून खाली त्याच वेगाने येऊ लागे. १३ जूनला असे चार 'बझ्-बॉम्ब' लंडनवर आले व एकाने सहा माणसे मारली. इतरांनी घरांची मोठी नासधूस केली.

या उडत्या बॉम्बचा वेग जेट्सारखा असल्याकरणाने ब्रिटिश फायटर विमानांना त्यांना अडवणे अशक्य होणार होते. शिवाय या विमानापासून २००–३०० यार्डांच्या आत जाणे धोक्याचे होते, कारण बॉम्बचा स्फोट तेवढ्यात झाला तर फायटर विमानच त्यात खलास होण्याची धास्ती होती. या अस्त्रांचा आकार विमानाच्या आकाराहून लहान असल्याकारणाने विमानविरोधी तोफांना त्याचा नेम धरणे अशक्य होणार होते.

१५ जूनला दिवसभरात २०० उडते बॉम्बस् लंडनवर कोसळले. बकिंगहॅम पॅलेसजवळील एका ख्रिस्ती मंदिरात जेव्हा यातला एक बॉम्ब आदळला, तेव्हा तेथे प्रार्थनेसाठी जमलेले २०० शहरवासी जागचेजागी ठार झाले. या बॉम्सपासून बचाव करण्याकरता मोठमोठ्या बलून्सच्या साह्याने मोठमोठाली तारांची जाळी लंडन शहरावर पसरण्यात आली व जाळ्यात सुमारे २०० बझ् बॉम्बस् अडकलेही. परंतु ही संख्या हजारोंच्या संख्येने लंडनवर कोसळलेल्या बॉम्बच्या मानाने फारशी मोठी नव्हती.

'व्ही. वन्' अथवा 'विजयाचा पहिला टप्पा गाठणारे अस्त्र' असे सूचक नाव दिलेले हे ८०० उडते बॉम्बस् लंडनवर कोसळले. ६१८४ माणसे ठार झाली. १७९८१ जायबंदी झाली. ७,५०.,००० घरे कोसळली.

हिटलरच्या दुर्दैवाने या अस्त्राच्या निर्मितीला थोडा उशीर झाला. दोस्तांनी स्वारी केली होती व हे शस्त्र उपयोगात आणण्याची सुरवात होते न होते तोच दोस्तांच्या फौजा फ्रान्सचा किनारा व्यापूही लागल्या. बझ्-बॉम्बचे साठे घाईघाईने अंतर्भागात हलवावे लागले व बरेच साठे दोस्तांनी उद्ध्वस्त केले.

या अस्त्रापेक्षा भयानक अस्त्र व्ही. टू (V. 2) हे यावेळी निर्मिती–अवस्थेत होते. ताशी ४००० मैल वेगाने जाणारे १२ टनी अस्त्र, अशा या अस्त्राची निर्मिती सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाली व असा पहिला रॉकेट-बॉम्ब जर्मनीने ८ सप्टेंबर, १९४४ ला लंडनला सोडला, पण ८ सप्टेंबरपर्यंत जर्मन सैन्ये खूपच मागे रेटली गेली होती. १३०० रॉकेट्सपैकी फक्त सुमारे २०० च लंडनपर्यंत येऊ शकली. मात्र या अस्त्राचे स्वरूप अधिक भयानक असल्यामुळे या अस्त्राने २७२४ माणसे मारली. ६७७६ जायबंदी केली. उडत्या बॉम्बच्या दुप्पट हानी करण्याची ताकद या V. 2 अस्त्रात होती.

या दोन्ही अस्त्रांची निर्मिती दोस्त सैन्ये नार्मंडीत उतरण्यापूर्वी होऊ शकली असती, तर युद्धाचे पारडे कसे झुकले असते, हे सांगणे कठीण आहे. या अस्त्राविरुद्ध विमानविरोधी तोफांचा किंवा फायटर विमानांचाही उपयोग होऊ शकत

नव्हता. या अस्त्रावर म्हणूनच हिटलरचा जबर विश्वास होता व याच विश्वासावर रोमेल–रूडन्स्टेंड यांचा माघारीचा रणव्यूह हिटलरने १७ जूनला फेटाळून लावला. प्रत्येक इंच लढवला गेला पाहिजे, असाच आग्रह फ्यूररने धरला. फ्यूररने सांगितले–

" The new VI weapon will be decisive against Great Britain & make the British willing to make peace. "

[ नवे व्ही. वन् अस्त्र ग्रेटब्रिटनविरुद्ध निर्णायक ठरून, ब्रिटन तहाला तयार झाल्याशिवाय राहणार नाही ]

याच ओघात हिटलरने पुढे सांगितले—

" दोस्तांजवळ अजून जेट्स नाहीत. याने मागले नाही तर आपली जेट अस्त्रे तयार होत आहेत. ही तयार होताच ब्रिटिश व अमेरिकन विमानांना आकाशातून पळ काढावा लागेल. मग ब्रिटन कोसळल्याशिवाय कसे राहील ? "

याच वेळी विमानहल्ल्याचा इशारा झाला व हिटलर, रोमेल व रूडन्स्टेंड हे जमिनीखालील आश्रयाच्या ठिकाणी गेले. तिथे रोमेलने सांगितले—

" नार्मंडीत आपली आघाडी फार काळ टिकू शकणार नाही. रशियन आघाडीचीही शाश्वती नसताना आता युद्ध लवकरात लवकर संपविणे इष्ट आहे. "

यावर फ्यूररने त्याला गप्प केले–

"Don't you worry about the future course of the war but rather about your own invasion front. "

[ लढाईचे पुढे काय होणार आहे, याकरता तू डोके शिणवू नकोस. स्वारी झालेल्या तुझ्या आघाडीचा विचार कर......! ]

## रूडन्स्टेंड बडतर्फ : रोमेल जखमी

रोमेल व रूडन्स्टेंड बँकरच्या बाहेर पडले ! १९ जूनला हिटलरने आघाडीला भेट देऊन परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्याचे मान्य केले, परंतु यापूर्वी दोन दिवस रूडन्स्टेंडने एक मोठा प्रमाद केला होता. १५ जूनला रात्री तो आपल्या छावणीतून जनरल कायटेलशी बोलत होता.

कायटेलने रणांगणावरील परिस्थिती कळण्यासाठी फोन केलेला होता. रूडन्स्टेंडने सांगितले–

" परिस्थिती गंभीर आहे—"

" आता काय करता येईल ? " कायटेलने विचारले.

यावर रूडन्स्टेंडने उत्तर दिले–

" Make peace, you fools ! what else can you do ??"

[ मूर्खानो, आता तरी तह करा ! दुसरे काय करणे शक्य आहे ? ]

रूडन्स्टेंड हा फिल्ड मार्शल असल्यामुळे, कायटेलशी मनातले खरे बोलला.

जनरल कायटेलने मात्र ही गोष्ट आठवड्याभराने जशीच्या तशी फ्यूररच्या कानी घातली. फ्यूरर यावेळी फील्ड मार्शल क्लजशी बोलत होता. रूडन्स्टेंडने काढलेले उद्गार ऐकताच, फ्यूररने आजारीपणाच्या रजेवर असलेल्या क्लज्ला रशियन आघाडीवर पुन: पाठविण्याचा निर्णय रद्द करून फील्ड मार्शल रूडन्स्टेंडला तात्काळ पदभ्रष्ट करून, जनरल क्कज्ला रूडन्स्टेंडकडून सूत्रे हाती घेण्यासाठी फ्रान्समध्ये धाडण्याचे ठरवले, परंतु तत्पूर्वी त्याने रोमेल-रूडन्स्टेंडची गाठ घेतली.

२९ जूनला हिटलरने पुन: रोमेल-रूडन्स्टेंड यांना फ्रान्समध्ये भेट दिली. पुन: जेव्हा या दोघांनी लढाई चालू ठेवणे म्हणजे आत्मनाश होय, हीच गोष्ट सांगितली, तेव्हा रूडन्स्टेंडबाबत घेतलेला निर्णय हिट्लरने तडकाफडकी अमलात आणला.

१ जुलै, १९४४ ला फील्ड मार्शल व्हॉन क्लज् याने रूडन्स्टेंडकडून अधिकारसूत्रे हाती घेतली.

रूडस्न्टेंडची हकालपट्टी झाली व आपली झाली नाही, याला कारण आपले पूर्वकर्तृत्व व फ्रान्समधील लढाईतील आपली बहादुरी ही गोष्ट रोमेलच्या ध्यानात आली, पण यात समाधान मानून स्वस्थ राहण्याची ही वेळ नव्हती. बऱ्याच विचारांतो १५ जुलै, १९४४ ला रोमेलने फ्यूररला पत्र लिहिले. यात तो लिहितो–

" The troops are fighting heroically everywhere, but the unequal struggle is nearing its end. I must beg you to draw the proper conclusions without delay. I feel it my duty as Commander in chief of the Army Group to state this clearly.

[ आपल्या सेना सर्वत्र शौर्याने लढत आहेत, परंतु विषम शक्तीचा लढा लवकर संपणार आहे. यातून योग्य तो धडा घेऊन, उशीर न करता तुम्ही योग्य तो निर्णय घ्यावा, अशी माझी आग्रहाची विनंती आहे. सेनेचा कमांडर इन चीफ या नात्याने ही गोष्ट स्पष्टपणे सांगणे हे माझे कर्तव्य आहे, असे मला वाटते. ]

या पत्रानंतर आपला सहकारी जनरल स्पायडेल याला रोमेलने सांगितले,

" I have given him last chance. If he does not take it, we will act..."

[ मी शेवटची संधी फ्यूररला दिली आहे. त्याने काहीही केले नाही तर आपल्याला पाऊल उचलावे लागेल– ]

हिटलरच्या सुदैवाने हे पत्र हिटलरला मिळाले न मिळाले, तोच १७ जुलैला रोमेलच्या लष्करी गाडीवर एका दोस्ताच्या फायटर विमानाने खालवर येऊन गोळीबार केला व रोमेल जबर जखमी झाला ! या जखमांतून तो दुसरा दिवसही पाहणार नाही, अशीच सर्वांची अटकळ होती, परंतु ती रात्र रोमेलने काढली व प्राणसंकट टळले; तरी रोमेल जायबंदी होऊन लढाईची फार मोठी

हानी झाली. रोमेलच्या धडाडीचा व युद्धकुशलतेच्या आसपास येणारा सेनानी आता फ्यूररला उपलब्ध नव्हता. रोमेलला झालेला हा घातक हल्ला कटवाल्यांच्या दृष्टीने तर मोठाच धक्का देणारा ठरला. हिटलरला पदभ्रष्ट करून सर्व सूत्रे ज्याने हाती घ्यावयाची, तो जर्मन सेनेचा लाडका सेनानीच आता लष्करी रुग्णालयात मृत्यूशी झगडत होता.

मध्यंतरीच्या दोन-तीन आठवड्यांत रोमेलने काएन झुंजवत ठेवले होते व दोस्तांचे स्वारीचे आराखडे हादरवून टाकले होते. मॉंटगोमोरीला काएन घेता येईना, त्यामुळे ब्रिटिश अंगचोरपणा करीत आहेत, हा अमेरिकन सेनाधिकाऱ्यांचा संशय वाढीस लागला होता. या दोन-तीन आठवड्यांची हकीकत त्रोटक स्वरूपात पाहू. ब्रिटिशांच्या चीफ ऑफ जनरल स्टाफचे सेनानी प्रमुख, फील्ड मार्शल ॲलन ब्रूक याची दैनंदिनी ' Triumph in the west ' या ग्रंथात समाविष्ट आहे. त्यांच्या दैनंदिनीवरून या 'दोन-तीन आठवड्यांत दोस्तांच्या गोटात काय काय घडले, याचा अंदाज येईल. ॲलन ब्रूकनी आपल्या दैनंदिनीत खालील नोंदी केलेल्या आहेत.

## १२ जून, १९४४

मी आज पुनः फ्रान्समध्ये पाऊल ठेवले आहे. काल रात्री १०। वाजता मी पंत-प्रधानांची गाडी गाठली व सकाळी ७–३० ला आम्ही ' केल्व्हीन ' या विनाशिकेत पाऊल ठेवले. सकाळी ११ वाजता आम्ही फ्रेंच किनाऱ्याजवळ येऊ लागलो. किनाऱ्या-लगतचा सगळा समुद्र असंख्य जहाजांनी भरलेला होता. सर्व प्रकारची व आकारांची जहाजे त्यात होती. अर्धचंद्राकृती गोलाकारात मुद्दामच काही जहाजे बुडवून छोटेसे बंदर तयार करण्यात आले होते. याच बंदरावर आम्ही उतरलो. चार वर्षांपूर्वी आम्ही येथून पळ काढला होता. आठवणीचे आवेग सारखे येत आहेत. किनाऱ्यावर मॉंटी आला होता. त्याच्याबरोबर आम्ही सर्वांनी खाना घेतला.

नंतर आम्ही अंतर्भागात जीपने फिरू लागलो. सर्व पिके चांगली तरारली होती. गलेलठ्ठ जनावरे, तगडी घोडी, कोंबड्यांची खिल्लारे सर्वत्र संथपणे चरत होती. फ्रेंच नागरिकांना आमच्या आगमनाने फारसा आनंद झालेला दिसत नाही ! आहे त्या स्थितीतच ते सुखात होते व आम्ही पुनः त्यांच्या दाराशी युद्ध आणून देश उद्ध्वस्त करणार आहोत, अशी त्यांची भावना दिसत होती. विन्स्टन चर्चिल यांनी म्हटले–" इथे आसपास सगळीच सुस्तावलेली खिल्लारेच आहेत– " रात्री दहा वाजता आम्ही लंडनला परतलो.

**१५ जून :** आज पुनः जर्मनीची वैमानिकविरहित अस्त्रे लंडनवर आली आहेत. मॉंटगोमोरीला प्रतिकार वाढत आहे, असे दिसते. जर्मनांचे प्रतिहल्ले तीव्र होत आहेत. मॉंटगोमोरीने कळवले आहे– " आम्ही पाडलेली खिंडारे बुजवण्यासाठी रोमेल आपल्या राखीव पॅन्झर तुकड्या आणीत आहे, ही चांगली गोष्ट आहे. फक्त मला आता पुनः फेरविचार केला पाहिजे. "

१९ जून : गार्डस् चॅपेलवर वैमानिकविरहित अस्त्राने आकाश कोसळवले. साठ माणसे ठार झाली. त्यातच इव्हॅन कोबोल्ड आहे. त्याचे काल रात्री लिहिलेले पत्र इथे माझ्या टेबलावर आता आहे. फ्रान्समधील वृत्त जरा बरे आहे. चेरबूर्ग आखाताचा अमेरिकन सैन्याने मागील जर्मन फळीशी संबंध तोडला आहे. यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीला गेलो. विन्स्टन अगदी दहा वर्षांनी तरुण झाल्यासारखा फार्मात होता. फ्लाईंग बॉम्बमुळे पुन: लढाई लंडनच्या दारातच राहिली आहे, याचा हा परिणाम असावा !

२३ जून : सायंकाळ विन्स्टन चर्चिल यांची लांबलचक कैफियत ऐकण्यात गेली. जनरल अलेक्झांडर (इटालीतील ब्रि. सेनानी) याने व्हिएन्नापर्यंत चाल करावी, याबद्दल विन्स्टनचा आग्रह आहे. [या ठिकाणच्या सात डिव्हिजन्स काढून घेऊन त्या नार्मंडीत आणाव्या, असा चीफ ऑफ स्टाफचा इरादा होता. ] मी हे निदर्शनास आणले, की सप्टेंबर उलटेपर्यंत इटालीत आपण पिसा-रेमिनी ही रेषा ओलांडू शकणार नाही. ऐन थंडीत आल्प्स् पर्वतातून आपण लढणार आहोत काय ? चर्चा रात्री एक वाजेपर्यंत चालू होती. काहीही निष्पन्न झाले नाही.

२४ जून : चर्चिल यांचे जेवणासाठी निमंत्रण आले. विन्स्टन यांनी इटालीच्या लढाईचे नवे धोरण ठरविणारे टिपण तयार करीत असल्याचे सांगितले.

२६ जून : रविवार. इटालीतील धोरणाबाबत काय टिपण तयार होत आहे, त्याची वाट पाहत आहोत.

३० जून : अमेरिकेच्या अध्यक्षांचे पत्र आले. बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या आहेत. (विन्स्टन चर्चिल व जनरल अलेक्झांडर यांचा आल्पस्‌मधून व्हिएन्नाच्या दिशेने पुढे सरकण्याच्या योजनेला अमेरिकन अध्यक्षांचा व सेनानींचाही विरोध होता.) अमेरिकन सेनादले आता सर्वत्र अधिक संख्येने असल्यामुळे त्यांना असे वाटते, की सर्व निर्णय त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे व्हायला हवेत ! मला वाटते विन्स्टन चर्चिल यांनी हे लक्षात घेऊन अधिक वादविवाद टाळायला हवा ...

आताच विन्स्टनची गाठ घेऊन आलो. सुरवातीला वाटले, चर्चिल आपला हेका सोडणार नाहीत, परंतु अखेर त्यांनी त्राग्याने का होईना, अमेरिकन अध्यक्षांचे म्हणणे मान्य करून आपला हेका सोडला.

२ जुलै : जनरल अलेक्झांडर यांना मायदेशी भेटीसाठी बोलावणारी तार रवाना झाली.

३ जुलै : चेरबूर्गच्या दक्षिणेस अमेरिकन सेनेची चढाई सुरू झाली आहे. उडत्या बॉम्बचा धोका वाढलाच आहे. सायंकाळी ५–३० वाजता मंत्रिमंडळाच्या बैठकीला सुरवात झाली. चर्चिल यांचे भाषण आधी लांबले व नंतर उडत्या बॉम्बविषयी बोलायला वेळ कमी पडला.

४ जुलै : चीफ ऑफ स्टाफची बैठक. उडत्या बॉम्बच्या प्रतिकाराचा विचार

प्रामुख्याने केला. फायटर विमाने पुरेशी वेगाची नाहीत, म्हणून निरुपयोगी. विमान-विरोधी तोफा या बॉम्बला टिपू शकत नाहीत. आकाशात सोडलेल्या बलून्सच्या तारा कापल्या जातात. जिथून हे बॉम्ब येत आहेत, ती ठिकाणे नेमकी टिपणे शक्य नाही. एकंदर सभेत निराशेचे वातावरण होते.

सकाळीच जनरल अलेक्झांडरशी बोलणे केले. केसरलिंगच्या फौजांना पिसा-रिमिनी रेषेपर्यंत पोचण्यापूर्वी धूळ चारणे आता त्याला अशक्य आहे. (अलेक्झांडर-कडून सेनेची पथके आता काढून घेण्याचे ठरले होते.) जनरल अलेक्झांडर नाराज आहे.


५ जुलै : विन्स्टन चर्चिल यांचे उडत्या बॉम्बच्या धोरणाबाबतचे भाषण तयार करण्याचे काम चालू आहे. या अस्त्रांच्या वापराचा सूड म्हणून लहान लहान जर्मन शहरांवर बेचिराख होईपर्यंत बॉम्बवर्षाव करण्याचे ठरत आहे. माझा व्यक्तिश: या गोष्टीला सक्त विरोध आहे. आपले ५० टक्के विमानदल या बॉम्बचा प्रतिकार करण्यासाठी तुटून पडले आहे. याच्या विनाशापायी २५ टक्के उत्पादनात घट झाली आहे. जर्मनांना या सर्व गोष्टींचा अंदाज आहे व ते याचा फायदा उठवल्याशिवाय राहणार नाहीत.

६. जुलै : रात्री दहा वाजता विन्स्टन यांची भेट झाली. बोलणी संपेपर्यंत पहा-टेचे दोन वाजून गेले. आजच पार्लमेंटमध्ये केलेल्या उडत्या बॉम्बविषयीच्या भाष-णामुळे चर्चिल थकलेले होते. ' काएन 'च्या लढाईत अपेक्षेप्रमाणे प्रगती होत नाही, यामुळे चर्चिल यांनी मॉन्टीला बऱ्याच शिव्या घातल्या. (He began to abuse Monty) माझे माथे भडकले. मी विचारले– " पाच मिनिटेदेखील सेनानींना वेळ देण्यास तुम्ही तयार नाही काय ? उगाच त्यांची घाईने अवहेलना करण्यात काय अर्थ आहे ? सगळ्या मंत्र्यांच्यादेखत आज तुम्ही अलेक्झांडरवर तोंडसुख घेतले, का तर कॅसिनो भागात त्याची प्रगती नाही म्हणून !" चर्चिल माझ्यावरही उखडले. हरकत नाही. ...... पण याचा भविष्यात तरी चांगला परिणाम होईलसे वाटते.

[ माँटगोमोरीने २४ जूनपूर्वी चेरबूर्ग व काएन पडेल, असे कळवले होते; परंतु जुलैचा पहिला आठवडा संपत आला तरी काएन पडत नव्हते. काएनच्या लढाईत जर्मनांनी चिलखती-गाड्यांचे बळ एकवटले, तर त्याचा फायदा इतर आघाड्यांवर घेण्यात यावा, अशी माँटगोमोरीची अपेक्षा होती–त्याने कळवले होते ......

" We may use enemy's excessive resistance at one point to stretch & break his lines at another."

[ परंतु दुसऱ्या आघाड्यांवर माँटगोमोरीची हुकमत नव्हती. अमेरिकन सेनानींना वाटत होते, काएनच्या लढाईत माँटगोमोरी मुद्दामच वेळ काढत आहे. अमेरिकन सेनानी बिथरले आहेत, याचा सुगावा चर्चिल यांना लागला होता व चर्चिल माँट-गोमोरीवर उखडले होते. नुकत्याच झालेल्या छांब भागातील लढाईत पाकिस्तानचे सर्व रणगाडे छांब भागात गुंतवल्यावर लाहोर विभागात भारताने जी सहजी हाल-




९ जुलै १९४४

चर्चा केली, त्या लढाईप्रमाणेच काएन विभागात सर्व पॅन्झर रणगाडे एकवटल्यावर काएनपासून दूर असलेल्या ठिकाणांवर अमेरिकन सेनादलांनी वेगाने पुढे जावे, अशी मॉंटगोमोरीची अत्यंत रास्त अपेक्षा होती. ]

९ जुलै : आज रविवार. मॉन्टीने ' काएन ' घेतल्याचे वृत्त आज आले.

१२ जुलै : चीफ ऑफ स्टाफची बैठक आज झाली. शस्त्रसंधीनंतर जर्मनांचा कबजा करताना विभाग कसे असावे, याचा विचार झाला. तीन विभाग असावे. पूर्व विभाग, वायव्य विभाग व आग्नेय विभाग. रशियनांनी पूर्व विभाग व्यापावा. इतर दोन विभाग कुणी व्यापावे, या बाबतीत आमचे व अमेरिकेचे मतभेद झाले. दोघांनाही वायव्य विभाग हवा आहे.

१९ जुलै : उद्या सकाळीच मॉन्टीला भेटण्यासाठी जायचे होते. तितक्यात काल रात्री ९॥ वाजता पंतप्रधानांचे निमंत्रण आले. मी गेलो तेव्हा चर्चिल अंथरुणावर पडलेले होते, परंतु खवळलेले होते. त्यांनी बोलायला सुरवात केली–

" मला हवे असेल तेव्हा फ्रान्समध्ये मी जाऊ शकतो ! मला अडवणारा हा मॉंटगोमोरी कोण ? मी संरक्षणमंत्री आहे. आघाडीला भेट देण्याचा मला अधिकार आहे. मला हे खपणार नाही. " मला समजेना, झाले तरी काय ! बोलण्यावरून लक्षात आले, की सुप्रीम कमांडर आयसेन हॉवर यांना मॉंटगोमोरीने कळवले होते,

की तूर्त आघाडीला कुणी भेट देण्यास येऊ नये. याचा रोख मुख्यतः आपल्यावर आहे, असा चर्चिल यांचा समज झाला होता. मी समजूत घातली, की मॉन्टीला भेटून पाच मिनिटांत मी ही गोष्ट काय आहे ते पाहतो व कळवतो.

मी दुसऱ्या दिवशी आघाडीला भेट देण्यासाठी गेलो. मॉन्टीची गाठ घेतली. काएन घेतल्यामुळे तो फार खुशीत होता. त्याने खुलासा करणारे पत्र पंतप्रधानांना लिहिले व आघाडीला भेट देण्याची उलट विनंती केली. मी हे पत्र सायंकाळी चर्चिल यांना रवाना केले.

रात्री चर्चिल यांचा फोन आला, की मॉन्टगोमेरीचे पत्र वाचून समाधान झाले.

पत्राचा परिणाम जादूसारखा झाला. मला वाटते, पत्र वाचताना मी स्वतः फ्रान्समध्ये गेलो होतो व मीच ते पत्र आणले, ही गोष्टदेखील चर्चिल विसरून गेले असावेत. [ Triumph in the West ]

## स्टूफेनबर्गला बढती

काएन पडल्यानंतर आठवड्याभरात पूर्वी सांगितल्याप्रमाणे १७ जुलैला रोमेल जखमी झाला व त्याची रुग्णालयात रवानगी झाली. हिटलरविरोधी कटवाल्यांचे या घटनेमुळे कंबरडेच मोडल्यासारखे झाले. पराभव आता समोर दिसू लागला होता. हिटलरला पदभ्रष्ट करून जर्मनीची पुढची हानी टाळावयाची तर आता तातडीने जे काही जमेल ते करणे भाग होते. कारण जर्मनीच्या सरहद्दीवर चारी बाजूंनी शत्रू-सैन्याचे लोंढे शिरल्यानंतर काही केले काय किंवा न केले काय, सारखेच होते.

या दृष्टीने एकच सोयीची घटना घडली होती. हिटलरचा वधच करावा या धोरणाचा पुरस्कर्ता स्टूफेनबर्ग याला जूनच्या अखेरीस कर्नल म्हणून बढती मिळाली व त्याची नेमणूक जनरल फ्रॉमच्या स्टाफवर झाली. जनरल फ्रॉम हा राखीव सेनेचा प्रमुख होता व यामुळे कर्नल स्टूफेनबर्गला आता हिटलरशी प्रत्यक्ष संबंध ठेवणे सोयीचे झाले होते. रशियन आघाडीवर होणाऱ्या हानीमुळे हिटलरला वारंवार, जनरल फ्रॉम किंवा कर्नल स्टूफेनबर्ग यांना नव्या अधिकाऱ्याच्या भरतीचा विचारविनिमय करण्यासाठी छावणीत बोलावून घ्यावे लागे. अशाच एका चर्चेसाठी निमंत्रण आल्यावर हिटलरचा टाईम बॉम्बने वध करावयाचा, असा विचार आता कर्नल स्टूफेनबर्गने पक्का करून टाकला होता. तो संधीची वाट पाहत होता.

केवळ हिटलरचा वध करण्याची कामगिरी करून स्टूफेनबर्ग थांबणार नव्हता, तर ताबडतोब जनरल फ्रॉमच्या वतीने राखीव सेनादलाला फितवून बर्लिनचा कबजा करण्याची कामगिरीही त्याने अंगावर घेतली होती. या दोन्ही गोष्टी एकाच दिवशी उरकणे भाग होते. हिटलरचा वध व सैन्याचा कबजा यांत फक्त दोन किंवा तीन तासांचेच अंतर पडून चालण्यासारखे होते.

हिटलर तीन ठिकाणी नेहमी असे– ऑबरसाल्झबर्ग या फ्रेंच आघाडीवरील छावणीत, रस्टेनबर्ग या प्राशियातील छावणीत किंवा बर्लिनमध्ये. हिटलरबरोबरच

गोअरिंग व हिमलर यांनाही उडवणे भाग होते. कारण अन्यथा हिटलरचा हुतात्मा करून व त्याच्या नावे एक हुतात्मादिन वहाल करून हिटलरचीच धोरणे चालविणारे सरकार गोअरिंग व हिमलर निर्माण करतील, अशी रास्त शंका स्टूफेनबर्गला होती, पण अतिविचार हा कुठल्याही साहसाला मारक ठरतो. या न्यायाने तिघांना एकदम उडवण्याच्या प्रयत्नात स्टूफेनबर्गने आलेल्या चांगल्या संधी गमावल्या व अखेर हिटलरच्या वधाचा प्रयत्नही फसला.

**त्याचे असे झाले–**

१९ जुलै, १९४४ ला स्टूफेनबर्गला रस्टेनबर्ग छावणीतून फ्यूररचे बोलावणे आले. नव्या रिक्रूटभरतीबद्दल काही विचारविनिमयासाठी हे निमंत्रण होते. दि.२०जुलैला हिटलरच्या छावणीत होणाऱ्या लष्करी बैठकीत स्टूफेनबर्गला आपल्या या बाबतचा अहवाल द्यावयाचा होता. स्टूफेनबर्ग रस्टेनबर्गला जाण्यास निघण्यापूर्वी त्याने जनरल बेक या कटातील सेनानीला इशारा दिला व जनरल बेक बर्लिनमध्ये दाखल होऊन दोघांचा पूर्ण विचारविनिमय होऊन स्टूफेनबर्ग छावणीकडे निघाला. जनरल बेकने २० जुलैला क्रांतीचा दिवस म्हणून बर्लिनमधील कटात सामील झालेल्या लष्करी अधिकाऱ्यांना कळवला.

२० जुलै, १९४४ ला सकाळी ६ वाजता कर्नल स्टूफेनबर्ग आपला सहकारी लेफ्ट. वेर्नर याच्यासह बर्लिनच्या रॅग्जडॉर्फ विमानतळावर दाखल झाला. त्याच्या ब्रीफकेसमध्ये अहवालाचे कागद होते आणि शिवाय एका शर्टात गुंडाळलेला टाईमबॉम्बही होता.

स. ७ ला विमान सुटले व १० वा. स्टूफेनबर्ग व वेर्नर रस्टेनबर्ग येथे उतरले. वेर्नरने वैमानिकाला सूचना दिली, की त्याने विमानातच राहावे. कारण दुपारी १२ च्या आत तातडीने पुन: बर्लिनला परतावयाचे आहे.

हिटलरचे हे छावणीतील निवासस्थान कडक बंदोबस्तात नेहमी असे. इलेक्ट्रिक प्रवाह सोडलेली तारांची तीन कुंपणे एकाच्या आत एक अशी त्याभोवती होती व अत्यंत कडवे S. S. सैनिक तिथे सतत पहारा करीत असत. या छावणीतील बिनतारी संदेशाचे काम करणारा माणूस या कटात सामील झालेला होता व हिटलरचा वध होताच, बर्लिनला जनरल बेकला संदेश पाठवून सर्व संदेशयंत्रणा लगेच निकामी करून टाकण्याची कामगिरी या माणसाकडे होती.

कर्नल स्टूफेनबर्ग व लेफ्ट. वेर्नर दोघ सहिसलामत आत तर आले. स्टूफेनबर्गची अपेक्षा होती, की बैठक जमिनीखाली असलेल्या 'बंकर' मध्ये होईल व बॉम्ब उडवायला 'बंकर' अधिक सुयोग्य होता. त्याच्या दुर्दैवाने आल्या आल्या जनरल कायटेलने सांगितले, की आजची बैठक इमारतीतच हॉलमध्ये आहे. १२–३० ला काही मिनिटे कमी असताना स्टूफेनबर्ग कायटेलसह त्याच्या कचेरीतून बाहेर पडला व ते दोघे बैठकीच्या हॉलकडे जाऊ लागले. व्हरांड्यातून जाताना स्टूफेनबर्ग एकदम

म्हणाला की, "टोपी व पट्टा खोलीतच राहिला." इतके म्हणून कायटेलला काहीही बोलण्याची संधी न देता तो पुन्हा कायटेलच्या खोलीत परतला. तेथे मुद्दामच विसरलेली टोपी व पट्टा त्याने घेतला व ब्रीफकेस उघडून त्याने टाईमबॉम्बची वायर हळूहळू जाळत जाणारी ॲसिडची कॅपसूल आपल्या हाताच्या बोटांनी फोडली. बिचाऱ्याला तीनच बोटे उरली होती व तेवढी यासाठी पुरेशी होती! वायर आता जळू लागली होती व दहा मिनिटांत बॉम्ब उडणार हे निश्चित होते.

स्टूफेनबर्ग बॉम्बची पिशवी घेऊन धावत पुन: बाहेर आला, तो कायलेट मागे वळून त्याला घाई करण्याविषयी मोठ्याने ओरडतच होता. कारण कायटेलच्या म्हणण्याप्रमाणे बैठक सुरू झाली होती.

स्टूफेनबर्गला तेच हवे होते. दोघे दालनात शिरले. शिरताना उजव्या बाजूस असलेल्या टेलिफोनवर काम करणाऱ्या माणसाला स्टूफेनबर्गने सांगितले,की पाच-दहा मिनिटांत बर्लिनहून फोन येईल व काही माहिती तातडीने मागविली आहे, ती घेण्याकरता तो पुनः फोनपाशी येईल. हे सर्व कायटेलने ऐकावे यासाठीच होते. बैठकीतून मध्येच आपण बाहेर जाऊ, तेव्हा कायटेलला संशय येऊ नये, यासाठी स्टूफेनबर्गने टाकलेला हा फासा होता.

दोघे दलनात शिरले. चार मिनिटे आतापर्यंत झाली होती. फक्त सहा मिनिटांत बॉम्ब उडणार होता. दालन तसे लहान होते. ३०×५० फूट असावे. दहा खिडक्या होत्या व त्या सर्व सताड उघडचा होत्या. मध्यभागी एक अंडाकृती टेबल होते, ते १८×५ फूट क्षेत्रफळाचे होते. या टेबलाला चार खूर नव्हते, तर दोन टोकाला दोन भक्कम सलग आधार होते. टेबलाची ती रचना मुद्दामच अशी केली होती व या रचनेमुळे हिटलरचे प्राण वाचले, हे पुढे लक्षात येईल.

स्टूफेनबर्ग टेबलाजवळ आला, तेव्हा फ्यूरर टेबलाच्या विरुद्ध बाजूला मध्यभागी खुर्चीवर बसलेला होता. दरवाजाकडे त्याची पाठ होती. त्याच्या डाव्या हाताला कायटेल व कायटेलपलीकडे जोडल् असे आता उभे होते. बाकीचे अधिकारी उजव्या हाताला होते. या व्यतिरिक्त १८ लहान अधिकारी टेबलाभोवती उभे होते व S. S. संरक्षक पोलीस त्यांच्या मागे होते. फक्त हिटलर खुर्चीवर बसलेला होता व हातातल्या मॅग्निफाईंग ग्लासमधून तो समोर पसरलेला नकाशा निरखून पाहत होता.

## पिशवीची हलवाहलव

स्टूफेनबर्ग उजव्या बाजूला जे अधिकारी होते, त्यांत सामील झाला. त्याने हातातील कातडी पिशवी टेबलाखाली हळूच ठेवली व तिला हिटलरपासून जवळजवळ सहासात फूट लांब असलेल्या टेबलाच्या सलग आधारावर टेकवून ठेवणे स्टूफेनबर्गला भाग पडले. १२–३७ झाले होते. पाच मिनिटे उरली होती. जनरल हॉशिंगर हा बोलत होता व बाकी सारे समोर पसरलेल्या नकाशाकडे पाहत त्याचे बोलणे ऐकत होते.

स्टूफेनबर्ग पुन: दालनाबाहेर आला, ते फारसे कुणाला समजले नाही. फक्त स्टूफेनबर्गशेजारी असलेल्या जनरल ब्रँड याने त्याला बाहेर जाताना पाहिले. तो थोडा सरकताच त्याच्या पायाला खालची ब्रीफकेस लागली. पोट पुढे आलेली ती कातडी पिशवी सारखी पायाला लागणार, म्हणून त्याने उचलून ती टेबलाचा सलग आधार होता, त्याच्या बाहेरच्या बाजूस ती ठेवली. म्हणजे जी पिशवी टेबलाखाली होती, ती आता टेबलाच्या कडेबाहेर गेली व हिटलर व टाईमबॉम्ब यांच्यामध्ये टेबलाचा जाड सलग आधार उभा झाला. जनरल ब्रँडच्या या हलवाहलवीने हिटलर वाचला, परंतु ब्रँड मात्र स्फोटात खलास झाला.

जनरल हॉशिंगरचे बोलणे संपत आले होते. आता पुढचा अहवाल स्टूफेनबर्गचा होता व त्याला ब्रीफकेसमधून कागद काढण्याचा डोळ्यांनी इशारा करण्याकरिता कायटेल वाकून पाहू लागला......तो स्टूफेनबर्ग त्याला दिसेना. हा असा काय चमत्कारिक वागतो आहे, असा संशय कायटेलला आला व तो बहुधा फोन आल्याने बाहेर गेला असेल, हे ध्यानी येऊन कायटेलही दालनाबाहेर आला.

कायटेलने ऑपरेटरला विचारले, " स्टूफेनबर्ग कुठे आहे ? " ऑपरेटरने सांगितले, की तो धाईघाईने इमारतीबाहेर नुकताच निघून गेला. कायटेलचा संशय बळावला. दालनात शिरण्यासाठी तो वळला. जनरल हॉशिंगर सांगत होता—

" रशियन सैन्य मोठया संख्येने दूना (Duna) च्या उत्तरेस मुसंडी मारीत आहे...... "

वाक्य पुरे झालेच नाही.

दुपारचे १२-४२ झाले होते आणि त्याच क्षणी बॉम्ब उडाला !

स्टूफेनबर्ग सुमारे १०० यार्डावरून पाहत होता. त्याने वर्णन केले आहे-

" मोठा स्फोट झाला. धुरात व आगीच्या लोळात इमारत गुरफटून गेली. खिडक्यांतून काहीजण बाहेर फेकले गेले. माझी खात्री झाली की खोलीतला प्रत्येक माणूस मेला आहे किंवा मरणाच्या वाटेवर आहे-- "

स्टूफेनबर्ग व बेर्नर विमानाने पुन: बर्लिनच्या दिशेने उडाले, तेव्हा दुपारचा एक वाजला होता. स्टूफेनबर्गच्या मनात असंख्य प्रश्नचिन्हे होती. ठरल्याप्रमाणे बर्लिनला संदेश मिळून उठाव झालेला असेल काय ? विमानात बिनतारी संदेशाची सोय नव्हती .....यामुळे तर्क करण्यापलीकडे तो काही करू शकत नव्हता. रँग्जडॉर्फ विमानतळावर ३-४५ वाजता उतरताच, स्टूफेनबर्ग जवळच्या टेलिफोन बूथपाशी गेला. हिटलर मारला गेल्याची खात्रीलायक बातमी हाती न आल्याने कुणीच काही केलेले नव्हते ! स्टूफेनबर्गच्या लक्षात आले, की रस्टेनबर्गला स्फोट झाल्यानंतर मिळालेले महत्त्वाचे तीन तास फुकट गेलेले आहेत.

हिटलर फक्त जखमी झाला होता. त्याचे पाय भाजले होते. उजवा हात खरचटला होता व कानाचे पडदे फाटले होते. पाठीवर एक तुळई निसटती पडल्यामुळे त्याच्या

पाठीत मुका मार बसलेला होता. कायटेलच्या हातावर रेलून तो इमारतीबाहेर पडला, तेव्हा त्याचा चेहेरा डागळलेला होता व कपड्यांची लक्तरे झालेली होती.

कायटेल हा स्टूफेनबर्गपाठोपाठ दालनाबाहेर आल्यामुळे वाचला होता. जनरल जोडल् व जनरल होर्शिगर जखमी झाले होते ...... बाकीचे ब्रँड आदि अधिकारी खोलीत खलास झालेले होते.

हिटलरला प्रथम वाटले, की शत्रूच्या विमानाने अचूक बॉम्ब फेकल्यामुळे हा स्फोट झाला. परंतु स्फोटाचा आवाज ऐकताच हिमलर तेथे पोचला होता. स्फोटाची पाहणी सुरू झाली होती. स्फोट टाईम बॉम्बने झाला, ही गोष्ट लगेच स्पष्ट झाली.

कायटेलने दुवा पुरवला व स्टूफेनबर्गचा शोध सुरू झाला.

स्टूफेनबर्गला विमानतळावर उतरताच बर्लिन येथे अटक करावी, असा संदेश देण्यासाठी हिमलर बिनतारी संदेशवाहक यंत्राकडे गेला, तो काय? बिनतारी संदेश व टेलिफोन ही दोन्ही साधने तोडलेली होती !

### ध्येयाचा पुनःसाक्षात्कार

दुपारी चार वाजता मुसोलिनी हिटलरच्या भेटीसाठी रस्टेनबर्गला येणार होता. वस्तुतः तो थोडा आधी यायचा, परंतु त्याची गाडी उशिरा पोचणार होती. हिटलर या धक्क्यातून तासाभरात सावरला. कारण बर्लिन येथे काही सेनाधिकाऱ्यांनी उठाव केल्याचे वृत्त अजून पोचले नव्हते – म्हणजे पोचू शकत नव्हते.

हिटलरने मुसोलिनीचे स्वागत केले. त्याची अवस्था स्वागताला स्टेशनवर जावे, अशी आता नव्हती, तरी तो गेला. दोघांची ही शेवटची भेट ठरणार होती......व याच दिवशी नेमका हिटलरच्या वधाचा प्रयत्न व्हावा, ही गोष्ट विशेष योगायोगाची अशी वाटते! मुसोलिनीसह हिटलरने स्फोट झाला, त्या इमारतीला सायंकाळी भेट दिली. डॉ. श्मिद दुभाष्या बरोबर होता. हिटलरने यावेळी मुसोलिनीला काय सांगितले, हे त्याने नमूद केले आहे. हम करेसो कायदा या वृत्तीने झपाटलेले नेते जेव्हा अशा तऱ्हेच्या वधाच्या प्रयत्नातून दैवयोगाने वाचतात, तेव्हा त्यांना 'आपण जिवंत राहावे, अशी परमेश्वराचीच इच्छा होती,' असा मोठा आशादायक साक्षात्कार होत असतो! तसाच तो यावेळी हिटलरला झाला.

हिटलरचे उद्गार असे आहेत —

"I was standing here by the table. The bomb went off just in front of my feet. Undoubtedly it is my fate to continue on my way & bring my task to completion. Having now escaped death, I am more than ever convinced that the great cause which I serve will be brought through its present perils & that everything can be brought to a good end. Our position is bad, but what has happend here today gives me new courage."

[ मी इथे टेबलाशी उभा होतो. माझ्या पायांच्या समोरच बॉम्ब उडवला गेला. खरोखरच मी माझ्या मार्गाने जावे व कार्य तडीस न्यावे, असे माझे भाग्य दिसते. आज मृत्यूला हुलकावणी दिल्यानंतर माझी आता अशी खात्री झाली आहे, की ज्या महान कार्याची मी सेवा करीत आहे, ते सध्याच्या सर्व संकटांतून चांगल्यारीतीने तडीस जाणार आहे. आपली परिस्थिती आज वाईट आहे, परंतु आज इथे जे घडले, त्यामुळे मला नवे धैर्य प्राप्त झाले आहे. ]

यावेळी सायंकाळी पाचचा सुमार झाला होता. संध्याकाळच्या मावळत्या प्रकाशात वधाच्या प्रयत्नाने अस्वस्थ झालेला फ्यूरर व ज्याचा अर्ध्याहून अधिक मायदेश दोस्तांनी व्यापलेला होता, असा इटालीचा सुखासीन हुकूमशहा मुसोलिनी यांचे ते दर्शन किती केविलवाणे दिसले असेल ?

आता पुन: बर्लिनशी फोनवरून संबंध सुरू झाला होता व बर्लिनमधील उठावाच्या बातम्या येऊ लागल्या होत्या.

तिकडे बर्लिनमध्ये स्टूफेनबर्गने कटवाल्यांना फोन करून तावडतोब योजनेप्रमाणे उठाव करण्यास भाग पाडले होते. स्टूफेनबर्गचा नजीकचा वरिष्ठ अधिकारी जनरल फ्रॉम याचे नक्की ठरत नव्हते, की कटात सामील व्हायचे की नाही ? कट बहुधा फसतात, ते असल्या असंख्य दिशाहीन दगलबाजीमुळे ! जनरल फ्रॉम याला स्टूफेनबर्गने फोनवरून सांगितले,की हिटलरचा वध झाला आहे. तेव्हा जनलर फ्रॉमने रॅस्टॅनबर्गला फोन लावला......

ज. फ्रॉम : हेडक्वार्टर्सला काय घडले ? इथे बर्लिनमध्ये बेताल अफवा पसरल्या आहेत.

ज. कायटेल : काय घडावयाचे होते ? इथे तर सर्व ठीक आहे.

ज. फ्रॉम : मला इथे अशी बातमी लागली, की फ्यूररचा वध करण्यात आला आहे.

ज. कायटल : हे सर्व खोटे आहे. ही गोष्ट खरी आहे, की फ्यूररचा प्राण घेण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु तो प्रयत्न फसला आहे. फ्यूरर जिवंत आहे. कर्नल स्टूफेन-बर्ग तिथे पोचला काय ?

ज. फ्रॉम : नाही, तो अजून पोचलेला नाही.

जनरल फ्रॉमचे आता नक्की झाले, की कटात सामील व्हावयाचे नाही. बंड करीत नाही, याचा अर्थ कट चिरडून स्वामिनिष्ठेचे प्रदर्शन केले पाहिजे. जनरल फ्रॉमने भरभर आदेश देऊन जनरल बेक व स्टूफेनबर्ग यांनाच पकडले. त्यांच्याबरोबर आणखी काही कटवाले जनरल फ्रॉम कटातील आहे, या समजुतीने पायी चालत त्याच्या जाळयात आले. या सर्वांना जनरल फ्रॉमने गोळया घातल्या ! बंड फसले. स्टूफेनबर्ग व जनरल बेक अशा स्थितीने एका कटवाल्याच्याच गोळयांचे धनी झाले.

कॅप्टन स्कोर्झेनी हा व्हिएन्नाला निघाला होता. तो तातडीने बर्लिनला आला व

सर्व S. S. संघटनेला त्याने बंडात सामील न होण्याचे व फ्यूररशी एकनिष्ठ राहण्याचे आवाहन करताच S.S. संघटनेतील उचमळणारी प्यादी थंड झाली होती.

**माझ्या जर्मन मित्रांनो !**

अपरात्री १ वाजता हिटलरचा आवाज सर्व रेडिओ–केंद्रांवरून जर्मन जनतेने ऐकला. फ्यूररचा आवाज ओळखीचा होता. सर्वांची खात्री पटली–फ्यूरर जिवंत आहे. खणखणीत आहे. त्याचे शब्द जर्मन जनता ऐकू लागली–

" My German comrades !

" If I speak to you today, it is first in order that you should hear my voice & should know that I am unhurt & well & secondly that you should know of a crime unparalleled in German history. "

[ माझ्या जर्मन मित्रांनो !

मी आज तुमच्याशी अशाकरता बोलत आहे, की एक तर माझा आवाज ऐकून तुम्हाला हे कळावे, की मी सुस्थितीत असून मला काहीही अपघात झालेला नाही व दुसरी गोष्ट ही, की जर्मन इतिहासात आजवर घडली नसेल, अशा एका अधम कृत्याची तुम्हाला कल्पना यावी. ]

भाषणाच्या अखेरीस बंडवाल्यांना हिटलरने इशारा दिला–

" This time we shall settle account with them in the manner to which we National Socialists are accustomed—"

[ यावेळी आम्ही कटवाल्यांचा हिशोब त्याच विशिष्ट प्रकाराने चुकता करू, की ज्या प्रकाराची आम्हा नॅशनल सोशालिस्टांना चांगली जानपछान आहे. ]

हिटलरने आपला हा शब्दही खरा केला !

स्वबांधवांविरुद्धच सुरू झालेल्या हत्याकांडात अनेकांचा बळी गेला. पियानोच्या तारांचे फास गळ्याभोवती लावून पाहणाऱ्यांनाही मूर्च्छा आणणाऱ्या पद्धतीने, कटात सामील झालेल्या अधिकाऱ्यांचे शिरकाण करण्यात आले.

मॉस्को येथील माजी जर्मन वकील शूलेनबर्ग व रोम येथील माजी जर्मन वकील हासल या दोघांना अनुक्रमे १० नोव्हेंबर व ८ सप्टेंबर रोजी फासावर लटकावण्यात आले. अॅडमिरल कनारिस याला फाशीची शिक्षा देण्यात आली होती. ९ एप्रिल, १९४५ ला शरणागतीपूर्वी घाईघाईने ती अमलात आणली गेली. जनरल हालडर व डॉ. शाक्त हे दोघे कैदेत पडले व ४ मे, १९४५ ला त्यांची अमेरिकन सेनेने सुटका केली.

या शिरकाणात लढाईवर परिणाम करणारे चार सेनानी बळी गेले, ते म्हणजे फील्ड मार्शल क्लज, फील्ड मार्शल रोमेल, जनरल स्टुएपनागेल व जनरल स्पायडेल !

## चार सेनानींच्या चार तऱ्हा

२० जुलैला ज्या दिवशी हिटलरच्या वधाचा प्रयत्न झाला, त्याच दिवशी सायंकाळी फ्रान्समधील आघाडीवरील एका छावणीत चार सेनानी खान्याकरता जमले होते. फील्ड मार्शल क्लज (याने नुकताच फील्ड मार्शल रोमेलकडूनही अधिकार घेतला होता), जनरल स्पायडेल-चीफ ऑफ स्टाफ, जनरल स्टुएपनागेल व जनरल होफॅकेर हे ते चौघे सेनानी होत. यांपैकी जनरल होफॅकर याला दुपारीच फोन मिळाला होता, की रस्टॅनबर्ग येथे हिटलरवर बॉम्ब फेकण्यात आलेला असून, बर्लिनमध्येही बंडाला सुरवात झाली आहे. हा फोन खुद्द स्टूफेनबर्गनेच मागे सांगितल्याप्रमाणे विमानतळावरून केला होता. सायंकाळच्या जेवणाच्या वेळी अर्थातच चर्चा चालू होती, की खरोखरीच फ्यूरर मेला की नाही ? फील्ड मार्शल क्लजचे काही निश्चित ठरत नव्हते. त्याला कट यशस्वी व्हावा, असे वाटत होते, परंतु कट यशस्वी होण्याची खात्री नसेल, तर तो काही करू इच्छीत नव्हता. इतक्यात जनरल ब्रूमेंट्रिट तेथे आला व त्याने सांगितले—"आताच बर्लिनहून आलेल्या फोनवरून असे दिसते की फ्यूररवर प्राणघातक हल्ला झाला असला, तरी तो त्यातून वाचला आहे. रात्री रेडिओवर त्याचे भाषण आहे व कटवाल्यांची धरपकड बर्लिनमध्ये सुरू झाली आहे."

यावर जेवता जेवता क्लज म्हणाला—

" Well Gentlemen, the attempt has failed– everything is over."

[ मित्रांनो, हा प्रयत्न फसला आहे, आता करण्यासारखे काही नाही. ]

या उद्‌गारावर स्टुएपनागेल म्हणाला—

" Field Marshal, I thought you were acquainted with the plans. Something must be done...."

[ फील्ड मार्शल, मला वाटते, की या कटाच्या सिद्धतेची तुम्हाला कल्पना होतीच. काहीतरी केलेच पाहिजे. ]

जनरल स्टुएपनागेल याने पॅरिसमधील सर्व S. S. सैनिकांना कैदेत टाकून कटाला सहाय्य सुरूही केलेले होते. त्याचे हे कृत्य झाकण्यासारखे नाही, हे लक्षात येऊन क्लजने उलट त्याला सल्ला दिला—

" मला वाटते, तुम्ही आता मुलकी पोषाखात भूमिगत व्हावे, हाच एक मार्ग आहे."

परंतु जनरल स्टुएपनागेल याला हा पळपुटा मार्ग पसंत पडेना. तो लगोलग मोटारीने बर्लिनच्या दिशेने निघाला. वाटेत व्हर्डून येथे तो थोडा वेळ थांबला. पहिल्या महायुद्धात याच रणांगणावर त्याने एका बटालिअनचे नेतृत्व केले होते. मोटारीतून उतरून तो त्या मैदानाच्या दिशेने गेला. थोड्या वेळाने मोटारीच्या ड्रायव्हरला व त्याच्या संरक्षकाला एक रिव्हॉल्व्हर झाडल्याचा आवाज आला. दोघे धावत त्या दिशेने गेले. एका जवळच्या नाल्यात स्टुएपनागेल पडला होता. त्याच्या एका

डोळ्यातून गोळी गेली होती व तो बाहेर लोंबत होता. दुसऱ्या डोळ्यालाही जबर जखम झाली होती. व्हर्डूनच्या लष्करी रुग्णालयात त्याचा दुसरा डोळाही काढण्यात आला.

आंधळा झालेला व परावलंबी झालेल्या जनरल स्टुएपनागेलला बर्लिनला आणण्यात आले. जनता न्यायालयापुढे त्याच्या चौकशीचा हुकूम झाला. ३० ऑगस्टला त्याला फाशी देण्यात आले !

फील्ड मार्शल क्लज व जनरल फ्राम हे दोघेही या हत्याकांडातून निसटू शकले नाहीत. जनरल हॉफेकर याला अटक झाली, कारण स्टूफेनबर्गचा फोन त्यालाच आलेला होता, हे उघडकीस आले. या सेनानींचा तुरुंगात गेस्टॅपोने छळ सुरू केला व कटवाल्यांना फील्ड मार्शलपैकी क्लज व रोमेल आणि जनरल स्पायडेल यांची सहानुभूती होती, ही गोष्ट त्याने मान्य केली.

फील्ड मार्शल क्लजला बडतर्फ करून त्याच्या जागी हिटलरने फील्ड मार्शल मॉडेल याला अधिकारसूत्रे घेण्यास १७ ऑगस्टला जेव्हा पाठवले, तेव्हा जनरल स्पायडेलने उद्गार काढले--

" Fate does not spare the man whose convictions are not matched by his readiness to give them effect–"

[ ज्या माणसाची आपल्या स्वीकृत तत्त्वाप्रमाणे प्रत्यक्ष व्यवहार करण्याची तयारी नसते, त्यालाही दैव अखर सोडीत नाही. ]

१८ ऑगस्टला अवमानित फील्ड मार्शल क्लज बर्लिनला जाण्यासाठी मोटारने निघाला. त्याच दिवशी त्याने हिटलरला एक मोठे पत्र लिहिले होते. मोटार मेटझ् या गावाजवळ येताच त्याने विषप्राशन केले व मृत्यूला मिठी मारली. सेनानी क्लज आपल्या पत्रात लिहितो—

" जेव्हा तुम्हाला हे पत्र पोचेल, तेव्हा मी या जगात असणार नाही. आयुष्याला माझ्या दृष्टीने फारसा अर्थ आता उरलेला नाही. मी व रोमेल या दोघांना पुढचे भवितव्य स्पष्ट दिसत आहे; परंतु आमचे कुणी ऐकावयास तयार नाही—

" फील्ड मार्शल मॉडेल हा सर्व लष्करी क्षेत्रात कसलेला असूनही तो परिस्थिती काबूत आणू शकेल, याची मला खात्री वाटत नाही. जर मॉडेल हादेखील काही करू शकला नाही व आपली नवी अस्त्रेही निरुपयोगी ठरली, तर प्रिय फ्यूरर–लढाई संपविण्याचा विचार करावा. जर्मन जनतेने फार सोसले आहे व आता हे सर्व भयानक पर्व लवकर संपले पाहिजे.

" तुमचा मोठेपणा मी नेहमीच मानीत आलो आहे. दैव हे जसे तुमच्या इच्छाशक्तीपेक्षा व बुद्धिचातुर्यापेक्षा बलवत्तर आहे, तशीच भवितव्यताही बलवत्तर आहे ! तुम्ही या क्षणी मात्र पुरेसा मोठेपणा दाखवून हा निरर्थक लढा आता बंद करावा... कारण हेच आवश्यक आहे......"

[If fate is stronger than your will & your genius, so is Providence. Show yourself now great enough to put an end to a hopeless struggle when necessary.]

जनरल स्टुएपनागेल आंधळ्या अवस्थेत हॉस्पिटलात असताना त्याच्या बोलण्यातून रोमेलचा उल्लेख आला होताच. फील्ड मार्शल क्लजच्या पत्रात रोमेलचा उल्लेख होता व जनरल होफॅकेर याने छळाला कंटाळून सत्य सांगून टाकले—रोमेलने आश्वासन दिले होते—

"Tell the people in Berlin that they can count on me.–"

[ बर्लिनमधल्या लोकांना सांगा, की मी त्यांच्या पाठीशी आहे ] रोमेल असे म्हणाला, ही गोष्ट जनरल होफॅकेर याने कबूल केली.

रोमेलविरुद्धचा हा पुरावा हिटलरपुढे येताच त्याने निर्णय दिला, की रोमेलला मृत्युदंडाशिवाय अन्य दंड नाही. परंतु रोमेलला मृत्युदंड देणे, ही गोष्ट तितकीशी सोपी नव्हती. रोमेल जगविख्यात सेनानी होता, सैनिकांच्या गळ्यांतील ताईत होता आणि हिटलरच्या खालोखाल जर्मन प्रजाजनांचा तो लाडका झाला होता. अशा व्यक्तीला देहदंड देण्याने हिटलरविरुद्ध लोकमत कलुषित होण्याचाच संभव होता. न्यूरेन्बर्ग येथील खटल्यात कायटेलने हिटलरची ही अडचण स्पष्ट मांडलेली आहे. कायटेलने सांगितले—

"The Fuehrer realised that it would be a terrible scandal in Germany if this well known Field Marshal, the most popular General we had was to be arrested & hangd before the people's court."

यासाठी हिटलरने असा तोडगा काढला, की कायटेलने रोमेलविरुद्ध उपलब्ध असलेला पुरावा त्याला सांगावा व त्याला आत्महत्येची संधी द्यावी. जर त्याने आत्मघात पत्करला, तर संपूर्ण लष्करी इतमामाने त्याचा अंत्यविधी करण्यात येईल व त्याच्या कुटुंबियांना कसलाही उपसर्ग देण्यात येणार नाही.

रोमेल हा यावेळी जखमांतून बरा होत होता व आपल्या घरी होता. त्याच्या घराभोवती आता S. S. तुकड्यांचा पहारा ठेवण्यात आलेला होताच. १४ ऑक्टोबर, १९४२ ला कायटेलच्या आज्ञेप्रमाणे दोन लष्करी अधिकारी रोमेलच्या निवासस्थानात दाखल झाले. त्यांनी बरोबर रोमेलविरोधी पुरावा असलेली टाचणे आणली होती. शिवाय कायटेलच्या सूचनेनुसार विषाची कुपीही नेली होती.

या दोघा लष्करी अधिकाऱ्यांसह रोमेल एका खोलीत गेला. या अधिकाऱ्यांची नावे होती बर्गडॉर्फ व मेसेल– या पुढची हकीकत रोमेलचा मुलगा मॅनफ्रेड रोमेल याने न्यूरेनबर्ग खटल्यात निवेदन केली आहे. मॅनफ्रेडने सांगितले—

" यानंतर माझे वडील खोलीबाहेर येताना मी ऐकले व ते तडक आईच्या

खोलीत गेले. थोड्या वेळाने मला घेऊन ते माझ्या खोलीत आले व म्हणाले– ' आताच मी तुझ्या आईला ही गोष्ट सांगितली आहे, की पंधरा मिनिटांत माझी जीवनयात्रा संपणार आहे. हिटलरने माझ्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवला आहे. परंतु माझी आफ्रिकेतील कामगिरी लक्षात घेऊन मला विष खाऊन मरण्याची मुभा त्याने दिली आहे. आलेल्या दोघा जनरल्सनी विष बरोबर आणले आहे. तीन सेकंदांत त्याने प्राण जातो. मी ही गोष्ट पत्करली तर माझ्या कुटुंबियांना त्रास होणार नाही व सरकारी इतमामाने माझे अंत्यसंस्कार होणार आहेत. सर्व काही आखलेले आहे. आता पंधरा मिनिटांत तुम्हाला उरम् येथील रुग्णालयातून बोलावणे येईल व एका कॉन्फरन्सला जात असता मेंदूतील स्रवाने मी मेल्याचे तुम्हाला सांगण्यात येईल..."

—आणि खरोखरच ठरल्याप्रमाणे सर्व गोष्टी घडल्या !

रोमेलने अंगात आफ्रिका कॉर्प्सचे खास वैशिष्टय असलेले कातडी जाकीट घातले व फील्ड मार्शलचे बॅटन हातात घेऊन तो मोटारीत चढला. बरोबर दोघे जनरल्स होते. ड्रायव्हर हा एक S. S. गार्ड होता. मोटार सुमारे दोन मैलांवर आल्यावर, मोटार थांबवून जनरल मेसेल व S. S. गार्ड खाली उतरले. मोटार एका निर्जन जंगलाच्या बाहेर उभी होती. जनरल वर्गहाफ् व फील्ड मार्शल रोमेल दोघे मोटारीतच मागल्या जागेवर बसून राहिले.

जनरल मेसेस व S. S. गार्ड हे दोघे पाचसात मिनिटाने, लांबवर पायी चालत जाऊन परत फिरले, तो मोटारीखाली उतरून जनरल बर्गहॉफ शतपावली करीत होता व मोटारीतील मागील जागेवर रोमेलचा निष्प्राण देह एका अंगावर कलंड-लेला होता.

रोमेलचा निरोप घेतल्यापासून बरोबर पंधरा मिनिटांनी फ्राऊ रोमेलला रुग्णा-लयातून बोलावणे आले. मेंदूतील रक्तस्रावाने फील्ड मार्शल मेल्याचे निवेदन तिला केले गेले.

रोमेलचा मृत्यू जाहीर होताच पश्चिम आघाडीवरील नवा जर्मन सेनानी फील्ड मार्शल मॉडेल याने 'ऑर्डर ऑफ दि डे' काढली. त्यात म्हटले होते–

" Rommel, one of the greatest commander of our Nation, died, of wounds sustained on July 17."

[ आपल्या राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ सेनानींपैकी एक, फील्ड मार्शल रोमेल १७ जुलैच्या जखमांमुळे निधन पावले. ]

हिटलरने फ्राऊ रोमेलला सांत्वनपर संदेश धाडला व रोमेलचा अंत्यसंस्कार लष्करी इतमामाने व्हावा, असा आदेश दिला. स्वस्तिक निशाणात गुंडाळलेला रोमेलचा देह रणगाड्यावरून इतमामाने कबरस्तानाकडे नेण्यात आला. तेथे फ्यूररचा प्रतिनिधी म्हणून फील्ड मार्शल रूडन्स्टेंडने अखेरीची श्रद्धांजली अर्पण केली. रूडन्स्टेंडने सांगितले–



रोमेल... विद्ध गरूड

" His heart belonged to the Fuehrer–! "

[ याने आपले अंतःकरण फ्यूररला वाहिलेले होते. ]

फील्ड मार्शल रूडन्स्टेंडला खरोखरीच याची कल्पना नव्हती, की विषप्राशन करून हा रणयोद्धा मेलेला आहे. हिटलर-कायटेलने रोमेलला दिलेला देहदंड त्यावेळी रूडन्स्टेंडला माहीत नव्हता. तो असेच समजत होता, की रणांगणावरील अपघातांतील जखमांमुळे हा सेनानी निधन पावला आहे. न्यूरेनबर्ग खटल्यात साक्ष देताना फील्ड मार्शल रूडन्स्टेंडने स्पष्ट सांगितले–

" रोमेलच्या मरणासंबंधी प्रसृत झालेली हकीकत मला कळलेली नव्हती. ही गोष्ट मला माहीत असती तर फ्यूररचा प्रतिनिधी म्हणून अंत्यसंस्काराचे वेळी श्रद्धांजली वाहण्यास मी गेलो नसतो. ही गोष्ट माहीत असून, मी तिथे गेलो असतो तर ती एक लाजिरवाणी गोष्ट झाली असती–"

कटात सामील झालेल्यांची चौकशी करण्याचे काम मुख्यतः फील्ड मार्शल रूडन्स्टेंड व जनरल गुडेरिन यांनी केले. फ्यूररच्या तीन फील्ड मार्शलपैकी एकाला फासावर लटकावण्यात आले व दोघांनी आत्मघात करून घेतले. एके काळी हिट-

लरला धाकात ठेवणाऱ्या जर्मनीच्या लष्करी यंत्रणेची ही काय दारुण अवस्था आता झाली होती पाहा ! आश्चर्य असे, की या हत्याकांडातली फ्यूररवर निष्ठा व्यक्त करणाऱ्यांची मांदियाळीच उसळली. फ्यूरर जिवंत होता, तोपर्यंत त्याचे दोष कुणाला दिसत नव्हते; इतका त्याचा प्रभाव विलक्षण होता. जनरल गुडेरिनने २० जुलैनंतर हिटलर कसा झाला होता, याचे वर्णन केलेले आहे.

" What had been hardness became cruelty, while a tendency to bluff became plain dishonesty. He believed no one any more. He frequently lost all self control & his language became increasingly violent. In his intimate circle, he now found no restraining influence–"

[ त्याच्या ठिकाणी जे काठिण्य होते, त्याचे क्रौर्यात रूपांतर झालेले होते. काहीतरी सांगून वेळ मारून नेण्याच्या त्याच्या वृत्तीचे आता नागड्या अप्रामाणिकपणात रूपांतर झाले होते. त्याचा कुणावरही विश्वास उरला नव्हता. अनेकदा त्याचा स्वतःवरचा ताबा सुटू लागला होता व त्याची भाषा अधिकाधिक स्फोटक होऊ लागली होती. त्यांच्या खास अंतर्वर्तुळात त्याला आवर घालणारा असा कुणीच उरलेला नव्हता ]

कट फसला आणि आता अर्धवट डोळे फिरलेल्या, मनाने व शरीराने थकत चाललेल्या फ्यूररने एकदा १९४१ च्या हिवाळ्यात चमत्कार करून माघार घेणाऱ्या जर्मन सैन्यात नवा उत्साह ओतला. प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर फ्यूररने अशाही परिस्थितीत युद्ध जवळजवळ एक वर्ष अधिक चालू ठेवले. शिररने याविषयी म्हटले आहे, ते अत्यंत सार्थ आहे. तो लिहितो–

By a hypnotism that defies explanation Hitler held the allegiance & trust of this remarkable people to the last. It was inevitable that they would follow him blindly, like dumb cattle, but also with a touching faith & even an enthusiasm that raised them above the animal herd, over the precipice to the destruction of the nation–"

[ ज्या मंत्रमुग्धतेचे स्पष्टीकरण करता येत नाही, अशा प्रभावीपणाने अखेरपर्यंत हिटलरने या विलक्षण लोकांची आपल्यावरील निष्ठा व विश्वास अखेरपर्यंत ढळू दिला नाही. यामुळे आंधळेपणाने सर्वजण त्याच्या मागोमाग जाणार, त्यात आश्चर्य नव्हते. त्यांचे हे वागणे मुक्या बिचाऱ्या मेंढरांसारखेच होते. परंतु केवळ पशूंचा कळप तरी त्यांना कसे म्हणावयाचे ? त्यांची फ्यूररवरील हृदय हेलावून टाकणारी निष्ठा व त्यांचा उत्साह यांमुळे पशूच्या कळपापेक्षा हे वागणे उच्च दर्जाचे ठरते. पण सारे निघाले होते त्या कड्याच्या दिशेने, की ज्याच्यावरील झेप ही देशाचा नाश करणारी ठरणार होती ] ●

[ अपूर्ण ]

| | |
|---|---|
| लालमहाल | प्रतापगड |
| पन्हाळगड | राजगड |
| पुरंदर | आग्रा |
| लेखक<br>ब. मो. पुरंदरे<br>राजहंस | मूल्य<br>प्रत्येकी रुपये दोन<br>प्रकाशन, पुणे. |



# ‘ नाट्य–वाचन स्पर्धा ’

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक ॲसोसिएशनतर्फे घेतल्या जाणाऱ्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धाचे यंदाचे सातवे वर्ष होय. परंतु भाग घेणाऱ्या संघांची संख्या नेहमीपेक्षा कमी होती. केवळ नाट्यवाचनासाठी नाटकाचा वापर केला तरी नाटककारांनी संपूर्ण मोबदल्याची मागणी केल्याने काही महाविद्यालयांनी या धोरणाचे निषेधार्थ यंदाचे स्पर्धात भाग घेतला नाही.

स्पर्धेची सुरवात बृहन्–महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी केली. त्यांनी वि. वा. शिरवाडकरांच्या ‘ वैजयंती ’ या नाटकाचे वाचन केले. वाचनाचा दर्जा अतिशय सामान्य होता, परंतु त्यातल्या त्यांत वैजयंती ( कु. भारती साठे ) व जयपाल यांचे वाचन बरे झाले. शाहू महाविद्यालयाने मैदानातून आयत्या वेळी पळ काढल्याने दुसऱ्या नाटकाचे वाचन होऊ शकले नाही.

अभिनव कला मंदिराच्या दोन वेगळ्या संघांनी दोन वेगळ्या नाटकांचे वाचन दुसऱ्या दिवशी केले. पहिल्या संघाने ' भाग्यवान ' हे नाटक वाचले. शिदबा आणि संभा ह्या दोन वेगळ्या भूमिका श्री. नरेंद्र डेंगळे ह्यांनी उत्तम प्रकारे वाचल्या. त्याचप्रमाणे कु. ज्योती वैद्य त्यांनी मोठ्या अक्का ( सरस्वती ) पेक्षा छोटी लता बरोबर नजरेसमोर उभी केली. ह्या संघाने वाचनावर बरीच मेहनत घेतलेली दिसली. ह्याच महाविद्यालयाचा दुसरा संघ तर पहिल्या संघापेक्षा प्रभावी ठरला. " मी जिंकलो, मी हरलो " ह्या नाटकाचे वाचन या संघाने केले. श्री. अशोक जोशी यांनी ' माधव ' च्या भूमिकेचे वाचन अत्यंत यशस्वीपणे केले. भूमिकेचा त्यांनी अभ्यास केलेला दिसलाच, परंतु भरपूर मेहनतही घेतलेली दिसली. सर्वोत्कृष्ट वैयक्तिक वाचन केल्याबद्दल श्री. जोशी हे तर अभिनंदनास पात्र आहेतच, परंतु पहिल्याच सलामीत दोन नाटके उत्कृष्ट रीतीने वाचून दाखवल्याबद्दल अभिनव कला मंदिर या संस्थेचेही मनःपूर्वक अभिनंदन.

स. प. महाविद्यालयाच्याही दोन संघांनी स्पर्धेमध्ये भाग घेतला. पहिल्या संघाने अनंत काणेकरांच्या ' फास ' ह्या नाटकाचे वाचन केले. अमृत ( दत्तात्रय जापीकर ) व मीरा (कु. शोभना मांडके) या दोन्ही कलावंतांनी भूमिका समजून वाचल्या. वेळेच्या मर्यादेत बसवण्याचे दृष्टीने नाटकाचे जे संकलन करण्यात आले, ते उत्तम वाटले. स. प. महाविद्यालयाच्या दुसऱ्या संघाने शिरवाडकरांचे 'वैजयंती' हे नाटक वाचले. पात्रयोजना सुयोग्य होती. वाचनातून संबंधित व्यक्तीचे वय दाखवणे आवश्यक असते, त्याची जाणीव विश्वपालची भूमिका वाचणाऱ्या श्री. हर्डीकरांना होती. श्री. धनजंय गोळे यांचा जयपालही प्रभावी होता. नाट्य-वाचनासंबंधीचे निश्चित मार्गदर्शन संघाला दिग्दर्शकाकडून झाल्याचे जाणवत होते. म्हणूनच नाट्य-वाचनाचा यथोचित परिणाम गाठण्यात हा संघ यशस्वी ठरला.

### फर्ग्युसन व टिळक शिक्षण कॉलेज सर्वोत्कृष्ट

फर्ग्युसन महाविद्यालयाने शं. ना. नवरे ह्यांच्या ' जनावर ' ह्या एकांकिकेचे वाचन यशस्वीपणे केला, हे मान्य करूनही 'जनावर' वाचण्यासाठी निवडण्यात त्यांनी चूकच केली असे वाटते. कारण कित्येक वेळा नको तेथे हशा पिकून प्रसंगाचे गांभीर्यच नष्ट झाले. मात्र त्याचबरोबर केवळ वाचनाच्या आधारे श्री. सुभाष जोशी यांनी ज्या पद्धतीने ' पहिला इसम ' जिवंत केला, ती नावीन्यपूर्ण होती. श्री. दिलीप कोल्हटकरांनी त्यांना चांगल्या प्रकारे साथ दिली.

टिळक शिक्षण महाविद्यालयाने श्री. गो. गं. पारखी यांचे ' अक्षांश रेखांश ' हे नाटक वाचले—नव्हे, तर प्रत्यक्ष जिवंतपणे उभे केले. केवळ वाचनातून पात्रे डोळ्यांसमोर उभी करण्यात केवळ हाच संघ यशस्वी झाला. सर्वच विद्यार्थ्यांचे वाचन चांगले झाले. अभिनयाचा आधार नसताना केवळ शब्दांच्या आधारे लेखकाचे मनोगत श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याची श्री. बन्या साठे (मामा) व श्री. शशिकांत

मालवणकर (विकास व गावडे) यांची हातोटी उत्कृष्ट वाटली. केवळ आवाजात बदल करून दोन वेगळ्या व्यक्ती उभ्या करण्यात श्री. साठे कमालीचे यशस्वी ठरले.

श्री. ना. दा. ठाकरसी शिक्षण महाविद्यालयाने रांगणेकरांचे ' कुलवधू ' वाचले. स्त्रीपात्रांच्या तोंडातून पुरुष-पात्रांचे संवाद ऐकणे मोठे विचित्र वाटले. त्यामुळे विद्यार्थिनींनी प्रयत्न करूनही वाचनाचा प्रभावच पडू शकला नाही. बनी व पार्वती-बाई या भूमिका कु. ज्ञानदेवी कुलकर्णी यांनी चांगल्या वाचल्या.

नौरोसजी वाडिया महाविद्यालयाने श्री. न. गो. सुरू यांनी लिहिलेल्या ' दीप मालवू नको रे ' ह्या नाटकाचे वाचन-जणू काही नाटक कसे वाचू नये- ह्याचा नमुना दाखवण्यासाठीच करून दाखवले. सर्वच पात्रांना वाचनाची घाई झालेली दिसली. पहिल्याचे वाचन संपते कधी व मी वाचतो कधी, याचीच चढाओढ चालल्याचे दिसत होते. श्री. शरद डोरले हे तर धडा वाचल्याप्रमाणे संवाद वाचत-आपण जे वाचतोय ते समोर कोणी ऐकतोय याची जाणीव कोणत्याही पात्राला नव्हती.

## आकाशवाणीने लक्ष द्यावे

या नाटच-वाचन स्पर्धेमध्ये-(१) श्री. शंकरराव खोले, (२) श्री. सुभाष जोशी, (३) श्री. अशोक जोशी, (४) श्री. बन्या साठे या कलावंतांनी प्रथम दर्जाचे वाचन केले. या व अन्य काही कलाकारांकडे आकाशवाणीने जरूर लक्ष द्यावे. म्हणजे आकाशवाणीच्या नभोनाटयांतून तेच तेच कंटाळवाण आवाज ऐकणाऱ्या श्रोत्यांना या ताज्या दमाच्या गुणी कलावंतांचा परिचय होईल.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. अनंत ओक, श्री. गोपीनाथ टिपणीस व सौ. सरिता पत्की यांनी काम पाहिले. बक्षीस-समारंभाचे वेळी कित्येक विजयी संघां-तील कलावंत उपस्थित नव्हते, ही गोष्ट खटकल्याखेरीज राहिली नाही. स्पर्धेमध्ये भाग घेणारे कलावंत बक्षीस स्वीकारण्याचे बाबतीत इतके उदासीन का, ते समजू शकले नाही. तसेच स्पर्धेमध्ये एम्. ई. एस्. महाविद्यालय-इंजिनीयरिंग महाविद्या-लय, गेल्या वर्षीचे विजेते व टिळक आयुर्वेद महाविद्यालय यांची उणीव जाणवली.

परीक्षकांतर्फे बोलताना श्री. ओक यांनी नाटच-वाचनासाठी नाटक निवडण्या-बाबत ज्या मौलिक सूचना केल्या, त्यांचा पुढील वर्षी विद्यार्थ्यांनी जरूर विचार करावा.

या वर्षी प्रसिद्ध गायक श्री. विनायकबुवा पटवर्धन यांनी नटश्रेष्ठ गणपतराव बोडस यांचे नावाने एक फिरती ढाल ठेवण्यासाठी देणगी दिली.

नाटच-वाचनातील दिग्दर्शकाचे महत्त्व लक्षात घेऊन ही ढाल उत्कृष्ट दिग्दर्श-कास देण्यात यावी, असे सुचवावेसे वाटते.

शरद गोखले

□

# आमचं नाव बाबूराव

## शिरवाडकरांचे नवे यश

**सुधीर दामले**

गाजलेल्या लेखकांनी आपली नेहमीची लेखनपद्धती सोडून काहीतरी वेगळे सादर करण्याचा प्रयत्न केला तर त्या-वाङमयकृतीबद्दल अपेक्षा बाळगल्या जातात, हे जरी अगदी खरे असले तरी त्या कृतीबद्दल अभिनंदन करण्याची वेळ मात्र फारच क्वचित येते. " आमचं नाव बाबूराव " ही नाटयकृती पाहिल्यावर शिरवाडकरांचे मात्र आवर्जून अभिनंदन केले पाहिजे. उदात्त व्यक्तिरेखांचे प्रभावी चित्रण करणारी त्यांची आजवरील नाटके आणि हे पहिलेच विनोदी–थोडेफार फार्सिकल नाटक ! यात विषयाच्या दृष्टीने एकदम नावीन्य आहे. मराठी नाटय-वाङमयात एका चांगल्या विनोदी, चुरचुरीत नाटकाची भर पडली आहे, हे मुद्दाम स्पष्ट केले पाहिजे.

**कथा**

स्पंदमानारविंद नावाचा एक नामधारी राजा मंत्रिमंडळाच्या वर्चस्वामुळे इतका काही वैतागलेला असतो, की त्याला मंत्र्यांच्या परवानगीवाचून स्वत:ची दाढीही काढता येत नाही. त्याच्या प्रेयसीबरोबर विवाहही करता येत नाही. सारे व्यवहार, सारे विचार मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार, त्यांच्या संमतीने व्हायचे ! याच अन्यायाला चिडून जाऊन राजेसाहेब एक दिवस राजवाड्यातून पोबारा करतात आणि दाढी काढण्यासाठी येऊन हजर होतात ते बाबूराव न्हाव्याच्या दुकानात ! दाढी काढली जाते आणि त्यांना कळून येते, की त्यांच्यात आणि बाबूराव यांच्यामध्ये कमालीचे साम्य आहे. इतके की बाबूरावांची पत्नी राजेसाहेबांनाच बाबूराव समजते तर राजेसाहेबांची प्रेयसी बाबूरावांना राजेसाहेब समजते. यामध्ये कहर होतो, तो पुढे खुद्द महामंत्री बाबूरावांनाच राजेसाहेब समजून पुन्हा परत राजवाड्यात चलण्याविषयी विनवू लागतात आणि घेऊनही जातात. तेव्हा थोडया काळाकरता का होईना, आपली सुटका झाली म्हणून खरे राजेसाहेब सुस्कारा सोडतात, तर नकली राजेपण आले म्हणून बाबूराव भांबावून जातात. परंतु या संकटातून 'आपण तुमची अगदी थोडयाच वेळात सुटका करू.' असे आश्वासन राजेसाहेबांकडून मिळाल्याने

बाबूराव राजवाड्यात प्रवेश करतात. अर्थात हजरजबाबीपणा, प्रचलित गोष्टींविषयी भरपूर माहिती आणि उपजत हुशारी या योगाने एका दिवसाची जबाबदारी बाबूराव मोठ्या नीटसपणे पार पाडतात. पण एवढेच करून ते स्वस्थ बसत नाहीत, तर राजवाड्यातील लोकांना अनपेक्षित धक्के देतात. राजेसाहेबांवर खरोखर किती जाचक बंधने होती, याची जाणीव करून देतात आणि ठरल्याप्रमाणे राजे स्पंदमानारविंद तिथे हजर होताच सुटकेचा निश्वास टाकून राजवाड्याचा निरोप घेतात.

## हुकूमशहा मंत्री

वरवर अशा साध्याच विनोदी कथानकाद्वारे हुकूमशाही राज्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता यांतील संघर्ष, एकमेकांविषयी त्यांच्या मनात असणाऱ्या कल्पना या गोष्टींना यातून अगदी भरपूर वाव मिळाल्याने सर्वसामान्यांनाही हे नाटक अगदी एकदम आकर्षक वाटते. लोकसत्तेच्या नावाखाली राज्यकर्ते कसे हुकूमशाहीने वागत असतात, त्यामुळे जनसामान्यांची कशी गळचेपी होत असते, राजकारणाचा ते कसा धंदा बनवितात, या गोष्टी या नाटकामधून फारच प्रभावीपणे व्यक्त केल्या आहेत. सर्वसामान्य जनतेचे प्रतीक असलेले बाबूराव आणि हुकूमशाहीचे प्रतीक महामंत्री यांची होणारी खडाजंगी-जुगलबंदी वेधक ठरली आहे. सत्तालोलुप मंत्रिमंडळाला बाबूराव जेव्हा केव्हा चपराक लगावतात, तेव्हा फुटाणे फुलावे तसे नाटक फुलू लागते ! एकंदरीत राज्यकर्ते, राजकारण यांविषयी सर्वसामान्य जनतेला जे काही वाटत असते, त्यांच्याविषयी त्यांचे जे काय मत आहे, त्याला या नाटकातून स्थान मिळाल्याने नाटक वेधक ठरते.

## काही दोष

शिरवाडकरांनी निवडलेला हा विषय, खुसखुशीत, वेधक, संवादाद्वारे आकर्षकतेने मांडण्याची त्यांची पद्धती हे या नाटकातील सर्वात मोठे विशेष असले तरी सहजासहजी उठून दिसणारे असे दोन-तीन दोषही या नाटकात आहेत आणि त्यामुळेच यातील यशाला काहीसा उणेपणा येतो. नाटकातील सर्वात मोठी उणीव हीच की, पहिला अंक जितक्या सफाईने, नेटक्या पद्धतीने, आकर्षकतेने लिहिला गेला आहे, तितक्याच तोलाने दुसरे दोनही अंक चढत जात नाहीत. काहीसे उणे पडतात. तसे पाहू जाता अलीकडील प्रत्येक नव्या नाटकाची अवस्था ही अशीच असते. तरीदेखील हा दोष शिरवाडकरांच्या लेखनातून दिसून यावा, ही गोष्ट विशेषत्वाने जाणवली. दुसरी गोष्ट म्हणजे शिरवाडकरातील नाटककाराऐवजी त्यांच्यातील कवीच काही वेळा अधिक प्रभावीपणे दिसू लागतो. संवादाऐवजी काव्यच उतरू लागते. वरवर पाहता काव्यमय संवाद हा गुण ठरावा, पण या अशा नाटकात जिथे खटकेबाज, चटकदार, चुरचुरीत संवादच आवश्यक असतात, तिथे मात्र हा दोष ठरतो, यामुळे या विषयाकडे प्रेक्षक अधिक आकर्षित होण्याऐवजी त्यांची पकड ढिलीच होत जाते. दुसऱ्या अंकात तर असे काव्यात्म लेखन वारंवार दिसून येते. तिसरा दोष म्हणजे



महामंत्री आणि बाबूराव घाणेकर !

कित्येकवेळा चर्चा अकारण लांबविण्याच्या मोहालाही नाटककार बळी पडले आहेत. यामुळेही रसभंग होतो. निष्कारण लांबणारी तीच तीच चर्चा आवरली गेली असती तर? तिसऱ्या अंकातील मंत्रिमंडळाच्या बैठकीचा प्रवेश हा असाच अवास्तव लांबला, म्हणूनच कंटाळवाणा ठरला आहे.

## शंकर ! छे:, बाबूराव घाणेकर

नाटकाच्या यशात भर पडते ती कलाकाराच्या अभिनयाने ! विशेष करून शंकर घाणेकर यांच्या कामामुळे ! ! घाणेकरांचे थोडेदेखील काम असेल तर आधीच प्रेक्षक निहायत खूष असतात आणि इथे तर काय त्यांना प्रमुख भूमिका मिळालेली ! तेव्हा नाटकावर प्रेक्षकांच्या उड्या न पडल्या तरच नवल ! घाणेकरांच्या लोकप्रियतेत जणू मानाचा तुरा खोवला गेला आहे, असेच म्हणायला हरकत नाही. आणि महत्त्वाची गोष्ट हीच की हे आव्हान घाणेकरांनी मोठ्या उत्साहाने

स्वीकारले. साहजिकच त्यांच्या आजवरील कोणत्याही कामापेक्षा हे काम सर्वोत्कृष्ट होते असे म्हटले तरीही काहीच चुकणार नाही. त्यांना जेवढी संधी मिळाली, त्यातील बारकावान् बारकावा त्यांनी मोठ्या प्रामाणिकपणे, कसोशीने आणि अभ्यासपूर्णतेने व्यक्त केला आहे. पहिल्या अंकातील बाबूराव म्हाव्याच्या बारीक-सारीक हालचाली त्यांनी अचूकपणे व्यक्त केल्याच, पण पुढील दोन अंकात राजेपण आले असताना त्याला शोभेसा रुबाबही प्रभावीपणे व्यक्त केला. राजकारणाविषयी, राज्यकर्त्यांविषयी, सामान्य जनतेला काय वाटते, हे एखाद्या विरोधी पक्ष–पुढाऱ्याच्या आवेशाने प्रभावीपणे व्यक्त करताना त्यांनी तोल तर सोडला नाहीच, पण काही लहान लहान गंभीर प्रसंगही मोठ्या आत्मियतेने व्यक्त करून आपण केवळ विनोदी नटच नाही, तर गंभीर प्रसंगही तितक्याच समर्थपणे करू शकतो, हेच जणू पटवून दिले. चमकार संवाद, योग्य प्रसंग त्यांच्या वाट्याला आले तर ते त्यात स्वत:च्या अभिनयगुणाची भर घालून तो प्रसंग किती अविस्मरणीय करू शकतात, ही गोष्ट केवळ एकाच प्रसंगाने फारच उत्कृष्टपणे दिसून येईल. पहिल्या अंकात राजेसाहेब बाबूरावांना संसारी माणसाच्या अवस्थेविषयी सांगत असतात–" जोपर्यंत लग्न होत नाही, तोपर्यंत प्रत्येक मनुष्य पिंजऱ्याबाहेरूनच आतील थालीपिठाचा तुकडा अभिलाषेने पाहणाऱ्या उदराप्रमाणे असतो, पण एकदा का त्याने लग्न केले, की तो सापळ्यात अडकलेल्या आणि ज्याने थालीपीठ खाऊन संपविले आहे आणि ज्याचा बाहेर जाण्याचा मार्ग एकदम बंद झाला आहे, अशा असहाय्य उंदराप्रमाणे बनतो. " असे उद्गार काढून बाबूरावांना हे बरोबर आहे किंवा नाही असे विचारू लागतात, त्यावेळी बाबूराव उत्तरतात, " महाराज, या बाबतीत माझे मत तितकेसे योग्य ठरणार नाही. कारण माझे थालीपीठ अजून खाऊन संपायचे आहे. " त्या प्रसंगाला हे वाक्य विनोदी तर ठरतेच, पण घाणेकर आपल्या अभिनयाने ते वाक्य असे काही अविस्मरणीय करतात की सारे प्रेक्षागृह हास्याच्या धबधब्याने उसळून निघते. हा प्रसंग विसरू म्हटले तरी विसरला जाणे केवळ अशक्य ! घाणेकरांनी आपल्या अभिनयाने अविस्मरणीय केलेले असे दुसरेही कितीतरी प्रसंग सांगता येतील. साहजिकच त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. खरोखर ही भूमिका त्यांच्यावाचून दुसऱ्या कुणी इतक्या यथायोग्यपणे केली असती असे वाटत नाही. घाणेकरांचे यश आहे ते यातच !

**खटकणारा खलनायक**

घाणेकरांप्रमाणेच महामंत्र्याची दमदार भूमिका मामा पेंडशांसारख्या पहिल्या दर्जाच्या मातबर कलावंताच्या वाट्याला आली आहे आणि म्हणूनच ती लक्षात राहणारी ठरली आहे. वाणीवर जबरदस्त हुकमत असण्याखेरीज अन्य कुणी ती भूमिका करू म्हटले तर त्याचे तीन–तेरा वाजल्याखेरीज राहिले नसते. दुसरा अंक महामंत्र्याच्या संवादावरच केवळ अवलंबून आहे, तो केवळ मामामुळेच लक्षात असतो.

इतकेही असले तरी त्यांच्या कामातील एक गोष्ट मात्र खटकली. मामांनी महामंत्र्याची भूमिका खलनायकी पद्धतीने उभी केली. वास्तविक पाहता हा महामंत्री खलनायक मुळीच नाही. तो अहंकारी आहे. स्वतःच्या कर्तबगारीवर त्याचा प्रचंड विश्वास आहे. काही थोडाफार मिस्किल आणि राजेसाहेबांवर मनापासून प्रेम करणारा, त्यांचा एक हितचिंतक आहे, ही गोष्ट मामांनी लक्षात घेतली नाहीसे दिसते. कारण त्यांनी प्रथम प्रवेश केला तोच मुळी खलनायकी रुबाबात.

महामंत्री, बाबूराव यांच्याप्रमाणेच नाटकातील तिसरी महत्त्वाची भूमिका बाबूरावांच्या पत्नीची ! हे काम चित्राने या दोघा कलाकारांप्रमाणेच लक्षात राहावे इतके सुंदर केले. भोळा–भाबडा भाव, काहीसा खेळकरपणा त्यांनी मोठ्या मेहनतीने आणि सुजाणपणे उभा केला.

अन्य कलाकारांत भाऊ बिवलकर, राजा कुलकर्णी, राजा मयेकर आदी कलावंतांनीही आपल्या लहानलहान भूमिका का होईना, व्यवस्थित नेटक्या तऱ्हेने पार पाडल्या.'

नाटकाचे यश डोळ्यांत भरण्यास लेखक आणि कलाकार यांचे श्रम कारण तर खरेच, पण दिग्दर्शक बाळ कुरतडकर आणि नेपथ्यकार पांडुरंग कोठारे यांचाही वाटा विसरता येत नाही. कोणत्याही प्रसंगाला अवास्तव महत्त्व न देता, कलाकारांना आचरटपणा करण्याची संधी असूनही त्यांच्यावर योग्य ते नियंत्रण ठेवून, बारीकसारीक गोष्टीतून कौशल्य व्यक्त करण्यातील कुरतडकरांची हातोटी अभिनंदनीय वाटते. पांडुरंग कोठारे यांनी राजवाड्याचे सेटिंग नावीन्यतेने सादर केले. केनसेट ही रंगभूमीवरील देणगीच समजली पाहिजे. त्यांच्या कल्पकतेचेही अभिनंदन केले पाहिजे.

अशी एकापेक्षा एक संपन्न वैशिष्ट्ये एकत्रित सामावल्यामुळे नाटक पाहत असताना तरी प्रेक्षक मनमोकळा हसत असतो, आनंदी राहतो. ● ● ●


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

क्रीडा

# भारतीय क्रिकेटमधील आणीबाणी

वेस्ट इंडीज संघाचा भारत–दौरा रद्द झाला. हा आतबट्ट्याचा व्यवहार झालाच नाही, हे ठीक झाले. ही आयूबखानची कृपा म्हणावी तर तसे मात्र नाही. कारण पाकिस्तानशी सुरू झालेले युद्ध फार काळ आपण चालवणार नाही, याची भारत क्रिकेट नियंत्रण मंडळाला एवढी खात्री होती की, 'या हो या. ही पाहा येथे शांतता आहे,' असा घोषा या संस्थेच्या चालकांनी धरला होता. परंतु वेस्ट इंडीज क्रिकेट नियंत्रक मंडळालाच लाज वाटली व त्यांनी 'येत नाही' असे कळवले.

आता ताश्कंद आटोपले, की पुन: त्याच्या दौऱ्याचे ताशेरे वाजू लागतील. तेव्हा 'ते लवकरच येतील,' यात मुळीच शंका नाही. परंतु ते येताना नरी कॉन्ट्रॅक्टरचे डोके फोडणाऱ्या चार्ली ग्रिफिथला आणणार नाहीत, याची काळजी तरी आपल्या नियंत्रक मंडळाने घेतली आहे काय? वस्तुत: नरी कॉन्ट्रॅक्टर हा अपघाताने काही दिवस क्रिकेटक्षेत्रातून निवृत्त झाल्यावर आग्रहाने निदान एक हंगाम भारताचे नेतृत्व त्यांचेकडे द्यावयास हवे होते. परंतु पतौडीच्या नवाबाचे घोडे पुढे हाकणाऱ्यांना कदाचित चार्ली ग्रिफिथ हा त्यावेळी उपकारकर्ताच वाटला असेल.

या ग्रिफिथविरुद्ध इंग्लंडमधून टेड डेक्स्टर व बॅरिंग्टन आणि ऑस्ट्रेलियाहून रिची बेनॉ, ओनील यांनी जाहीर आक्षेपपत्रे दाखल केली आहेत की, "ग्रिफिथला कसोटी सामन्यांत खेळू देऊ नका, तो चेंडू फेकतो." पण याची दखल घेऊन आपल्या क्रिकेट नियंत्रक मंडळाने ग्रिफिथला आणू नका, असा सक्त इशारा वेस्ट इंडीज बोर्डाला दिला आहे काय? असे केल्याचे ऐकिवात नाही. उलट जो संघ भारतात दौऱ्यावर येणार म्हणून पुन:पुन: वृत्तपत्रातून जाहीर होत होते, त्यात चार्ली ग्रिफिथ सर्व वेळा होता. डेक्स्टरने जाहीर केले आहे– "English series with the West Indies was made meaningless by Griffith's bowling." इंग्लंड–वेस्ट इंडीज कसोटी मालिका ही ग्रिफिथने अर्थशून्य करून टाकली, असे इंग्लंडचा कर्णधार सांगत आहे; परंतु आपल्या लाचार क्रिकेट नियंत्रक मंडळाने याची दखल का घेतली नाही? आपले शून्य तर फारच मोठे राहणार आहे, कारण दौऱ्याचा आर्थिक व्यवहार आतबट्ट्याचा म्हणून अक्षरश: ही मालिका अर्थशून्य व ग्रिफिथ येणार असल्यामुळे

लाक्षणिक दृष्टयाही अर्थशून्य ! जर वेस्ट इंडीज संघ आणीबाणी खुंटीला टांगून येणार असेल, तर ग्रिफिथला येऊ देऊ नका, असा आग्रह भारताने धरला पाहिजे.

**पतौडीचे लाड**

भारत क्रिकेट नियंत्रक बोर्डाने आणखी एका गोष्टीकडे कानाडोळा केला आहे. भारत–पाक संघर्ष सुरू झाला त्या सुमारास, म्हणजे सप्टेंबरमध्ये इंग्लंडमध्ये इंग्लिश संघ विरुद्ध शेष जगत असा जो सामना आयोजित केला होता, त्यात शेष जगत पाकिस्तानतर्फे दोन खेळाडू अंतर्भूत केले होते व भारताचा एकही नव्हता. परंतु कुठून किल्ल्या फिरल्या. या सामन्यापूर्वी आठवडाभर पतौडीचे नवाब इंग्लंडमध्ये जाऊन राहिले. (म्हणजे जायचा-यायचा खर्चही देण्याचा प्रश्न नाही.) आयत्या वेळी ऑस्ट्रेलियाचा सिम्प्सनही येऊ शकला नाही. पतौडीची वर्णी लावण्यात आली. प्रश्न असा आहे, की भारततर्फे शेष जगत संघात आपला पतौडी हा एकटाच लायक आहे काय? नाडकर्णी, सरदेसाई, बोर्डे यांचा अधिकार जास्त आहे, परंतु असो. पतौडी एकदाचे शेषसंघात शिरले. या संघातच पाकिस्तानचे दोन खेळाडू खेळत असताना या सामन्यात पतौडीने का भाग घ्यावा, असा आमचा मुख्य प्रश्न आहे यावेळी लाहोर व सियालकोट भागांत रणकंदन चालले होते. पाकिस्तानचा नुसता रेडिओ ऐकला तर धरपकड केली जात होती. पाकिस्तानचा रेडिओ ऐकणे यापेक्षा पाकिस्तानी माणसाबरोबर खेळणे हे कमी देशद्रोही आहे का ? की पतौडीच्या नवाबांना भारत संरक्षण कायद्यात मुभा आहे ? एकीकडे जवानांची तोंड फाटेपर्यंत स्तुती करीत, लुंग्यासुंग्या मंत्र्यांनी भारतभर भाषणे करावीत आणि याचवेळी भारताच्या कर्णधाराने पाकिस्तानी खेळाडूंबरोबर लंडनमध्ये सामने खेळावेत, हे चित्र कसे काय दिसते, याचा सुज्ञांनी विचार करावा. या गुन्ह्याकरता पतौडीचे क्रिकेटमधील कर्तृत्व मान्य असूनही त्याची कर्णधारपदावरून तावडतोब हकालपट्टी करावी किंवा क्रिकेट नियंत्रक मंडळाच्या सल्ल्याने, नवाबाने ही गोष्ट केली असेल, तर भारत सरकारने या मंडळाच्या अधिकाऱ्यांना लाथा घालाव्यात.

भारत–पाक संघर्षामुळे वेस्ट इंडीज दौरा रद्द झाला म्हणजे काही भारतातील क्रिकेटवर प्रेतकळा येण्याची गरज नव्हती. दुलीप ट्रॉफी, रणजी करंडकाचे महत्त्वाचे सामने, विश्वविद्यालयीन सामने, शालेय सामने असे अनेक सामने गेल्या दोनतीन महिन्यांत ठिकठिकाणी खेळले गेले व ते अत्यंत चुरशीचे झाले. या सामन्यांसाठी रेडिओवरून धावते वर्णन ठेवले असते, तर काही बिघडले असते काय ? लोकांना या सामन्यांत रस आहे. जो आहे त्याला खतपाणी घालणे, हे सरकारचे काम आहे. रेडिओवरील धावती वर्णने ही या सामन्यांची लोकप्रियता वाढवण्यास कारणीभूत होतात. यामुळे सामन्यांकडे लक्ष वेधले जाते व सामना पाहणाऱ्या प्रेक्षकांची संख्याही वाढते. वर्षानुवर्षे या सामन्यांची वर्णने द्या, असा आग्रह धरूनही आपले नभोवाणी कार्यालय या बाबतीत काहीही करत नाही. पुढाऱ्यांची व मंत्र्यांची नभोवाणीवरील भाषणे

ही रात्री असल्यामुळे त्यांची गैरसोय या धावत्या वर्णनांनी होणार नाही, हे स्पष्ट असूनही याबाबतीत नभोवाणी–खाते उदासीन का ?

या बाबतीत नभोवाणीवरील धावती वर्णने सांगणारे लोकप्रिय निवेदक श्री. देवराज पुरी यांनी म्हटले आहे,

" There should be regular commentaries on every Ranji Trophy, Duleep Trophy and other first class matches. The popularity of test cricket today is largly due to commentaries. There is no reason why we cannot make our competitive matches as popular as tests. "

## विझी : मजेदार ! आठवण

निवेदकांवरून आठवण झाली. नभोवाणीवरील सुप्रसिद्ध निवेदक विजयनगरचे महाराज विझी हे गेल्या महिन्यात हृदयविकाराने कालवश झाले. १९४८ पासून ते रेडिओवरून सामन्यांची धावती वर्णने करीत असत. १९४६ साली इंग्लंडला त्यांनी नेलेल्या भारतीय संघाचे नेतृत्व त्यांचेकडे होते. अमरनाथ–शिस्तभंग प्रकरणा-मुळे हा दौरा त्यांनी गाजविला होता. १९५८ साली सरकारने त्यांना पद्मविभूषण केले. मृत्यूपूर्वी लिहिलेल्या एका लेखात त्यांनी एक मजेदार घटना नमूद केली आहे–

" मी पुष्कळ वेळा रेडिओवरून सहज जे बोलतो, त्याचा विपर्यास केला जातो. जाने. १९५९ मधील गोष्ट आहे. भारत–वेस्ट इंडीज कसोटी सामना कलकत्ता येथे सुरू होता. हॉलचा पाचवा चेंडू 'नो बॉल' देण्यात आला. तेव्हा मी म्हणालो, " That was the fifth ball which has been no balled. That means Hall has now two balls. " कॉमेंटेटर्स बॉक्सखाली बसलेले काही प्रेक्षक–श्रोते यावर मोठ्याने फिदिफिदी हसले. "

एकंदरीत विझीचे व श्रोत्याचे फारसे सूत कधीच जमले नाही. मात्र विझीच्या निधनाने क्रिकेटवर तन-मन-धनाने निर्भेळ प्रेम करणारा एक रसिक गेला यात शंका नाही.

● ● ●



## □ पेंकोव्हस्कीची हेरगिरी

मॉस्कोतील एका रस्त्याच्या विजेच्या खांबावर काळी खूण केलेली होती. एखाद्या मुलाने जाता-येता सहज गंमत म्हणून ओढलेली ही रेघ नव्हती, तर त्यामागे मोठे रहस्य होते. " नं. ५–६ पुश्किन स्ट्रीटवरील प्रवेशद्वाराच्या रेडिएटरचे मागच्या बाजूस भिंत व रेडिएटरचे दरम्यान तीन इंचांची फट आहे. तेथे एका काडीपेटीत संदेश ठेवला आहे. तो घेऊन जा, " इतका अर्थ त्या खुणेत होता.

पाश्चात्त्य राष्ट्रांसाठी हेरगिरी करणारा मॉस्कोतील या शतकातला सर्वात मोठा हेर ओलेग पेंकोव्हस्की अशा अनेक गुप्त जागांचा संदेश पाठविण्यासाठी उपयोग करी. दोन वर्षांपूर्वी तो पकडला जाऊन त्याला रशियात देहांताची शिक्षा झाली. त्याने लिहिलेली गुप्त रोजनिशी रशियातील त्याच्या एका साथीदाराने गुप्त मार्गाने पाश्चात्त्य राष्ट्रांकडे पाठविली. ती नुकतीच ' पेंकोव्हस्की पेपर्स ' या नावाने प्रसिद्ध झाली आहे.

पेंकोव्हस्कीने एप्रिल, १९६१ ते ऑगस्ट, १९६२ या काळात ही हेरगिरी केली. याच काळात बर्लिन-नाकेबंदी झाली आणि क्यूबास दूरगामी अस्त्रे पाठविण्यास रशियाने सुरवात केली. दूरगामी अस्त्रांसंबंधी महत्त्वाची लष्करी गुपिते पेंकोव्हस्कीने पाश्चात्त्य राष्ट्रांना पुरविली. रॉकेट-निर्मितीच्या कार्यक्रमाबद्दल क्रुश्चोव्ह आणि लष्करी अधिकाऱ्यांत मतभेद होते. दूरगामी अस्त्रांच्या प्रयोगांबाबत क्रुश्चोव्ह घाई करी व एखादे अस्त्र अजून चाचणीच्या व प्रयोगाच्या अवस्थेत असतानाच ते तयार झाले, असे जाहीर करून टाकी. अणुशक्तीवर चालणारे दूरगामी अस्त्र तयार करण्याच्या सूचना दिल्या होत्या आणि १९६० मधील रशियन क्रांतिदिनी क्रुश्चोव्हला ही भेट द्यावयाची असा प्रयत्न होता. या अस्त्राच्या चाचणीच्या वेळी दूरगामी अस्त्र-दलाचा प्रमुख मार्शल नेडेलिन व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. प्रयोग फसला आणि त्यावेळी झालेल्या स्फोटात मार्शल नेडेलिन व ३०० लोक ठार झाले.

गुप्त माहिती पाठविण्यासाठी गुप्त जागांचा उपयोग पेंकोव्हस्की करी, पण एका जागेचा एकदाच उपयोग करावयाचा, अशी दक्षता तो कटाक्षाने घेई. पाश्चात्त्य नागरिकांनाही जेथे जाता येईल, अशा या जागा असत.

### मिठाईच्या पेटीतून फिल्म रोल

मॉस्कोतल्या ब्रिटिश वकिलातीतील एक अधिकारी चिसहोम यांच्या पत्नी मिसेस चिसहोम यांच्यामार्फत महत्त्वाची गुप्त माहिती त्याने पाठविली. एकदा घरापुढच्या

अंगणात मिसेस चिसहोम यांची तीन मुले खेळत होती व जवळच बाकावर त्या बसल्या होत्या. पेंकोव्हस्की तेथे आला. मुलांशी बोलला. एका मुलाला त्याने मिठाईची पेटी भेट दिली व निघून गेला. मुलाने पेटी आईजवळ दिली. त्यात मिठाईच्या खाली काही फिल्म रोल होते.

हेरगिरीत ब्रिटिश व्यापारी गेनव्हिल वायने पेंकोव्हस्कीचा मुख्य साथीदार होता. सप्टेंबर १९६१ मध्ये पॅरिसमध्ये भरणाऱ्या रशियन औद्योगिक प्रदर्शनासाठी पेंकोव्हस्की जाणार होता. विमानतळावर वायनेने त्याची भेट घ्यावी, असे ठरले होते. पण पेंकोव्हस्की येण्याची नक्की वेळ माहीत नसल्याने वायने पंधरा दिवस रोज विमानतळावर जात होता आणि प्रत्येक रशियन विमान पाहत होता. अखेर २० सप्टेंबरला पेंकोव्हस्की आला. महत्त्वाच्या लष्करी माहितीचे पंधरा फिल्म रोल त्याने आपल्याबरोबर आणले होते.

दुहेरी जीवन जगण्याची कला पेंकोव्हस्कीला चांगली अवगत होती. आपल्या हेरगिरीचा संशयही येऊ न देता बड्या रशियन अधिकाऱ्यांचा विश्वास त्याने संपादन केला होता. एकदा एका शिष्टमंडळाचा नेता म्हणून तो लंडनला जाणार होता. जाण्यापूर्वी रशियन हेरदलाचा प्रमुख सिरॉव्हने त्याला बोलावले. त्याची पत्नी व मुलगी लंडनला जाणार होती. त्यांची नीट व्यवस्था करण्याची कामगिरी पेंकोव्हस्कीकडे आली. त्याने ती एवढी चोख बजावली, की पेंकोव्हस्कीला पाश्चात्त्य राष्ट्रांची चांगली माहिती आहे, असा लौकिक त्याने मिळविला.

वरिष्ठ नेत्यांच्या विश्वासास पात्र होण्यासाठी कम्युनिझमवरील व कम्युनिस्ट नेत्यांवरील निष्ठेचे प्रदर्शन केले पाहिजे, हे तंत्रही पेंकोव्हस्कीला चांगले अवगत होते. लंडनमधील भेटीत कार्लमार्क्सच्या समाधीस त्याने भेट दिली. या समाधीची चांगली व्यवस्था ठेवलेली नाही, असे त्याला दिसून आले. त्याने क्रुशोव्हला कळविले. समाधी चांगल्या स्थितीत ठेवण्याच्या सूचना लागलीच लंडन वकिलातीस मिळाल्या आणि पेंकोव्हस्कीला शाबासकी मिळाली.

## प्रत्येक वकिलातीत ४० टक्के हेर

रशियन हेर संघटना कशा पद्धतीने कार्य करते, याची माहिती पेंकोव्हस्कीच्या रोजनिशीने दिली आहे. के. जी. बी. (राज्य सुरक्षा दल) आणि जी. आर. व्ही. (सोव्हिएट लष्करी गुप्त हेर संघटना) या दोन संघटनांमार्फत हे कार्य चालते. परराष्ट्रखाते परराष्ट्र व्यापारखाते, परदेशी प्रवासी खाते, पॅट्रिस लुमुंबा विद्यापीठ आणि निरनिराळे मैत्री संघ यांत या दोन संघटनांचे लोक पेरलेले असतात. प्रत्येक रशियन वकिलातीच्या अधिकारी व नोकरवर्गात ६० टक्के हेर असतात. हे अधिकारी कोणाशी बोलतात, कोणाकडे जातात, वगैरे त्यांच्या प्रत्येक व्यवहारावर के. जी. बी. ची पाळत असते. गाड्यांचे ड्रायव्हरसुद्धा हेर असतात.

पेंकोव्हस्कीने फोडलेली रशियन लष्करी गुपिते किती महत्त्वाची होती, हे त्याची

हेरगिरी उघडकीस येताच रशियाने तातडीने योजलेल्या उपायांवरून दिसून येते. रशियन लष्करी हेर संघटनेचा प्रमुख सिरॉव्ह याला लागलीच त्याच्या जागेवरून काढून खालची जागा देण्यात आली. परदेशांतील निरनिराळ्या वकिलातीत काम करणाऱ्या तीनशे अधिकाऱ्यांना लागलीच मॉस्कोस बोलावून घेण्यात आले.

## ☐ लौकर विवाहाच्या समस्या

आपल्याकडे प्रौढ कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न बिकट झालेला आहे, तर अमेरिकेत विवाह लौकर करण्याची प्रवृत्ती वाढल्याने काही समस्या निर्माण झाल्या आहेत. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या इंटरनॅशनल पॉप्युलेशन अँड अर्बन रिसर्च इन्स्टिटयूटने पाहणी करून याबाबतीत काही निष्कर्ष काढले आहेत. लौकर विवाहांचा औद्योगिक दृष्टीने पहिला परिणाम म्हणजे कारखान्यांत किंवा कचेऱ्यांत काम करण्यास महिलावर्ग कमी प्रमाणात उपलब्ध होतो. लग्न झाल्यावर पहिली पाच वर्षे तरी कोणतीही नोकरी करण्याची अशा महिलांची इच्छा नसते. अशा विवाहांचा दुसरा परिणाम म्हणजे प्रौढ विवाहाच्या मानाने लौकर विवाह करणाऱ्या तरुण-तरुणींना मुले अधिक होतात. विवाहापूर्वीच गर्भधारणा होण्याचे प्रमाणही वाढत आहे. १९४० ते ४४ या काळात हे प्रमाण दर हजार विवाहांमागे ८० होते, ते १९५५ ते ५९ या काळात १६० पर्यंत गेले. म्हणजे दुपटीने वाढले. महिलांच्या शिक्षणावरही परिणाम होत असून, लग्नानंतर शिक्षण न घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

वैवाहिक स्थैर्याच्या दृष्टीनेही या लौकर होणाऱ्या विवाहांचा अनुभव फारसा आशादायक नाही. मुख्यतः शारीरिक आकर्षणानेही लग्ने जमलेली असतात. वधूवरांना एकमेकांच्या अंतरंगाची, स्वभावाची, आवडीनिवडींची नीट ओळखही पटलेली नसते. विवाहानंतर थोड्या दिवसांतच अनेक बाबतीत आपले पटत नसल्याचे त्यांना आढळून येते आणि त्याचे पर्यवसान अखेर घटस्फोटात होते. अशा विवाहांच्या बाबतीत घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. १९५० ते ५४ या काळात विवाह केलेल्या मुलींची १९५९ साली पाहणी केली, त्यात असे आढळून आले, की चौदा ते सतरा वयाच्या दरम्यान विवाह केलेल्या मुलींपैकी बावीस टक्के मुलींनी घटस्फोट घेतला होता. उलट याच काळात विवाह केलेल्या २५ ते २९ वयाच्या मुलींपैकी फक्त सात टक्के मुलींनी घटस्फोट घेतला होता.

या पाहणीचा निष्कर्ष उघड आहे. विवाह फार लांबणीवर पडणे व ते फार लौकर होणे, ही दोन्ही टोके टाळणे समाजहिताच्या व समाजस्थैर्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

## ☐ नको हे आवाज !

जगातील वड्या राष्ट्रांचे नेते एकीकडे शस्त्राची निर्मिती मोठ्या प्रमाणावर चालू ठेवून, तसेच व्हिटनामसारखी युद्धे पेटती ठेवून तोंडाने जागतिक शांततेचा घोष करीत आहेत; त्यासाठी वाटाघाटी-परिषदा होत आहेत. ही शांतता केव्हा प्रस्थापित

व्हावयाची असेल तेव्हा होवो, पण या शांततेबरोबरच दुसऱ्या एका शांततेसाठी माणूस झगडत आहे. ही शांतता म्हणजे यंत्रयुगातील कर्णकर्कश आवाजापासून शांतता. गिरण्यांचे भोंगे, रस्त्यांतून मोटारी, रिक्षा, स्कूटर यांचे आवाज, विमानांची घरघर, दुपारच्या शांतवेळी फेरीवाले, कल्हईवाले, डबाबाटलीवाले यांच्या आरोळ्या; सार्वजनिक बागा, हॉटेल व लग्नमंडपांतून संध्याकाळी रेडिओ व ध्वनिमुद्रिकांचे कानठळ्या बसविणारे आवाज माणसांच्या कानांवर सारखे पडत असतात. तुमची ती जागतिक शांतता केव्हा यायची असेल तेव्हा येवो, आम्हाला प्रथम ही शांतता मिळू द्या, अशी त्यांची साधी मागणी आहे.

## आवाजाचे दुष्परिणाम

या आवाजांचा दुष्परिणाम माणसाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर व कार्यक्षमतेवर होतो, असे चेकोस्लोव्हाकियाच्या संशोधकांनी केलेल्या संशोधनात आढळून आले आहे. आवाजाचे शास्त्रीय पद्धतीने मापन करण्याची पद्धती त्यांनी शोधून काढली आहे. त्याला ते डी. बी. म्हणतात. रात्री ३५ ते ४० डी. बी. व दिवसाला ४० ते ५० डी. बी. एवढा तीव्र आवाज किंवा गोंगाट असेल तर माणूस तो सहन करू शकतो. यापेक्षा अधिक आवाजाचा त्याला त्रास होतो. एवढेच नव्हे, तर त्याच्यावर अपायकारक परिणाम होतो. ६५ डी. बी. एवढ्या तीव्र आवाजाने माणसाची कार्यक्षमता कमी होते, थकवा येतो आणि मानसिक अस्वस्थता वाढते. आवाजाची तीव्रता कमी केल्यावर कार्यक्षमता वाढते, असेही प्रयोगांती आढळून आले. चेकोस्लोव्हाकियातील एका कारखान्यात आवाजाची तीव्रता कमी करताच कामगारांची उत्पादनक्षमता ९ टक्क्यांनी वाढली. मॉस्कोतही असे प्रयोग झाले. एका टेलिफोन एक्सचेंजमधील गोंगाट १० डी. बी. ने कमी करताच तेथील कामगारांची कार्यक्षमता २२ टक्क्यांनी वाढली.

आवाजाची तीव्रता ६५ ते ८५ डी. बी. असते. अशा जागी राहणाऱ्या किंवा काम करणाऱ्या माणसांच्या ज्ञानतंतूंवर विपरीत परिणाम होतो. डोकेदुखी, निद्रानाश, रक्ताभिसरणात अनियमितपणा, हृदयविकार, अपचन वगैरे रोग त्यास जडतात. यापेक्षाही तीव्र म्हणजे ८५ डी. बी. हून अधिक आवाज असलेल्या वातावरणात माणसाला रहावे किंवा काम करावे लागले, तर तो कालांतराने बहिरा होतो.

आवाजापेक्षा अधिक वेगाने जाणाऱ्या विमानांच्या विलक्षण आवाजाने माणसाच्या झोपेचे खोबरे होते. जेट विमानांचा वापर वाढत जाईल, तसतसा हा प्रश्न अधिकच बिकट होईल. मोटारींच्या आवाजांचा पोलिसांच्या कानावर परिणाम होतो. मोठ्या शहरात फूटपाथवर झोपणाऱ्या लोकांमध्ये मानसिक विकृती आढळतात, त्याचेही एक कारण या संशोधकांच्या मते आवाज हेच आहे.

—वा. दा. रानडे

# भिंतीच्या तुंबड्या

## सुधाकर राजे

### • सलून आणि शेती

फार प्राचीन काळी शेत नांगरले, की धान्य उगवत असे; पण वैज्ञानिक क्रियेच्या युगात केवळ शेत नांगरले, की बिनतक्रार उगवायची धान्याला लाज वाटू लागलेली दिसते. हल्ली काही शेतांत धान्य उगविण्यासाठी संगीताच्या ध्वनि-मुद्रिका लागतात, तर काही शेतांना कृत्रिम सूर्यकिरणांत वाढवतात. काही शेतांना प्लॅस्टिकच्या आवरणात पडदानशीन करतात, तर काहींना चक्क नायलॉन नेटच्या साडीसारखी साडी नेसवतात. सोनखताचे सुवर्णयुगही संपले. आता एका धान्याला अमोनिया लागतो, तर दुसऱ्याला फॉस्फेट लागते.

खतांच्या या बदलत्या फॅशनचा व्हायचा तोच परिणाम झाला आहे. हरदोई गावच्या न्हाव्यांनी म्हणे धान्यवाढीसाठी 'बालदान' चळवळ आरंभली आहे. का? तर केसांत सतरा टक्के नायट्रोजन असतो व तो पिकांना पोषक असल्याने केसांचा खतासारखा उपयोग होऊ शकेल, असा शोध लागला आहे. सलून आणि शेतीचा हा अफलातून संगम आणल्यामुळे प्रत्येकाला डोके नमवायला लावणाऱ्या न्हाव्याच्या डोक्यातूनच निघणे शक्य आहे. ते काही असले तरी 'अधिक अन्न पिकवा' मोहीम प्रत्येकाच्या कशी 'रोमारोमात' भिनली आहे, त्याचा हा साक्षात पुरावा म्हणता येईल. शास्त्रीजी शहरांतल्या लोकांना सांगतात, इंच इंच जागेत अन्न पिकवा; पण त्यासाठी आता हातपाय हलविण्याची आवश्यकता नाही. स्वस्थपणे खुर्चीत बसूनही बंबईचा फॅशनेबल बाबू ते काम करू शकेल. फक्त ती खुर्ची न्हाव्याची असायला हवी. मात्र ही रोमांचकारी चळवळ अखिल भारतीय प्रमाणावर यशस्वी करायची असेल, तर आजच्या केसाळ तरुण पिढीला बीटल्-छाप जंगलातून बाहेर आणून यूल ब्रिनर-छाप गोटा-कट म्हणजेच फॅशनेबल राष्ट्रीयता हे पटविण्यासाठी भारत सरकारने मोहीम आरंभली पाहिजे. नाही तरी मंत्र्यांना न्हाव्यांच्या दुकानांचे उद्घाटन करायची सवय आहेच. तेव्हा त्याच भाषणात हा मुद्दा त्यांनी सप्रयोग मांडला म्हणजे झाले!

* * *

### • डी-लक्स खुराडी !

अस्मादिक कधी चाळीत राहिले नाहीत, त्यामुळे मुंबईच्या चाळींची 'कबुतरांची

खुराडी ' म्हणून टिंगल करीत; पण आता ती टिंगल अंगाशी येणार असे दिसते. अमेरिकेत न्यू जर्सी नगरपालिका आपल्या हद्दीतल्या डासांचा फडशा पाडण्यासाठी मार्टिन नावाचे पक्षी नोकरीला ठेवणार आहेत आणि त्यांच्यासाठी डबल-रूमचे डी-लक्स प्लॅट बांधणार आहेत, अशी बातमी आली आहे. घ्या ! हिंदुस्थानातल्या गल्ली-बोळांतले डास मारण्यासाठी हिंडणाऱ्या डी. डी. टी. वाल्यांना आता नक्की असे वाटेल, की इकडे माणूस होण्यापेक्षा तिकडे पक्षी होता आले असते, तर तीच नोकरी करण्याबद्दल झकाससा फ्लॅट तरी पदरात पडला असता.

मुंबईत मार्टिन पक्षी आहेत की नाही, हे ठाऊक नाही, पण मुंबई नगरपालिकेला कधी काळी तेवढी स्वच्छता आठवलीच तर पाखरेच काय, पण गिरगावातल्या खुराडयांतली माणसेदेखील पाठीवर दोन पिसे चिकटवून नोकरीसाठी अर्ज करण्याची फार शक्यता आहे. नाही तरी माशा मारीत बसण्यात पटाईत असलेल्या आम्हा मंडळींना डास मारण्यात काय कठीण आहे ?

आता माणसांचे डी-लक्स फ्लॅट देशी-परदेशी पाहिले, पण पाखरांचे डी-लक्स फ्लॅट कसे असू शकतील, याची कल्पना करणे तितकेसे सोपे नाही. अर्थात ते चिमणीच्या घरासारखे मेणाचे किंवा कावळयाच्या घरासारखे शेणाचे नसणार एवढे मात्र नक्की. असे भिकार क्वार्टर्स मिळाले, तर कुठलाही मार्टिन पक्षी नोकरी सोडून जाईल. शिवाय पावसात वाहून जाणाऱ्या अन् उन्हात वितळणाऱ्या सिमेंटने घर बांधण्याची अमेरिकेत कायद्यानेच मनाई आहे. हिंदुस्थानातही असा निर्बंध कागदोपत्री आहे म्हणा, पण त्याला न डरता इथले सरकारी बांधकामखाते अगदी राजधानी दिल्लीतच अशी वाहून-वितळून जाणारी घरे भेट माणसांसाठीदेखील बांधणे, हा त्याच्या कर्तृत्वाचाच एक मोठा भाग आहे.

* * *

## • कुंभाराची अँबॅसॅडर गाडी ?

इंग्लंडात एका विक्रेत्याने एक नवीन मोटारगाडी ४२० पौंड आणि डझनभर गाढवे एवढया किमतीला विकली. शाब्बास ! या सौद्यात विक्रेत्याचे कौतुक तर वाटतेच, पण मोटार घेणाऱ्या माणसाकडे डझनावारी गाढवे असावीत, या गोष्टीचे तितकेच कौतुक वाटते. आपल्या हिंदुस्थानात असा गाढवा-मोटारींचा संस्कृति-संगम दुर्मिळ. खेडयांतला कुंभार माती वाहण्यासाठी गाढव विकून अँबॅसॅडर मोटार विकत घेणार नाही आणि शहरी माणूस बेबी कारची दिवसा स्वप्ने पाहताना तिची किंमत म्हणून किती गाढवे द्यावी लागतील, याची फिकीरही करणार नाही.

खरे म्हणजे हिंदुस्थानात राजकारणापासून चित्रपटापर्यंत सगळीकडे एकजात जातिवंत गाढवांचाच कारभार आहे; तेव्हा सरकारने एखाद्या मोटारीची किंमत इतकी गाढवे अशी ठरवून दिली तरी हे ' पैसे ' कोठून आणायचे, असा कुणाला प्रश्न पडू नये.

• • •

# भारतांत आलेले २ रशियन चित्रपट

**पुरुषोत्तम बावकर**

## □ नाईन डेज ऑफ वन इअर

एका वर्षातले नऊ दिवस. रशियन अणुशास्त्रज्ञाच्या आयुष्यातील काही प्रसंगांची ही कथा. प्रचारासाठी राबवलेला हा चित्रपट असूनही मिखाईल रॉमसारख्या हुशार दिग्दर्शकाने हाताळलेला असल्याने, कंटाळवाणा होत नाही. काही वर्षे ठराविक साचेबंद चित्रपट रशियातून निघत असत. नावीन्य असे त्यात नसे. ' नाईन डेज ऑफ वन इअर ' या चित्रपटाने ती परंपरा मोडली, असे म्हणायला हरकत नाही.

दिमित्री गुसेव ह्या अणुशास्त्रज्ञाला दोनवेळा सूक्ष्म किरणांमुळे धोका प्राप्त झाला होता. त्याच्याच गटामध्ये काम करत असलेली ' लेलया ' ही शास्त्रज्ञ तरुणी त्याच्याशी लग्न करते, पण त्याला तिची गरज नाही, असे आढळून येते. आत्मनाश होणार हे माहीत असूनही, गुसेव तिसऱ्या वेळीसुद्धा आपल्या देहावर रेडिएशनचा धोका पत्करतो.,

चित्रपटात दाखवलेले नऊ दिवस हे त्या शास्त्रज्ञाच्या आयुष्यातले खरोखरीच महत्त्वाचे असतात. अशाच एका दिवशी लेलया आपला दोस्त इलियाशी लग्न करण्याचे नाकारून, दिमित्री गुसेवशी लग्न लावते. त्यानंतर गुसेव आपल्या खेड्यात जातो तो दिवस. प्रत्येक दिवसातील महत्त्वाचे प्रसंग मिखाईल रॉम यांनी मोठ्या काळजीपूर्वक हाताळले आहेत. न्युट्रॉन्सचे संशोधन चालू असतानाची शास्त्रज्ञांत आढळणारी उत्सुकता; लेलयाचे लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी इलिया तिला भेटायला येतो, त्या वेळी ती घरात एकटीच असते – घरगुती कपड्यात, तेव्हा तिची उडालेली तारांबळ. इलिया प्रकृतिबद्दल विचारतो. कपडे बदलताना साहजिकच ती पुटपुटते, " याला माझी काही काळजी वाटत नाही. माझ्या प्रकृतीविषयी विचारतसुद्धा नाही. " अशा छोट्या छोट्या प्रसंगांची सबंध चित्रपटात विखुरणी केलेली आहे. लेलयाची भूमिका तातायना लावरोना हिनी आणि इलियाची भूमिका इनोकेन्ती स्तोक्तुनोव्हस्की या नटाने केली आहे.

शास्त्रज्ञ गुसेव, लेलया आणि इलिया या तीन पात्रांभोवती या चित्रपटाची कथा गुंफलेली आहे. अलेक्झी बाटालान्ह हा प्रसिद्ध रशियन नट, याने शास्त्रज्ञाच्या केलेल्या भूमिकेला नाव ठेवायलाच कुठे जागा नाही. तांत्रिकदृष्ट्या चित्रपट इतर रशियन चित्रपटांच्या तोडीचा आहे.

## ☐ अ डॉन स्टोरी

भारताच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट–महोत्सवात 'अ डॉन स्टोरी' हा चित्रपट स्पर्धेसाठी सादर केला गेला होता आणि या चित्रपटात नायकाचे काम करणाऱ्या युजेनी लेव्हनाव या नटाला उत्तम भूमिकेबद्दल पारितोषिक मिळाले होते.

मिखाईल शोलोखांव या नोबेल–परितोषिक (१९६५) मिळालेल्या सुप्रसिद्ध रशियन लेखकाच्या डॉन नदीच्या परिसरावर लिहिलेल्या गोष्टींपैकी एका गोष्टीवर हा चित्रपट आधारलेला आहे. दिग्दर्शक आहे व्हाल्दिमीर फेतीन आणि प्रमुख भूमिका केल्या आहेत युजेनी लेव्हनाव आणि लारीसा चुरसिना हिने. मार्शन गनर शिवालाक बायकांच्या बाबतीत शामळू होता. स्वभावाने भोळसट होता आणि म्हणूनच दरोडेखोरांनी बलात्कार केलेल्या एका तरुण स्त्रीला त्याच्या ताब्यात दिले होते. ती त्याच्या बरोबर मशिनगन असलेल्या गाडीत बसलेली असते. दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी फौजा शहरात फिरत होत्या. अजून यादवी संपली नव्हती.

शिबालाक किती झाला तरी तरुण होता. साहजिकच जे व्हायचे ते झाले. दरयाला आता मूल होणार होते. शिबालाक थोड्याच दिवसांत बाप बनणार होता. दरयाची तो काळजी घेत होता, जपत होता, पण अनेकवेळा दरया त्याच्यापासून काहीतरी लपवत आहे, असा त्याला संशय येई.

एके रात्री दरयाने सैनिक-कॅम्पमधून आपल्याबरोबर शिबालाकला पळून जायची विनंती केली. "चल आपण जाऊ. संसार थाटू," असा ती आग्रह करीत असते.

इतक्यात अचानक बंदुकांचा आवाज झाला. कॅम्पला दरोडेखोरांनी वेढा घातला. दरयाने शिबालाकचा हात घट्ट पकडून ठेवला होता. त्याने आपला हात सोडवून घेईपर्यंत वेळ निघून गेली होती. अनेक सैनिक मेले होते. कमांडरला प्राणांतिक जखमा झाल्या होत्या. शिबालाक पळतच आला. त्याने मशिनगन चालू केली. त्याच्या पथकाला मात्र दरोडेखोरांना पळवण्यात यश मिळाले.

शिबालकाचे पथक नदीकिनारी विश्रांती घेत असताना दरया गाडीतून उतरते. नदीकिनाऱ्यावर पाचोळ्याच्या ढिगावर ती पडलेली शिबालकला आढळते. तिला भयंकर त्रास होत असतो.

"मी मरतेय याशा. पण मला काही सांगायचं आहे. मी दरोडेखोरांची हेर आहे आणि त्यांना मी आपल्या हालचालींची माहिती कळवत होते."

क्षणार्धात तिने एका बालकाला जन्म दिला. याचवेळी जखमी झालेला कमांडर मृत्यु पावला. दरया जिवंत होती, पण शिबालकचा चेहरा निर्विकार होता. "तुझ्या विश्वासघातामुळे आमची अनेक माणसे मेली. तुला मी जिवंत ठेवणार नाही."

तिकडे इतर सैनिक कमांडरच्या प्रेताभोवती उभे राहून बंदुका उलट्या करत असतानाच बंदुकीचा आवाज आला.

चित्रपट मुळीच पकड घेत नाही. युजेनी लेव्हनावचे काम उत्तम झाले आहे. ●

माणूस

दिवाळी अंकात

प्रसिद्ध झालेली

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची नवी

प्रदीर्घ इतिहास-कथा

# शिलंगणाचं सोनं

लवकरच पुस्तरूपाने

प्रकाशित होत आहे


राजहंस प्रकाशन


४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Fortnightly) : 15 Dec. 1965 : 30 Paise : Regd. No. B 9304

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स




स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ [illegible] पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर